टाणं
९४

# खराकी मोहीम

नं. ४



प्रस्तावना लेखक
…ना साहेब अकेकर

REFBK-0001520

म. ग्रं.
विषय
सं. नं.

ॐ

## लोकमान्यांची

# स्वराज्याची मोहीम.

भाग ४ था

अर्थात्

वऱ्हाड—मध्यप्रांतांतील स्वराज्यदौऱ्याचा उत्तरार्ध.

प्रकाशक
अनंत हरि गद्रे, जोगेश्वरी नाका,
पुणे शहर.

मुद्रक
शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस,
सदाशिव
पुणे शहर.

मे १९१८

किंमत फक्त

REFBK-0001520
१५२०



श्री. नानासाहेब अळेकर.

लोकमान्यांच्या जयंतिस्मरणार्थ

सुरू झालेली

# श्रीराष्ट्रप्रेममाला

पहिल्या वर्षाचे १२ अंक निघाले

व्ही. पी. सह १॥५ रु,

दुसऱ्या वर्षाचा पहिला अंक

## महात्मा टिळक

ता. २९ जुलै रोजीं प्रसिद्ध होईल.

वार्षिक वर्गणी व्ही. पी. सह १॥५

अनंत हरी गद्रे जोगेश्वरी—नाका पुणें.

ॐ

लोकमान्य टिळकांच्या

# स्वराज्याच्या मोहिमेचे हे चार भाग

स्वराज्यसंघाच्या तहाहयात

सभासदांस

सप्रेम अर्पण केले आहेत.

संपादक.

दा. क. ........

# राष्ट्रधर्माची स्वराज्य-गीता.

लोकमान्य टिळकांनीं स्वराज्यप्रसारार्थ महाराष्ट्र-वऱ्हाड-मध्यप्रांत-कर्नाटक याच प्रांतांत केवळ नव्हे तर बहुशः सर्व हिंदुस्थानभर शहरोशहरीं गांवोगांवीं हिंडून जो उपदेश केला तो विस्तृतरीतीनें संकलित करून छापण्यास गेल्या वर्षी सुरवात केली व त्या वृत्तांताचे ३ भाग मागेंच प्रसिद्ध होऊन आज हा चवथा भाग वाचकांचे हातीं देण्याचा योग आल्याबद्दल आमच्या परमप्रियराष्ट्रदेवतेचे व जनतेच्या स्वरूपानें नटलेल्या परमेश्वराचे जितके धन्यवाद गावे तितके थोडेच होणार आहेत. हल्लींचे दिवस हे हिंदुस्थानच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचे व आणीबाणीचे असल्यामुळें या काळांत प्रत्येक राष्ट्रप्रेमी लहानथोर माणसानें स्वशक्त्यनुसार राष्ट्रकार्य करण्यास झटलें पाहिजे. हा काळ ज्यांनीं ओळखला त्यांत प्रमुखपणें लोकमान्य टिळकांचीच गणना केली पाहिजे. लोकमान्य टिळकांनीं काळ ओळखला व ते तावडतोब कामाला लागले. त्यांच्या हाताखालीं काम करण्यासहि शेंकडों थोरथोर राष्ट्रभक्त केवळ महाराष्ट्रांतूनच नव्हे—( वऱ्हाड-मध्यप्रांत-कर्नाटक हे प्रांत महाराष्ट्रांतच समाविष्ट होतात. ) तर सर्व हिंदुस्थानांतून पुढें आले आहेत. अशा या राष्ट्रीय काळीं आपणहि आपल्या हातून होईल ती सेवा करावी असें मनांत आणून आह्मीहि अल्पशक्त्यनुसार कामाला लागलों व त्याचें फळ या ‘ स्वराज्याच्या मोहिमा ’ व ‘ श्रीराष्ट्रप्रेममाला ’ हीं होत. या मोहीमांमध्यें लोकमान्यांचीं स्वराज्यावरील व्याख्यानें विस्तरशः दिलीं असून हा स्वराज्येतिहास या अंगापुरता तरी परिपूर्ण असावा म्हणून त्या व्याख्यानांस त्या त्या प्रसंगीं घडलेल्या हकीगती, वर्णनें वगैरे समयानुरूप जोडलीं आहेत.

हे स्वराज्याच्या मोहीमांचे ४ भाग आज पूर्ण झाले असल्यानें लोकमान्यांच्या स्वराज्यकार्याचाहि बराचसा भाग पूर्ण झाला आहे. अजूनहि पुष्कळ

भाग प्रसिद्ध होणें आहे, पण झालेलें कार्यहि बरेंच मोठें आहे असें ह्मणावयास हरकत नाहीं. या चारी भागांचें जर विहंगमदृष्टीनें अवलोकन केलें तर त्यांत श्रीतिलकचारित्रावर उज्ज्वल प्रकाश पाडणाऱ्या किती तरी गोष्टी सांपडतील, आणि मुख्यत्वेंकरून मोहीमांच्या पुस्तकांचा पुढील इतिहासास हाच उपयोग होणार आहे. या मोहीमांत दिलेलीं लोकमान्यांचीं व्याख्यानें हा या पुस्तकांचा दुसरा विशेष असून त्या व्याख्यानांत स्वराज्याच्या विषयाची इतकी सुंदर व सांगोपांग फोड झालेली आहे कीं, ज्याला स्वराज्याचा अभ्यास करावयाचा असेल त्यानें या मोहीमांतील लोकमान्यांच्या व्याख्यानांचें अध्ययन करावें म्हणजे झालें. हीं व्याख्यानें देतांनाहि त्या त्या प्रसंगांचें चित्र डोळ्यापुढें उभें राहील अशा खुबीनेंच वर्णनांची व भाषणांची योजना व रचना केलेली आहे. व्याख्यानें वाचतांना आपण तीं प्रत्यक्ष ऐकतच आहों कीं काय असा वाचकांना भास व्हावा म्हणून, लोकमान्यांच्या भाषणांची भाषा ते व्याख्यानांत बोलतात तशीच ठेविली असून व्याख्याते व श्रोते यांच्या मनोवृत्ति प्रतिबिंबित करणाऱ्या छोट्या सूचना व्याख्यानांतच मधून मधून कंसमर्यादित करून दिल्या आहेत. प्रत्यक्ष हकीगतीचीं पुस्तकेंच वाचकांपुढें असल्यामुळें यापेक्षां जास्त चर्चेची जरूरी नाहीं.

या चवथ्या भागाच्या शेवटीं जी स्वराज्यसंघाच्या तहाहयात सभासदांची यादी दिली आहे तिचेंहि फार महत्त्व आहे. स्वराज्यसंघाच्या डेप्युटेशनला विलायतेंत कार्य करतां यावें म्हणून संघानें तहाहयात सभासद मिळविण्याचें ठरविलें व त्यांची एकदम वर्गणी १०० रुपये ठेविली. हेच तहाहयात सभासद खरोखर डेप्युटेशनफंडाचे आधारस्तंभ होत. या सर्व सद्गृहस्थांविषयीं एक प्रकारचा विशेष अभिमान संघाला व राष्ट्राला आहे. अर्थात् त्यांचीं नांवें इतिहासाला अवश्य माहिती पाहिजेत. त्या सद्गृहस्थांचीं नांवें अजरामर व्हावीं म्हणून ही यादी जोडण्याचा खटाटोप केला आहे तो त्या सद्गृहस्थांस व स्वराज्यप्रेमी जनतेस मान्य होवो !

या भागास सुंदर प्रस्तावना लिहून श्री. नानासाहेब अळेकरांनीं, काव्यमय लेख देऊन श्री. वामनराव जोशी यांनीं व विषयप्रवेश करून श्री. सदाशिवराव बल्लाळ यांनीं जे आमच्यावर उपकार करून ठेवले आहेत ते केवळ वर्णनातीत होत! या राष्ट्रभक्तांचें असेंच प्रेम या गरीब राष्ट्रप्रेमाच्या प्रयत्नावर राहो एवढीच त्यांच्या जवळ मागणी आहे.

या मोहीमांस ज्या ज्या थोर राष्ट्रपुरुषांनीं साह्य केलें व प्रोत्साहन दिलें त्या सर्वांचे पुन्हां एकवार येथें आभार मानून तूर्त वाचकांची रजा घेतों. हा स्वराज्यवाङ्मयसंग्रह म्हणजे एक प्रकारें पवित्र राष्ट्रधर्माची अति पवित्र स्वराज्य गीताच होय असें म्हटलें तर त्यांत वावगें काय आहे?

पुणें,<br>ता. २०–६–१८

राष्ट्रप्रेमाचा भुकेला,<br>अनंत हरि गद्रे.

# श्री नानासाहेब अळेकर यांची प्रस्तावना

लोकमान्य टिळकांचा नागपूर-वऱ्हाड प्रांतातील पंधरा दिवसांचा दौरा अनेक दृष्टींनीं हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं मुद्रित करण्याच्या योग्यतेचा झाला याबद्दल द्विमत होणें शक्य नाहीं. ठिकाठिकाणीं त्यांचा जो राजकीय थाटाचा सत्कार करण्यांत आला, त्यांच्या विषयीं जो आदर व्यक्त करण्यांत आला आणि त्यांचें भाषण ऐकण्यासाठीं लक्षावधि लोकांनीं जी उत्कट उत्सुकता दाखविली, त्यामुळें हा दौरा चिरस्मरणीय होऊन बसल्याशिवाय राहणार नाहीं. रोमच्या इतिहासांतील विजयी सेनानीच्या जयप्रवेशाचीं रसभरित व उत्साहकारक वर्णनें ज्यांनीं वाचलीं असतील त्यांना लोकमान्यांच्या दौऱ्याची रोमन सेनानीच्या 'जयप्रवेशा'शीं तुलना केल्याशिवाय राहवणार नाहीं. लोकमान्यांनीं फेब्रुवारीच्या सहा तारखेस नागपूर-वऱ्हाड प्रांतांत प्रवेश केल्यापासून तों दौरा संपवून भुसावळ येथें पोंहचेपर्यंत सर्व प्रांतांत अभूतपूर्व आंदोलन होऊं लागलें आणि सर्व लोक स्वराज्योत्साहानें प्रफुल्लित दिसूं लागले. पंधरा दिवसांपेक्षां अधिक काल लोकमान्यांना प्रवास करणें अशक्य झाल्यामुळें अनेक गांवांची व लक्षावधि लोकांची निराशा झाली तरी ज्या ठिकाणीं लोकमान्य जाणार असें कार्यक्रमपत्रिकेच्या द्वारें जाहीर करण्यांत आलें त्या ठिकाणीं भोंवतालच्या गांवचे हजारों लोक जमून लोकमान्यांच्या मुखांतून स्वराज्य मंत्राचें त्यांनीं मनमुराद श्रवण केलें. ज्यांनीं ज्यांनीं ते प्रसंग प्रत्यक्ष पाहिले किंवा ज्यांनीं त्यांचीं वर्णनें ऐकिलीं ते आनंदातिशयानें फुलून गेले. वास्तविक पाहिलें असतां लोकमान्यासारख्या अद्वितीय पुरुषाच्या आगमनानें नागपूर-वऱ्हाड प्रांत दुमदुमतून जावा यांत आश्चर्योत्पादक कांहीं नाहीं. त्यांची योग्यताच त्या प्रकारची व त्या दर्जाची आहे. किंबहुना त्यांच्या योग्यतेच्या मानानें, त्यांनीं आजपर्यंत निःस्वार्थबुद्धीनें केलेल्या देशसेवेच्या मानानें, त्यांचा आदरसत्कार करण्याची ताकद हिंदुस्थानांतील कोणत्याहि प्रांतानें किंवा समाजानें दाखवावी अशी स्थिति

हिंदुस्थानच्या दुर्दैवानें अजून प्राप्त झाली नाहीं. तरी पण लोक लोकमान्यांसंबंधीं जी भक्ति दाखवितात ती जरी त्यांच्या योग्यतेच्या मानानें फार कमीदर्जाची असली तरी हिंदी जनतेची सर्वस्वी निराधार स्थिति लक्षांत घेतल्यास ती देखील अभिनंदनार्ह आहे असें म्हणणें प्राप्त होतें. हिंदुस्थानांत लो० टिळकांना धूरीणत्वाचा मान देणारे जसे असंख्य लोक आहेत तसेच त्यांचा द्वेष करणारेहि कांहीं लोक आहेत. अधिकारीवर्गाला ते अप्रिय आहेत. लोकमान्य जर आयरिश असते व त्यांनीं हिंदुस्थानच्या चळवळीप्रमाणें आयर्लंडांत चळवळ केली असती तर आयर्लंडांतील अधिकारीवर्ग लो० टिळकांविषयीं इतका चिडखोर राहिला नसता. लो० टिळक आयर्लंडमध्यें पार्नेल, रेडमंड यांच्याप्रमाणें सर्ववंद्य होऊन ब्रिटिशमुत्सद्यांच्या बरोबरीनें बसले असते. परंतु हिंदुस्थानांतील अधिकारीवर्गाची कातडी अत्यंत नाजूक असल्यामुळें कायदेशीर चळवळ देखील त्यांच्या मनांत संताप उत्पन्न करते. आयर्लंडांत सरकारची अप्रीति प्राप्त करून घेणें हिंदुस्थानांतल्याप्रमाणें सोपें नाहीं. दहापांच व्याख्यानें दिलीं, सरकारचे दोष दाखवून त्यांच्या कृत्यांवर टीका केली, हिंदुस्थानच्या हक्कांसंबंधीं लोकसमाजाला शिक्षण देण्याची खटपट केली, कीं ताबडतोब त्याच्या गळ्यांत अवकृपेची माळ पडून त्याच्या हालचालीवर गुप्तपोलिसाचा डोळा ठेवणें जरूर होतें, तो सद्गृहस्थ रेलवेनें प्रवासास निघाला तर स्टेशनांवर त्याची चौकशी होते त्याच्या बरोबर अखेरपर्यंत पोलिसचा शिपाई प्रवासास निघतो. त्याचें नांव ' गुप्त--वहींत ' नोंदलें जातें आणि अशा सरकारच्या अवकृपेंतील पुरुषाशीं व्यवहार करण्याची लोकांना भीति वाटावी अशा प्रकारची त्याची कीर्ति होते. ' केसरी ' कोण घेतो, सभांना कोण जातो, वक्ता काय बोलतो याविषयीं बारकाईची चौकशी करण्यांत येते. या सर्वांचें कारण हेंच कीं हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांचें अंतःकरण असावें तसें उदार नाहीं. राज्यव्यवस्थेंत बदल करण्याच्या कल्पना त्यांना असह्य वाटतात; आपल्या हातांतील एकतंत्री सत्तेचा सुईच्या अग्राइतकाहि भाग हिंदी लोकांच्या हातांत जाणें म्हणजे आपल्या राज्याला कमीपणा आणणारें व घातुक आहे अशी त्यांची मनःस्थिति

झालेली आहे. अधिकारी आणि लोकमान्य यांचा हा झगडा गेलीं ३०। ४० वर्षें कमी अधिक प्रमाणानें चालू आहे. हा झगडा राजकीयस्वरूपानें प्रथम सुशिक्षित पुढारी आणि सरकार यांच्यांत सुरू झाला हें खरें, परंतु पुढें या झगड्यांत अधिकाधिक लोक पडून हिंदुस्थानांत स्वतंत्र विचाराचा, दमदार व निर्भीड प्रजापक्ष निर्माण झाला. लो० टिळकांनीं जी अत्यंत महत्वाची कामगिरी केली ती प्रजापक्ष बनविण्याची होय व त्यामुळें त्यांना प्रचलित राजकारणांत सर्वश्रेष्ठ--धूरीणाचें स्थान मिळालें आहे. लो० टिळकांना इतका त्रास कां सोसावा लागला याचें पुष्कळांना आश्चर्य वाटतें, परंतु हिंदुस्थानातील राज्यपद्धतीचा विचार केला असतां आश्चर्य वाटण्याचें कारण राहात नाहीं. लोकमान्यांनीं तो सर्व त्रास सोसला, या झगड्यांत माघार घेतली नाहीं, आणि असामान्य धैर्यानें आणि चिकाटीनें आपलें प्रजापक्ष निर्माण करण्याचें व्रत अखंड चालू ठेविलें याबद्दल मात्र सादर व साभिमान कौतुक वाटतें.

हिंदुस्थानांत लोकपक्ष अस्तित्वांत आहे किंवा नाहीं याविषयीं कोणाला शंका वाटत नाहीं. वेळोवेळीं हिंदुस्थानांतील लोकपक्षानें आपलें अस्तित्व सिद्ध केलें आहे आणि अजूनहि कोणाला यत्किंचितहि शंका वाटत असल्यास नागपूर-वऱ्हाड प्रांतांतील लोकमान्यांच्या दौऱ्याच्या हकीकती वाचण्याची त्यांनीं मेहेरबानी करावी. पूर्वी असा एक काळ होता कीं, त्या काळांत लोक लोकमान्यांना भीत होते. त्यांच्या नामोच्चारानें थरथरां कांपणारे, त्यांच्या वाऱ्यासहि उभें राहण्यास कचरणारे नरवीर कांहीं काळापूर्वी हिंदुस्थानांत होते. टिळकांमुळें आमचें नुकसान झालें, टिळकांच्या चळवळीमुळें ब्राह्मणवर्गावर--सरकारी अवकृपेची छाया पडली असे दुर्बल--स्वार्थप्रेमामुळें देशाभिमानरहित उद्गार काढणारे पुरुष महाराष्ट्रांत होते. लोकमान्यांवर जे प्रसंग ओढवले त्यांमुळें एके काळीं ही भीति अनावर झाली होती. परंतु भीतीच्या गराड्यांतून सुद्धां लोकपक्षाचें सामर्थ्य गोचर होत गेलें. लोकमान्यांवर प्रतिपक्षीयांकडून जितके निकराचे हल्ले झाले तितके हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि पुढाऱ्यावर झाले नाहींत. लढाईंत ज्याप्रमाणें एका पक्षाची दुसऱ्या पक्षाच्या सेनापतीचा

पाडाव करण्याची फार इच्छा असते त्याप्रमाणें या कायदेशीर युद्धांत लोकमान्यांना जेरीस आणण्याची प्रतिपक्षानें शिकस्त केली. खटले झाले, शिक्षा भोगाव्या लागल्या, दिवाणींतून फौजदारी निघाली सर्व प्रकारचे सोहळे झाले. ॲंग्लोइंडियन पत्रकारांनीं लोकमान्यांवर जालीम लेखणी चालविली, व्हालेंटाइन चिरोल आले, लेखांचा भडिमार झाला, आमच्यांतील कांहीं लोकांनीं त्यांची पाठ पुरविली. अशा परिस्थितींत लोक टिळकांना भ्याले यांत आश्चर्य तें कोणतें ! परंतु लोकमान्यांवर आलेल्या संकटांमुळें त्यांच्या असामान्य धैर्याची जेव्हां लोकांना साक्ष पटली, त्यांच्या विद्वत्तेचें तेज जेव्हां सर्वत्र फांकूं लागलें, त्यांच्या लेखांतील, भाषणांतील आणि वर्तनांतील उज्वल तत्त्वें जेव्हां लोकांना पटूं लागलीं तेव्हां बहुजनसमाजाच्या अंतःकरणांत नवजीवनाचा संचार होऊन देशभक्तांच्या आपदा राष्ट्र कशा निर्माण करतात याचा अनुभव आला. आज स्थिति पूर्णपणें पालटली आहे. नागपूर--वऱ्हाड प्रांतांतील लोकमान्यांचा प्रवास ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिला असेल त्यांना बदललेल्या मनूची साक्ष सहज पटेल. लोकमान्यांनीं आपल्या गांवांत यावें म्हणून किती गांवच्या लोकांनीं खटपट केली ? त्यांच्यांशीं दोन शब्द बोलावयास मिळावे, त्यांच्या बरोबर प्रवास करावयास मिळावा अशी किती लोकांची इच्छा ? त्यांच्या शेजारीं त्यांच्या गाडींत--मोटारगाडींत--बसण्याची संधि मिळाली असती तर किती मोठमोठ्या लोकांना धन्यता वाटली असती ? आपलें नांव टिळकांच्या स्मरणांत राहील का, टिळक आपल्याला पुन्हां भेटल्यास ओळखतील का याची किती लोकांना विवंचना ? टिळकांनीं आपल्याला भलें म्हणावें, टिळकांनीं आपल्याला विश्वासांत घ्यावें याविषयींची किती चिंता ? रावबहादूर, रावसाहेब, आनररी मॅजिस्ट्रेट, शेटसावकार, मालगुजार, पाटील पटवारी, वकील, डॉक्टर, ब्राह्मण, मराठे, धंदेवाले, शेतकरी, श्रीमंत, गरीब वगैरे सर्वदर्जाचे व सर्वप्रकारचे लोक लोकमान्यांच्या दौऱ्यामुळें आनंदसाम्राज्यांत गर्क होऊन गेले होते. हे सर्व प्रकार देशाच्या भावी मंगलाचे द्योतक आहेत. टिळकांचा अनुयायीवर्ग अफाट झाला असून त्यांच्यांत देशभक्तीची ज्योत तेवत आहे याचें हें स्पष्ट निदर्शक आहे.

मध्यप्रांत--वऱ्हाडच्या दौऱ्यामुळें भयाची भीति वाटेनाशी झाली, अधिकाऱ्यांच्या क्रोधाविषयीं औदासिन्य वाटूं लागलें आणि राष्ट्रप्रेम व स्वराज्यलालसा यांच्यासमोर आत्मप्रतिष्ठा आणि स्वार्थपरायणता यांचा प्रभाव मंद झाला. लोकमान्यांसारखे पुरुष आणखी दोनचार असते तर काय बहार झाली असती !

नागपूर--वऱ्हाडप्रांतानें विलायतेस जाणाऱ्या डेप्युटेशनसाठीं जवळ जवळ सव्वा लाख रुपये लोकमान्यांच्या स्वाधीन केले याबद्दल प्रांताबाहेरचे लोक त्यांची स्तुति करीत आहेत, परंतु इतकी स्तुति करण्याचें कांहीं कारण नाहीं. लोकमान्य टिळक म्हातारपणीं--प्रकृती चांगली नसतांना--विलायतेचा प्रवास हिंदुस्थानचें हित करण्यासाठीं करावयास तयार झाले असतां त्यांना मध्यप्रांत वऱ्हाडनें सव्वालाख रुपये दिले तर त्यांत विशेष काय आहे ! टिळकांनीं आपलें सर्वस्व देशाला वाहिलें मग लोकांनीं त्यांना पैसा दिला तर त्यांत नवल तें कोणतें ! नागपूर--वऱ्हाडप्रांत याप्रसंगीं पेचांत आहे. कायमच्या दुष्काळांत लढाईमुळें व नापिकीमुळें भर पडली आहे. परंतु लोकमान्य टिळक विलायतेस कांहीं चैन करण्यासाठीं जात नाहींत तर हिंदुस्थानला स्वराज्य मिळवून देण्यासाठीं आजपर्यंत त्यांनीं जी पराकाष्ठा केली त्याच्या लाटा समुद्रापलीकडे पोंहोंचवून बेल्ज्यमसाठीं--जगाच्या स्वातंत्र्यासाठीं--घनघोर युद्धांत पडलेलें इंग्लंड हिंदुस्थानासाठीं काय करणार याचा जाब ते इंग्लंडच्या लोकांना प्रत्यक्ष विचारणार आहेत. इंग्लंडांतील लोकमत जागृत करून हिंदुस्थानच्या हितासंबंधीं इंग्लंडचे लोक किती उदासीन आहेत याचें माप त्यांच्या पदरांत टाकून साम्राज्याचीं बंधनें सुदृढ करण्याची ते खटपट करणार आहेत; अशा कामाला सव्वालाख रुपये दिले ह्मणजे फार केलें असें नागपूर वऱ्हाडचे लोक समजत नाहींत व केवळ त्यासाठीं त्यांनीं लोकमान्यांना दौऱ्याच्या दगदगींत टाकलें नाहीं. लोकमान्य पुण्यांतच बसून हुकूम करते तरीसुद्धां हे रुपये त्यांच्याकडे पोंहोचले असते. सव्वा लाख रुपये लो. टिळकांना देणें असंभाव्य कां ह्मणून वाटावें हेंच मला समजत नाहीं. एखादा धनिक एखादें देऊळ बांधण्यासाठीं लीलेनें लाख दोन लाख रुपये

खर्च करतो. एखादा मारवाडी, एखाद्या शहरांत एखादी बाजारओळ उठविण्यासाठीं सहज लाख दोन लाख रुपये खर्चीं घालतो. कॉलेजें किंवा शाळा स्थापन करण्यासाठीं दोनचार लाख रुपये जमविणें जड जात नाहीं. एखाद्या साहेबाचें स्मारक उठविण्यास देखील लाख रुपये आपल्या हिंदुस्थानांत जमविणें कठिण वाटत नाहीं. हजारों रुपये खर्च करणारे रावबहादूर, रावसाहेब, कौंसिलचे सभासद व इतर श्रीमंत लोक किती तरी डोळ्यांसमोर दिसतात. आतां येवढें मात्र खरें कीं उपरिनिर्दिष्ट कारभारांत भीतीचा भाग नसतो आणि लोकमान्यांना पैसा देणें ह्मणजे आपल्या मागें चौकशीचा भुंगा लागेल कीं काय अशी कांहीं लोकांना खरी—खोटी दहशत बसलेली असते. या दृष्टीनें पाहिलें तर कदाचित्, सव्वालाख रुपयांच्या देणगीचें महत्त्व आहे असें ह्मणतां येईल. पण ही नागपूर—वऱ्हाड प्रांतांतील लोकांची कर्तबगारी नसून ही लोकमान्यांची कर्तबगारी आहे, हें लोकमान्यांचें याच जन्मांतील संचित आहे, त्यांच्या अत्युत्कट पुण्याचें हें लहानसें फल आहे, हें कोणीहि विसरूं शकत नाहीं.

लो० टिळकांच्या दौऱ्याची रुपयांच्या हिशेबानें किंमत होत नाहीं किंवा दौऱ्याचा तो हेतुहि नव्हे. तो दौऱ्याचा परिणाम होय. दौऱ्याचा मुख्य हेतु स्वराज्याची कल्पना समाजांत कितपत रुजली आणि विलायतेस जें डेप्युटेशन जावयाचें त्याला लोकमत अनुकूल आहे किंवा नाहीं हें पाहण्याचा होता. आजपर्यंत हिंदुस्थानांतून कांहीं डेप्यूटेशनें विलायतेस गेलीं. परंतु डेप्युटेशनच्या कार्याची सर्वसाधारण लोकांना ओळख करून देण्याची—जाण्याच्या पूर्वी किंवा परत आल्या नंतर—कोणी विशेष खटपट केल्याचें दिसत नाहीं. त्यामुळें लोकशिक्षणाचें काम या शिष्टमंडळांना करतां आलें नाहीं. शिवाय मूठभर सुशिक्षित पुढारी म्हणून त्यांची किंमत कमी करण्याची खटपट हिंदविद्वेषी लोकांना करतां आली हें निराळेंच. लो० टिळकांचें जें शिष्टमंडळ विलायतेस जाणार त्याची योग्यता फार उच्च दर्जाची आहे हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. सध्याच्या अनुकूल परिस्थितींत विलायतेस डेप्युटेशन पाठविण्याची किती आवश्यकता आहे व बहुजनसमाजाला, शिष्टमंडळानें इंग्लंडांत जाऊन लढाईमुळें

हिंदुस्थानच्या राज्यपद्धतीसंबंधानें अधिक चौकस व उदारबुद्धि झालेल्या तेथील लोकांना आपल्या आकांक्षा, आपले हक्क आणि आपली दुःस्थिति यांची यथायोग्य कल्पना करून देऊन राष्ट्राचें पाऊल पुढें ढकलणें किती जरूरीचें वाटतें हें लोकमान्यांच्या नागपूर--वऱ्हाड प्रांतातील दौऱ्यानें पूर्ण-पणें स्पष्ट केलें आहे. लोकमान्यांचा झालेला अपूर्व सत्कार, त्यांच्या निघालेल्या मिरवणुकी, त्यांच्यासाठीं झालेले दीपोत्सव, त्यांचीं व्याख्यानें ऐकण्यासाठीं जमलेले हजारों लोकांचे समुदाय, लोकांचा अभूतपूर्व उत्साह वगैरे सर्व देशभक्तीचे आविर्भाव हे याद्दष्टीनें अत्यंत महत्वाचे आहेत. विलायतेस जाण्याची हुक्की आली म्हणून लोकमान्य व इतर देशभक्त समुद्रोल्लंघन करीत नसून त्यांना लोकमताचा पाठिंबा आहे, लोक त्यांना जावयास विनंति करीत आहेत म्हणून ते जात आहेत हें या दौऱ्यानें सर्वत्रांना कळविलें आहे. शिष्टमंडळ विलायतेस जाणार तें पांचपन्नास लोकांचे प्रतिनिधी म्हणून जात नसून लक्षावधि--कोट्यवधि--लोकांची त्यांना संमति आहे म्हणून जात आहेत, हें या दौऱ्यानें जगाच्या निदर्शनास आणून दिलें आहे. लोकांनीं लोकमान्यांना आपले प्रतिनिधि नियुक्त केलें आहे. त्यांना बहुजनसमाजानें वकीलपत्र दिलें आहे. तुमच्यावर आमचा पूर्ण विश्वास आहे आणि आमच्या कल्याणासाठीं ज्या योजना कराल, जीं भांडणें भांडाल, जीं संकटें सोसाल त्या सर्व प्रकारांत आम्हीं हिंदुस्थानां-तील सर्व जातींचे व सर्व दर्जाचे लोक तुमच्या पाठीशीं उभे आहोंत अशा प्रकारचें आश्वासन त्यांनीं लोकमान्यांना दिलें आहे. लोकमान्य कोणाच्या तर्फेनें विलायतेस जात आहेत असा कोणी प्रश्न केल्यास केवळ होमरूल लीगच्या तर्फे ते जात आहेत असें निखालस उत्तर अंतःकरणपू-र्वक या दौऱ्यानें दिलें आहे. हिंदुस्थानचें खरें लोकमत काय आहे, वारा कोणत्या दिशेनें वाहात आहे, आणि स्वराज्याची तहान शाब्दिक मृगज-लानें भागणें कसें अशक्य झालें आहे यांची यथार्थ कल्पना करून देणारे हे प्रसंग होत. अँग्लोइंडियन लेखक कांहींहि लिहोत, आमचेच कांहीं भयग्रस्त देशबांधव नोकरशाहीचा कितीहि पाठपुरावा करोत, लोकमतानें स्वराज्याच्या चळवळीला संमति दिली आहे इतकेंच नव्हे तर त्या चळ-

वळीचें कार्य यशस्वी होण्यासाठीं पैशाची मदत करण्यास ते मनापासून तयार आहेत. याचा परिणाम हिंदुस्थानच्या हिताविषयीं बेपर्वाई दाखविणाऱ्या सत्पुरुषांवर झाल्यावांचून राहाणार नाहीं. लोकमान्यांनीं जसा नागपूर--वऱ्हाडप्रांतांत दौरा काढला तसा त्यांनीं इतर प्रांतात काढला असता, त्यांना तितकी फुरसत असती, तर नागपूर--वऱ्हाडांत जे प्रसंग झाले तसेच ते इतर प्रांतांत झाले असते याविषयीं मला तिलप्राय शंका वाटत नाहीं. स्वराज्यप्रेम सर्व हिंदुस्थानांत जागृत झालें आहे. खरें पाहिलें असतां नागपूर--वऱ्हाडप्रांत हा सर्वच दृष्टींनीं मागसलेला प्रांत आहे. अशा प्रांतांत जर उत्साहाच्या लहरी उठतात तर शिक्षणामुळें, राजकीय चळवळीच्या संततप्रवाहामुळें आणि निसर्गदत्त वैभवामुळें नागपूर--वऱ्हाडप्रांतापेक्षां अधिक पुढारलेल्या प्रांतांत राजकीय उन्नतीची इच्छा किती प्रबल असेल याची कल्पना हिंदुस्थानाकडे विषमतेच्या गढूळ दृष्टीनें पाहणाऱ्या लोकांना झाली पाहिजे व तदनुरोधानें त्यांनीं आपल्या विचारांची आणि आचारांची दिशा आंखली पाहिजे. लोकमान्यांच्या दौऱ्यांतील रहस्य ओळखून साम्राज्याचें व हिंदी जनतेचें सामान्य हित साधण्याचा हा योग ब्रिटिश मुत्सद्दी गमावणार नाहींत अशी आशा हिंदुस्थानच्या लोकांना वाटत आहे.

मि० मॉंटेगू हिंदुस्थानांत असतां हा दौरा झाला ही त्यांतल्या त्यांत हितप्रद गोष्ट झाली. दौऱ्याच्या हकीकती हिंदुस्थानांत जरी त्यांना वाचावयास सांपडल्या नाहींत तरी त्या अगदींच त्यांच्या कानांवर जाणार नाहींत असें होणार नाहीं. निदान पुढें मागें त्या त्यांचा कानांवर जाऊन विपरीत विचारांची, मायावी किंवा दिशाभूल करणाऱ्या भ्रामक विधानांची जर त्यांच्या मनांवर धूळ सांचली असेल तर ती उडून जाईल अशी मला खात्री वाटत आहे. मि० मॉंटेगू यांनीं अनेक थोर लोकांच्या खासगी मुलाखती घेतल्या आहेत परंतु कॉंग्रेसच्या बैठकीस हजर न राहिल्यामुळें लोकमत प्रत्यक्ष पाहण्याची संधि त्यांना मिळाली नाहीं. कांहीं लोकांनीं त्यांच्यापुढें हिंदुस्थानच्या काल्पित नालायकीचें रडगाणें गाइलें

असल्यास उगीच त्यांच्या मनांत अवास्तव कल्पना सांचल्या असतील; पण दौऱ्याची हकीकत त्यांनीं वाचली तर लोकांना काय पाहिजे हें त्यांना निश्चयानें कळेल. आणि हिंदुस्थानचे वाजवी हक्क त्यांना दिल्याशिवाय आतां मार्ग नाहीं हें त्यांच्या लक्षांत येईल. हिंदुस्थाननें स्वराज्य मिळविण्याचा निश्चय केला आहे हें त्यांच्या मनांत ठसेल. हिंदुस्थानांत येऊन जें त्यांना दिसलें नसेल तें डेप्युटेशन विलायतेस जात असल्यामुळें स्वतःच्या देशांत त्यांना समजणें शक्य होईल. लोकमान्य स्वतःची योजना पुढें करून इंग्लंडांत जात नाहींत, तर कांग्रेसनें लखनौस पास केलेल्या आणि कलकत्त्यास पुनरुक्त झालेल्या सर्वसंमत योजनेस सिद्धि मिळवून देण्यासाठीं ते तिकडे जात आहेत. कॉंग्रेसच्या विचारांचें, लोकांच्या विचारांचें लोकांनीं त्यांना मुखरत्व दिलेलें आहे. स्वराज्यध्येयाची सगुणमूर्ति या नात्यानें इंग्लंडच्या लोकांशीं अधिकारी वाणीनें बोलण्याची त्यांनाच पात्रता आली आहे. त्यामुळें एखादा उपटसुंभ, हिंदी गृहस्थ अनधिकारानें विलायतेस जाऊन जर कॉंग्रेसच्या मागणीच्या विरुद्ध ब्रिटिश मुत्सद्यांशीं कानमंत्र करूं लागला तर तो आमचा प्रतिनिधी नाहीं, असें लोकांनीं उच्चस्वरानें टिळकांच्या दौऱ्यांत सांगून ठेविलें आहे. आज प्रत्येक राष्ट्राला जे हक्क देण्यास इंग्लंड तयार झाला तेच हक्क हिंदुस्थान एकमतानें मागत आहे व ते खुद्द इंग्लंडांत जाऊन मागण्यासाठीं--किंवा न मागतांहि ते देणें हें साम्राज्याला कसें हितावह आहे हें ब्रिटिश जनतेला समजावून देण्यासाठीं—लोकमान्य जात आहेत. त्यांचा स्वार्थत्याग, देशाभिमान इत्यादि अनेक गुणांकडे लक्ष देऊन ब्रिटिश जनता हिंदुस्थानचें कल्याण करण्यास पुढें सरसावेल आणि आजपर्यंत झालें तें झालें पण यापुढें तरी हिंदुस्थानला खऱ्या बंधुत्वाच्या आणि समानत्वाच्या तत्वांवर वागविण्यास तयार होईल तरच हिंदुस्थानांत संतोष व समाधान नांदणें शक्य आहे असा हिंदुस्थानचा इंग्लंडला निरोप जात आहे. नौकरशाहीचा अंमल जाऊन लोकमताची स्थापना हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत जारी झाली पाहिजे ही हिंदी लोकांची आकांक्षा विलायतेस मूर्तस्वरूपानें जात आहे. हिंदी लोकांच्या स्वराज्यध्येयाचा ब्रिटिश जनतेकडून उपमर्द न होवो आणि

इंग्लंड व हिंदुस्थान एकमतानें वागून समग्र साम्राज्य सुदृढ, तेजस्वी व शत्रूंना भीतिदायक होवो हीच सर्वांची इच्छा आहे.

रा. गद्रे लोकमान्यांची दौऱ्याची हकीकत छापून काढीत आहेत हे त्यांचे महाराष्ट्र वाचकांवर 'अनंत' उपकार आहेत. लोकमान्यांच्या दौऱ्यांतील अनेक स्फूर्तिकारक प्रसंगांचा आनंद ज्यांना प्रत्यक्ष घेतां आला नाहीं अशा असंख्य महाराष्ट्रीयांना त्यापासून आनंद होईल अशी माझी खात्री आहे. लोकमान्यांच्या बरोबर सर्व ठिकाणीं गेल्यामुळें त्यांच्या दौऱ्याची समग्र माहिती गद्रे यांच्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि मनुष्याला अर्थातच नाहीं. त्याचा फायदा महाराष्ट्र वाचक घेण्यास चुकणार नाहींत आणि लोकमान्यांच्या भाषणांतील तत्वांचें परिशीलन करून महाराष्ट्राचें भवितव्य उज्ज्वल करण्यास कचरणार नाहींत अशी आशा प्रदर्शित करून हा लेख संपवितों.

नागपूर.
ता. १०–३–१९१८

नारायण रंगनाथ अळेकर.

# स्वराज्याची मोहीम

## उत्तरार्थ–भाग ४ था.

### प्रकरण १ लें.

## विषयप्रवेश

( ले. मित्रवर्य सदाशिराव बल्लाळ. )

लोकमान्यांनीं स्वराज्याच्या कल्पनेचा प्रसार करण्याकरितां पुष्कळ वेळ जागोजागीं सञ्चार केला, पण गेल्या फेब्रुवारी महिन्यामध्यें त्यांनीं वऱ्हाड व मध्यप्रान्तामध्यें जो दौरा काढला त्याची बरोबरी कशालाहि येणार नाहीं. लोकमान्यांची लोकमान्यता किती खोल व विस्तृत आहे हें या दौऱ्यांत लोकांनीं त्यांचें जें स्वागत केलें त्यावरून दिसून आलें. धर्मगुरु आपल्या मतांचा प्रसार करण्याकरितां व आचार प्रस्थापित करण्याकरितां सञ्चार करीत असतात; पण्डित लोक आपल्या विद्वत्तेचें प्रदर्शन करीत व अजिंक्य पत्रें घेत देशोदेशीं फिरत असतात; व आपल्या ऐश्वर्याची आणि पराक्रमाची द्वाही फिरविण्याच्या उद्देशानें राजे लोकहि कधीं कधीं आपल्या राज्यांतून दौरा काढीत असतात; पण लोकमान्यांनीं स्वराज्याची कल्पना लोकांच्या मनावर बिंबविण्याकरितां वऱ्हाड–मध्यप्रान्तीं जो सञ्चार केला त्याची सर कशालाहि यावयाची नाहीं. असा एक समाज नव्हता, असें एक खेडें नव्हतें, अशी एक व्यक्ति नव्हती कीं, लोकमान्यांचें आगमन आपल्या येथें केव्हां होईल या संबंधानें ज्याला उत्कण्ठा लागली नव्हती. वऱ्हाड हा जाणून बुजून महाराष्ट्रांतील मागसलेला भाग ह्मणविला जातो

त्यांतील साक्षरतेचें प्रमाण इतर प्रांतांच्या मानानें निःसंशय पुष्कळ कमी आहे; पण लोकमान्यांच्या संबंधींच्या भक्तीच्या बाबतींत पाहिलें तर तो आपणांस " मागसलेला " म्हणवून घ्यावयास कधींच तयार नव्हता. सन १८९७ सालापासून वऱ्हाडच्या भाक्तिमान् लोकांनीं लोकमान्यांच्या मूर्तीस आपल्या हृदयसंपुटांत सांठवून ठेविलें आहे, लोकमान्यांच्या हांकेस ओ द्यावयास वऱ्हाडकरांनीं कधींच कसूर केली नाहीं. याला "चिकित्सक" लोक अंधभाक्ति म्हणोत किंवा दुसरें कांहीं म्हणोत, पण लोकमान्यांच्या कर्तृत्वशक्तीवर, त्यांच्या निःस्वार्थतेवर, त्यांच्या देशभक्तीवर व त्यांच्या नेतृत्वावर वऱ्हाडकारांनीं इतका विश्वास टाकलेला आहे कीं, तो कशानेंहि कमी न होतां दिवसें दिवस वृद्धिंगतच होत जाणारा आहे. भक्ति ही वस्तुच अशी आहे कीं, तिला कांहीं तरी "दिल्या" शिवाय आपली पूर्ति वाटत नाहीं आणि खऱ्या भक्तीचें हें लक्षणच होय. पुराणांत किंवा कीर्तनांत भक्तिरसाचें निरूपण चाललें असतांना कंठ भरून येऊन डोळ्यांतून अश्रुधारा वाहत असलेले श्रोते कितीतरी असतात; पण ऐकिलेल्या व मनावर बिंबलेल्या तत्वांस अनुसरून जेव्हां प्रत्यक्ष कृति करण्याचें कार्य पडतें तेव्हां यत्किंचितहि विचार न करितां उपदिष्ट आचरण करणारे थोडेच सांपडतात. डोळ्यांतून घळघळां अश्रु वाहणें हें प्रेमाचें निदर्शक चिन्ह असलें तरी तेवढ्यानें खरें प्रेम कसोटीस लागत नाहीं. प्रेमाचा विषय बुद्धिगम्य झाला आहे एवढेंच त्यावरून अनुमान करितां येईल; पण प्रेमाचा विषय हृदयस्थ झाला आहे असें तेव्हांच म्हणतां येईल कीं, जेव्हां प्रेम करणारा मनुष्य आपणांस प्रिय असलेल्या व्यक्तीकरितां लागेल तो स्वार्थत्याग करावयास सिद्ध असतो. एवढेंच नव्हे, तर असला स्वार्थत्याग करावयाची संधि यावी अशी जेव्हां मन उत्सुकतेनें वाट पहात असतें तेव्हांच तें प्रेमानें ओतप्रोत भरलें आहे असें म्हणतां येईल. आमच्या वऱ्हाडकरांनीं लोकमान्यांचे अमृततुल्य शब्द अनेकदां श्रवणसंपुटांत भरून ठेविले होते, पण ही " घेण्याची " क्रिया झाली. तिनें त्यांचें समाधान होण्याऐवजीं " देण्या " विषयीं त्यांची उत्कण्ठा एकसारखी वाढतच चालली होती. नाहीं म्हणावयास सन १९०८ सालापूर्वी त्यांचे पवित्र चरण उमरावती,

अकोला, नागपुर, यवतमाळ अशा ठिकाणीं लागलेले होते, पण त्याच्या योगानें इतर ठिकाणच्या लोकांच्या औत्सुक्यास ज्यास्तच भरतें येऊं लागलें; व सन १९१६ ची लखनौची कॉंग्रेस झाल्यानंतर पुण्यास परत जातांना त्यांनीं वाटेंत वऱ्हाड मध्यप्रांतांतील कांहीं प्रमुखस्थळीं आपल्या दर्शनाचा लाभ द्यावा अशा ठिकठिकाणच्या लोकांकडून त्यांस विनवण्या करण्यांत आल्या. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्यांस नागपूर यवतमाळ व अकोला हीं ठिकाणें सोडून इतरत्र कोठें जातां आलें नाहीं. यावेळीं तर मध्यप्रांतांतील लोकांस आपल्या तोंडांतला घास निघून गेल्यासारखें वाईट वाटलें; पण ह्यामुळें निराश न होतां त्यांनीं लोकमान्यांची मार्गप्रतीक्षा करण्याची आपली तपश्चर्या सुरू ठेविली व त्यांच्या सद्भाग्यानें शेवटीं ती गेल्या फेब्रुवारी महिन्यांत फळास आली. आपल्या प्रेमाचें निदर्शक म्हणून लोकमान्यांच्या चरणावर पत्र नाहीं तर पुष्प निदान तोय अर्पण करण्याची संधि आल्याबद्दल त्यांस पराकाष्ठेचा आनन्द वाटूं लागला. लोकमान्यांच्या कार्यास आपण यथाशक्ति द्रव्य केव्हां अर्पण करूं आणि त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करण्यांत जो एक परमावधीचा उत्कृष्ट आनन्द आहे त्याचे भागीदार आपण केव्हां होऊं असें त्यांस होऊन गेलें.

—:०:—

## प्रकरण २

# स्वराज्याची मुरली

( ले. मित्रवर्य वामन गोपाळ जोशी. )

काय तो दर्शनाचा सोहोळा वर्णन करावा ! वऱ्हाड--नागपुरांत लोकमान्य आले आणि त्यांनीं लोकभक्तीच्या उज्ज्वल प्रेरणेनें सर्वांचीं अंतःकरणें थरारून सोडलीं. वऱ्हाडनागपुरावर महात्मा प्रसन्न झाले आ[illegible]

त्यांनीं हिंदुस्थानच्या महात्म्याचा संदेश आपल्या अमृतवाणीनें जनतेस जाहीर करून आपल्या अमोघ आत्मसामर्थ्याची लोकांस ओळख करून दिली.

वऱ्हाड--नागपुरांत भगवान् आपल्या बाल-लीला करूं लागले आणि त्यांनीं या अडदांड पण श्रद्धाळु, अडाणी पण एकनिष्ठ, अशिक्षित पण बाणेदार समाजास गोकुल-वृंदावनाचें परमभाग्य प्राप्त करून दिलें. दीनांचा कनवाळु, पतितांचा वाली आणि जनतेचा परमात्मा येथें प्रगट होतांच निराशेचा पूर्ण निरास होऊन सर्वत्र सुखाची परमावधि झाली. गोकुलांतील अडमुठ्या पण भगवान् श्रीकृष्णाच्या लाडक्या संवगड्यांप्रमाणें भगवान् टिळकांचे येथील अजाण पण आवडते अनुयायी टिळकभक्तीनें, राष्ट्रभक्तिप्रेमानें, स्वराज्याकांक्षेनें--बेहोष होऊन हिंदुस्थानच्या भाग्योदयाचा मंगल रास खेळले. राजविद्येच्या वाळवंटांत त्यांनीं मनसोक्त क्रीडा केली. तत्त्वज्ञानाच्या अगाध यमुनाडोहांत त्यांनीं यथेच्छ जलविहार केला—काव्याच्या शीतल छायेंत बसून सुंदर व मधुर कल्पनामय झुणकाभाकरींचा त्यांनीं आनंदानें गोपाळकाला केला. काय तो सोहळा ! काय तो आनंद ! ! केवळ अवर्णनीय ! त्याचें वर्णन करतांना आधुनिक व्यासांची लेखणी बोथटून जाईल—त्याचें व्याख्यान करतांना आधुनिक शुक्राचार्यांची वाणी मुग्ध होईल. लोकमान्य टिळक आले—महात्मा टिळक आले—भगवान् टिळक आले. लोककदंबवृक्षाच्या गोड छायेंत त्यांनीं लोकप्रियतेच्या शिलातलावर आपलें सुंदर प्रेमासन मांडलें आणि आपल्या शीलाच्या भरजरी पितांबरांत खोंवलेली स्वराज्याची मुरली—स्वराज्याची 'चतुर नादनटी' बाहेर काढून हातांत घेतली. भगवान् टिळक आतां स्वराज्याची मुरली वाजविणार—भगवान् टिळक आतां आपल्या स्वराज्याच्या बासरींतून कर्मयोगाचे गोड—फारच गोड—अगदीं मिठी मारण्यासारखा गोड—सूर काढणार—स्वदेशभक्तीचे आलाप गाणार, राष्ट्रसेवेच्या ताना मारणार, हिंदुस्थानच्या प्राचीन वैभवाचे सुस्वर राग आळविणार, हिंदुस्थानच्या भाग्योदयाच्या नाजुक रागिण्या नाचविणार असें पाहतांच सर्व बालगोपाल लोकतरूच्या तळीं भगवंताच्या भोंवतीं जमा झाले. त्यांनीं

फेर धरले–त्यांनीं भगवंताच्या मुखचंद्रावर आपली दृष्टि निश्चल लावली–सर्व इंद्रियांना आपल्या श्रवणसंपुटांत गोळा केलें–आणि मग पुढें काय? **मग पुढें काय** ? मग पुढें काय? वाचक हो, क्षणभर थांबा–तें कल्पना–चित्र–नव्हे–तें स्मृतिचित्र–नव्हे नव्हे, तें प्रत्यक्ष दर्शनाचित्र डोळ्यांपुढें उभें राहिल्यामुळें लेखकाचे डोळे आनंदाश्रुजलानें भरून आले आहेत. त्याला त्या चित्रावांचून कांहींच दिसेनासें झालें आहे. तेव्हां क्षणभर थांबा आपली आतुरता क्षणभर दाबून ठेवा. अहाहा! काय तें मनोहर चित्र! सर्व वृत्ति तल्लीन होतात–मनाचा ठावठिकाण लाभेनासा होतो-बुद्धि जन्मा-सच आली नाहींशी वाटते. सुंदर–पुनः सुंदर–पुन्हां पुन्हां सुंदर--यावांचून उद्गारच निघत नाहीं. एका शब्दाला शतशः प्रतिशब्द सांगणारे कोश येथें कुंठित होतात–एका प्रसंगावर शंभर तऱ्हेनें नृत्य करणारें काव्य येथें लंगडें पडतें—काय करणार? भाषा तरी काय करणार आणि कवित्व तरी काय करणार? हा प्रसंगच तसा अद्‌भुत व कल्पनातीत आहे. शंभर रंगांचे पेले मांडून शंभर कुंचल्या घेऊन आपल्या शंभर हातांनीं जरी काव्यदेवी सरस्वती या प्रसंगाचें चित्र रंगवूं पाहील तरी एका क्षणानंतर तिची मति गुंग होऊन तिला निस्तब्ध व्हावें लागेल. मग सरस्वतीचीं खिल्लारें राखणाऱ्या घोंगड्या कविवृंदांचें बल कोठवर टिकाव धरणार? येथें लेखक–आणि वाचक--वक्ते आणि श्रोते--यांनीं क्षणभर तरी आनंदांत लीन होऊन विरामच केला पाहिजे.

झालें. मुरलीनें भगवंताच्या अधरांशीं आपले अधर लावून अमृतपानास आरंभ केला. देवलोकींच्या अमृतबिंदूनें मृत सजीव होतात. पण येथें तर प्रत्यक्ष देवमुखींचें अमृत स्रवूं लागलें. नव्हे नव्हे–प्रचंड पर्जन्य धारां–प्रमाणें अमर्याद वर्षूं लागलें. मग त्या निर्जीव वेणूनें किती वेळ निर्जीव रहावें! ती एकदम जिवंत झाली–ती स्वराज्याची मुरली एकदम जिवंत झाली. तिच्यांत ईश्वरी चैतन्य संचरलें-तिच्या रोमरोमाच्या ठिकाणीं दैवीशक्ति खेळूं लागल्या. ती स्वतः चैतन्यमय झाली आणि तिनें सर्व आसमंतात्भागहि पूर्ण चैतन्यमय केला. हे स्वराज्याच्या मुरलींतून बाहेर पडणारे मधुर ध्वनि वाहून नेतां यावेत ह्मणून वायूनें आपले पंख पसरले,

आणि आकाशानें आपल्या अनंत चरणांना गति दिली. हे ध्वनि कानीं पडावेत ह्मणून पाषाण हलूं लागले—वृक्ष चालूं लागले—नदीनाले बोलूं लागले. सर्व जडसृष्टि चैतन्यमय झाली. मूकसृष्टि वाङ्मय झाली—पण——

पाषाण हलूं लागल्यावर प्राणी कसे स्वस्थ बसणार आणि मुके पदार्थ बोलूं लागल्यावर वाग्देवीच्या प्रसादास पात्र झालेले बोलके जीव घुमे कसे राहणार ? **प्रत्येकास वाचा फुटली**—प्रत्येकास वक्तृत्वाचें स्फुरण चढलें—प्रत्येकजण कांहींना कांहीं उद्गारूं लागला. कोणी इतरांशीं बोलले कोणी आत्मगत भाषणेंच केलीं. कोणी सजीवांस उपदेशूं लागले—कोणी निर्जीवांच्याच कानांत स्वराज्याचा मंत्र सांगूं लागले. कोणी अनेकांतांत व्याख्यानें आरंभिलीं--कोणी एकांतांत वाक्तांडव सुरू केलें. कोणी उजेडांत मारा केला--कोणी अंधारांत हल्ले करून किल्ले सर केले. एवंच जिकडे तिकडे—घरीं दारीं—आंत बाहेर सर्वत्र अंतःकरणें आणि जिव्हा हलूं लागल्या—बोलूं लागल्या आणि चालूं लागल्या.

मुरलीचें नादनृत्य सुरू झालें, स्वराज्याचे गोडस्वर एकामागून एक निघूं लागले, व दाहीदिशांच्या मार्गानें आक्रमण करूं लागले. त्यांनीं वृंदावन ओलांडिलें—त्यांनीं गाईंच्या खिल्लारांत प्रवेश केला—गोवत्सांचे कळप गांठले—अखेरीस त्यांनीं नगरांतूनहि आपली स्वारी चालविली. एकंदरींत नगरें वनें—मैदानें मंदिरें—सर्व कांहीं त्यांनीं व्यापून टाकलें. गाईंचे कान टवकारून उभे राहिले—वत्सांच्या शेंपट्यांचे गोंडे कंदुकांप्रमाणें उड्या मारूं लागले. गाई दावणींतून दांवीं तोडून स्वराज्याच्या वेणूनादाच्या धोरणानें मुरलीधराचा शोध काढीत धांवत आल्या. वासरांनीं तर हलकल्लोळ उडवून दिला. बिचारे वृद्ध गोपाल व गोपाधिकारी घाबरून गेले. गाई पिसाळल्या ह्मणून कोणी ह्मणूं लागले. वासरें बिघडलीं ह्मणून कोणी ह्मणूं लागले. दोऱ्या घेतल्या. दांवीं घेतलीं—दांडकीं घेतलीं. गाई आणि वासरांचा पाठलाग सुरू झाला. पुढें गाई मागें वासरें आणि त्यांच्या मागें गोपाधिकारी अशी ‘ रेस ’ सुरू झाली. “ हो हो ” ह्मणून आरोळ्या उठूं लागल्या—“ गंगेजमने ” ह्मणून नामावल्यांचे पाठ सुरू झाले. आडवीं तिडवीं धांवणीं सुरू झालीं—क्वचित् दगडमार—क्वचित् दंड-

प्रहारहि झाले. सर्व कांहीं झालें. पण उपयोग काय ? गाई उधळल्या त्या उधळल्या व वासरें पळालीं तीं पळालींच. क्वचित् एखादी लंगडी गाय अथवा एखादें छोटेसें वासरूं हातीं लागलें. पण तींहि सुखासुखी घराकडे वळलीं नाहींत. त्यांनीं दांडगाई करून त्या आधींच हाडांचे सांपळे बनलेल्या गोपांची चांगलींच हाडें खिळखिळीं केलीं. शिव्याशापांचा वर्षाव सुरू झाला. भगवंतास व त्याच्या मुरलीस शिव्याशापांची महापूजा बांधण्यांत आली—गोपालांना नुस्ता थोडाथोडा प्रसादच मिळाला. पण मुरलीचें गायन कांहीं बंद पडलें नाहीं. ती एकामागून एक नवे नवे सूर व नवे नवे राग आलापीतच चालली.

## चहांत मीठ

घातलें असतां चहाला फारच लज्जत येते ह्मणतात त्याप्रमाणें या शिव्याशापांच्या कर्कश स्वरानें मुरलीचा स्वर जास्तच गोड वाटूं लागला. गोपाल तल्लीन झाले—गाई तल्लीन झाल्या—गोवत्स तल्लीन झाले. आणि इतकेंच नव्हे तर गोकुलवृंदावनाच्या मंदिरामंदिरांतून गृहकृत्यांत निमग्न झालेल्या गोपाधिकाऱ्यांच्या बायका गोपी यांचेंहि भान सुटलें. नवरे गाईच्या व वासरांच्या मागें लागलेले पाहतांच संधि साधून गोपींनींहि पळण्यास सुरवात केली.

## स्वराज्याची मुरली

आधींच अत्यंत श्रवण—मनोहर ! सुस्वरांची खाण-- रागरागिण्यांनीं तुडंबलेली तरंगिणी आणि त्यांत भगवान् टिळकासारखा गानकुशल वाजविणारा. मग ती बहार काय सांगावी ? स्वराज्य संगीतांतील नानाविध रागरागिणी मूर्तिमंत डोळ्यांपुढें नाचूं लागल्या. मुरली वाजूं लागली—गाऊं लागली— बोलूं लागली. सर्व आकाशमंडळ मधुमधुर आलापांनीं कोंदून गेलें. मोठा आनंद उडाला. प्रत्येक आलापानें व आनंदलहरीनें एकेक तरी लग्नाची अगर बिन लग्नाची पण लग्नासारखी वागणूक करणारी गोपी गोपांच्या घरांतून बाहेर काढण्याचा सपाटा चालविला. आपण परस्वाधीन आहोंत, याची गोपींना शुद्धच राहिली नाहीं. त्यांनीं लाज सोडली—भीति सोडली—अहंता सोडली. त्यांना पति नकोसे झाले—आप्त नकोसे झाले—इष्ट नकोसे झाले. त्यांचें सर्व लक्ष

मुरलीनें वेधलें. भगवंतावर बालंटें घेणाऱ्या–भगवंतावर नसतीं कुभांडें रचणाऱ्या–भगवंताचीं गाऱ्हाणीं सांगणाऱ्या–भगवंताशीं भांडणाऱ्या तंडणाऱ्या--भगवंताच्या नांवानें बोटें मोडणाऱ्या भगवंतास 'दांडगा' ह्मणणाऱ्या भगवंतास 'नाटकी' ह्मणणाऱ्या–भगवंतास–'खोडकर' ह्मणणाऱ्या–भगवंतास टाळणाऱ्या–भगवंतास चुकविणाऱ्या–भगवंताचें 'निसंतान' चिंतिणाऱ्या–भगवंतास रौरवगति इच्छिणाऱ्या–झाडून साऱ्या गोपी या वेळीं त्या मुरलीवर मोहित होऊन भगवंताच्या दर्शनास घरेंदारें सोडून व्रजवनाच्या मार्गानें सैरावैरा धांवत सुटल्या. कोणाची वेणी फणी राहिली--कोणाचें काजळकुंकू राहिलें– कोणी अर्ध-स्नातच पळाल्या–कोणाला कंचुकीच्या गांठी पाडण्यास अवसर मिळाला नाहीं–कोणाचीं भांडींच चुलीवर चढलीं नाहींत–कोणाचीं आधणेंच आटत पडलीं--कोणाचीं शिजलेलीं भांडीं उकरलींच गेलीं नाहींत--कोणाचें वाढप खळलें– कोणी घांसच तोंडांत घालण्याचे विसरल्या– कोणी हातच धुतले नाहींत–कोणी पतीकरितां तयार केलेला त्रयोदश गुणी तांबूल पतीस न देतां तसाच हातांत घेऊन पळाल्या–कोणाचीं मच्छरदाणीच्या आंतील व्याख्यानें बंद पडलीं–असा मारून सारा

गोकुळांत गोंधळ

उडून गेला. नवरे रागावले–सासवांनीं आदळ आपट सुरू केली–नणंदा अद्वातद्वा बोलूं लागल्या--पण गोपींचे डोळे हा तडफडाट पाहिनात –त्यांचे कान हा जळजळाट ऐकेनात–त्यांचें देहभान जें एक वेळ नाहींसें झालें तें कायमचेंच नाहींसें झालें. एका नवऱ्यानें आपल्या लाडकीस विचारलें "हा कोण?" दुसऱ्यानें दटावलें "काडी मोड करीन" तिसऱ्यानें धमकी दिली "घर उन्हांत बांधीन" चवथा चडफडूं लालला "बा को बेमान झाली." पांचवा रडूं लागला "बायकोनें कलिजा कापला." पण सारें पालथ्या घड्यावर पाणी. मुरलींतून आलाप निघाला "हे तुमचे नोकर आहेत" गाई स्वतंत्र झाल्या–वासरें मोकळीं सुटलीं आणि बायका नवरे बनल्या. मुरलींतून आलाप निघाला "ही वेळ आहे." सर्वांचीच भंादल उडाली. मुरली उद्गारलीः–"हिंदुस्थानचा

भाग्योदय जवळ आला." सर्वांस आनंदाचें भरतें आलें. मुरली सांगूं लागली:—"द्रव्ययज्ञ करा—प्राणयज्ञ करा—आत्मयज्ञ करा—" सर्वांस आवेशाचें स्फुरण चढलें. मुरली ह्मणाली "स्वराज्य तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे." सर्व जिव्हा बोलूं लागल्या:—"तर मग तो आह्माला मिळालाच पाहिजे." मुरलीनें भाक दिली:—"ईश्वर तुमचा पाठिराखा आहे." सर्वांचे डोळे आत्मविश्वास दाखवूं लागले. असे एक का दोन-किती ह्मणून परिणाम वर्णन करावेत! सारेंच अभिनव--दरवेळीं नवा राग-नवा सूर—नवा आलाप—नवी तान इतका लोकोत्तरपणा असल्यावर गाई काय—वांसरें काय अगर गोपगोपी काय? सर्वांनीं वेडावून जाऊं नये तर काय करावें? एकीचा हार गळ्यांतून तुटून पडला—दुसरीचा पदर कोरांटीस गुंतला—तिसरीची फुलांची परडी सांडली—पण एकीलाहि याची वार्ता लागली नाहीं. कोणी तर भांडून घराबाहेर पडल्या— कोणी पुनः घराचें तोंड पाहणार नाहीं असा रोखठोक जबाब दिला-- कोणी अलंकार फेंकून दिले— कोणी नवीं वस्त्रें टाकून जुन्याच वस्त्रांनिशीं रस्ता चालूं लागल्या.

आतां गोपगोपी, गो व गोवत्स या सर्वांचा मेळा कुंजवनांत दाखल झाला. सारें गोकुळ ओस पडलें. घरें स्मशानासारखीं दिसूं लागलीं. काय हें वेड! घरेंदारें--टाकून बाहेर जंगलांत उपाशी तापाशी उन्हातान्हांत भटकत हिंडणें म्हणजे केवढा मूर्खपणा हा! मिजास नाहीं, मान नाहीं, मौज नाहीं, सारा अंगारी अंगार. लहान नाहीं, मोटा नाहीं. गरीब नाहीं श्रीमंत नाहीं. विद्वान नाहीं, अविद्वान नाहीं, सारा एकंकार. काय या खुळाला म्हणावें? पण हा भाग्योदयाचा दिवसच असा चावट! तो उगवला कीं सारीकडे असेंच प्रेमाचे—एकीचे—वेडे वेडे चार सुरू होतात. मुलें बायांना सोडतात—बायका नवऱ्यांना टाकतात. दास धन्याला जुमानीनासे होतात. भूकंपाप्रमाणें हा सारी सृष्टीच उलटीतिलटी करून टाकतो. जिथें पाणी नसतें तिथें पाण्याचे समुद्र तयार होतात. जेथें जमीन नसते तेथें सुंदर भूमाग वर येतात. जिवंत असतात ते मरतात, मेलेले जिवंत होतात. पांगळे चालू

लागतात—पंजाब-मेलच्या गतीनें धावणारे पांगळे होतात. समुद्र वर येतात, पर्वत गडप होतात. नद्या आटून जातात, वाळवंटांत झरे फुटतात. माणसांचीं जनावरें होतात—व जनावरांत माणुसकी येते. वास्तविक स्वराज्याच्या मुरलीचा नाद ऐकून पशूंनीं धावत यावें आणि माणसांनीं दूर कां पळावें? बायकांनीं वनवास पत्करावा व पुरुषांनीं घरकोंबडे कां बनावें? नामर्दास मर्दुमकी यावी आणि मर्द म्हणविणारांनीं भिऊन कां जावें? खरें पाहिलें तर असें होण्याचें कांहींच कारण नाहीं. पण हा भाग्योदयच हें सर्व करीत आहे. यानेंच दुर्भाग्यांना भाग्यवान् केलें आणि भाग्यवंतांचें कपाळ फोडलें.

## मुरली वाजली

व मुरलीनें बहुजन समाज रंगून गेला. पण कांहीं कपाळ करंटे जिवंत असून मेल्यासारखेच घोरत पडले. या भाग्योदयानें त्यांना जागें केलें नाहीं. आणि तें कां! श्रीरामचंद्रानें शिला उद्धारली, वृक्षपाषाणादिकांना मोक्षास चढविलें. पण ती शिला अहिल्या होती आणि ते वृक्षपाषाणादिक महान् तपस्वी होते. रामप्रभु पतितपावन होते. पण पावन होऊं इच्छिणारांनीं प्रथम खरे खरे पतित झालें पाहिजे. अहंकारानें कंटाळलेले—स्वार्थानें विटाळलेले--हे खरे पतित नव्हेत. अहंकारापासून च्युत् झालेले व स्वार्थास विमुख झालेले तेच खरे पतित व पावन होण्यास खरे पात्र होत. भाग्योदय सुद्धां अशांच्या तपश्चर्येलाच फलद्रूप करतो. गोपाल मुरलीकडे कां खेचले गेले? गोपी मुरलीकडे कां खेचल्या गेल्या? गाई व वासरें हीं सुद्धां कां खेंचलीं गेलीं? कारण भगवंताच्या मुरलींतील ध्वनि त्यांच्या अंतःकरणांत मुरून त्यांचे झरे होण्याच्या पंथास लागले होते. रसिकावांचून काव्याची प्रौढी काय? काव्य असावें—रसिकता असावी गायन असावें मर्मज्ञता असावी—व्याख्यान असावें—आणि अंतःकरण असावें तरच रंग चढतो आणि बहार उडते. सद्गुरु आले--सच्छिष्य मिळाले. मग तेथें ब्रह्मानंदास काय कमी? गाईंना गाण्याचा कान होता—पण कांहीं माणसांना नव्हता त्याला काय करावयाचें! हें त्यांचें दुर्दैव होय. भाग्योदय ह्मणजे काय? ह्मणज हेंच. या संगमालाच भाग्योदय ह्मणतात. मुरलीनें वाजावें

आणि गोपींनीं वेडें व्हावें याचेंच नांव भाग्योदय भगवानानें यावें आणि भक्तांनीं त्याच्या भोंवतीं गोळा व्हावें याचेंच नांव भाग्योदय. शिळेंत अहिल्या असावी आणि रामाचा पाय शिळेस लागावा याचेंच नांव भाग्योदय. निखाराच फुंकून निखारा होतो. कोळसा हा निखारा होत नाहीं. निखारा असावा पण फुंकर मिळूं नये अगर फुंकर पडावा पण कोळशावर पाडावा याला दुर्भाग्य म्हणतात. पण फुंकर व निखारा यांचा योग तोच भाग्योदययोग. आणि वऱ्हाडनागपुरांत लोकमान्यांनीं संचार केला तेव्हां याहून निराळें काय दिसलें ? लोकमान्यांच्या चरणीं वऱ्हाडनागपुरनें केलेलें सर्वस्वदान भाग्योदय सूचित करीत नाहीं काय ? लोकमान्यांनीं सव्वालक्ष मिळविले. पण त्यापेक्षांहि अनेक लक्षाचें मिळून एक झालेलें हें जनतेचें ' लक्ष ' अधिक आहे. लोकमान्यांनीं अनेक मैल भूमि आक्रमिली पण ही वीतभर मनोभूमि आक्रमण करण्याचें पुण्य निःसंशय अधिक आहे. लोकमान्यांनीं अनेक व्याख्यानें दिलीं--असंख्य वाक्यें उच्चारलीं--अगणित शब्द उपयोगांत आणले. पण त्यांनीं जनतेच्या अंतःकरणास ' हिंदुस्थान मी आहे ' हे जे तीन बोबडे शब्द बोलावयास लावले--त्याचा प्रभाव शतपटीनें सहस्रपटीनें अधिक आहे.

---

## प्रकरण ३ रें.

# बेइमान होऊं नका !

( पुलगांव. )

मोटारींचा प्रवास तूर्त संपल्यामुळें मोटारवाल्यांस प्रेमाचा निरोप देण्यांत आला व वऱ्हाडची मर्यादा जें मूर्तिजापूर शहर तें से.ड. ण्याची तयारी झाली. तेथील व्याख्यानसभारंभानंतर जेवणखाण आटोप-

तांच लोकमान्यादि मंडळी ता. १३-२-१९१८ रोजीं दुपारीं १॥ वाजतां पॅसेंजर गाडीनें पुलगावांस जावयास निघाली.

या ठिकाणीं श्री. नारायणराव वैद्य मध्यप्रांतामधील दौऱ्याकरितां येऊन मिळाले. मूर्तिजापूरानंतर प्रत्येक स्टेशनावर तिलकस्वागताकरितां हजारांनीं लोक जमा झाले होते. माना येथें श्री. शामराव यादवराव देशमुख यांनीं पानसुपारी केली. बडनेरा येथें उमरावतीहून तिलकचरणवंदनार्थ श्री. बळवंतराव खापर्डे, संभाजीराव गोखले, नारायणराव बामणगांवकर, गुलाबराव बक्षी वगैरे गृहस्थ मुद्दाम आले होते. त्यांपैकीं रा. बामणगांवकर हे दौऱ्यांत सामील झाले. टिमटाला, मालखेडें येथेंहि पानसुपाऱ्या थाटाच्या झाल्या. श्री. शेट सावजी व अंजनसिंगीचे श्री. टिकमदास यांनीं बामणगांवास परत येतांना उतरण्याचा अत्याग्रह केला. पुलगांव येथें ४॥ वाजल्यावर गाडी येऊन पोंचली. छोटीशी मिरवणूक झाल्यावर शेट हिरालाल रामगोपाळ यांच्या बंगल्यामध्यें उतरण्यांत आलें व सायंकाळीं ६ वाजतां त्याच बंगल्यासमोराल पटांगणांत व्याख्यानसमारंभ झाला. सभास्थानचें व्यासपीठ व्याख्यानाच्या धर्तीवर नसून तें प्रवचनाच्या धाटणीवर होतें. श्रोतृसमाज ५-६ हजार होता. आतांपर्यंत झालेल्या दौऱ्यांत लोकमान्य इतके थकून गेले होते कीं त्यांस व्यासपीठावर चढण्यास काठीचा व अंतुकाकांच्या हाताचा आश्रय घ्यावा लागला. श्री. माधवराव पाटील यांच्या सूचनेवरून ऑनररी मॅजिस्ट्रेट शेट बाळकिसनदास यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें व त्यांनीं आपल्या छोट्याशा प्रास्ताविक भाषणांत लोकमान्यांचे मनःपूर्वक आभार मानले. नंतर नागपुरचे सुप्रसिद्ध कविवर्य श्री. ताम्हनकर यांचें स्फूर्तिदायक पद्यगायन झाल्यावर स्वागत करतांना श्री. माधवराव पाटील म्हणाले:—" आजचा दिवस फार भाग्याचा उगवला आहे. आम्ही यथायोग्य स्वागत करण्यास असमर्थ असलों तरी आमची तिलकभक्ति कांहीं कमी तळमळीची नाहीं हें खास. आतां लोकमान्यांची ओळख करून देणें म्हणजे सूर्याचीच ओळख करून देण्यासारखें आहे. लोकमान्यांवर संकटें अनेक आलीं पण त्या सर्वांना त्यांनीं मोठ्या धीरवृत्तीनें तोंड दिलें आहे. अशा श्रेष्ठ राष्ट्रभ-

त्यांचे पाय ज्या गांवाला लागले, तेथील मंडळी स्वतःस मोठी भाग्यवान समजली तर त्यांत नवल तें काय ? ( टाळ्या. ) या नंतर प्रस्तावनेदाखल श्री. खाडीलकर यांचें भाषण झाल्यावर

## लो. टिळक म्हणाले

" आतां रा. खाडीलकर यांनीं हल्लींच्या परिस्थितीचें विवेचन केलेंच आहे. त्याला फक्त पुरवणीदाखल मी दोन शब्द बोलणार आहें. आजचा काळ आणीबाणीचा आहे. यावेळीं तुह्मी हातपाय हालवणार नाहीं तर तुमच्या देशाची धडगत लागणार नाहीं. हिंदी राष्ट्रापुढें स्वराज्याचें ध्येय प. पू. पार्शी देशभक्त दादाभाई यांनीं १९०६ सालीं कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून जाहीर केलें. मध्यंतरीं अनेक विघ्नें आलीं, पण तीं सर्व लयाला जाऊन आजचा हा स्वराज्यानुकूल काल प्राप्त झाला आहे. स्वराज्य म्हणजे काय ? आपल्या घरचा कारभार आपण पहाण्याचा अधिकार मिळणें. मग ह्या हिंदुस्थानदेशाचा कारभार कोण पाहतो ? नोकरशाही. आतां हा देश नोकरशाहीचा आहे कीं तुमचा ? देश तुमचा, कर देणार तुम्हीं, मग हे नोकर मालकांसारखें कां वागतात ? झालें काय, गिरणीमध्यें विव्हिंगमास्तर म्हणून जो गृहस्थ नेमला तोच हळूहळू गिरणीवर ताबा चालवूं लागला ! ( टाळ्या. ) अधिकारी हे स्वतःला नोकरच म्हणवून घेतात पण वागतात मात्र मालकासारखे ! ! या नोकरांनीं गेलीं १०० वर्षें कारभार चालविला, पण त्यांनीं आपल्या अविश्वासाच्या धोरणानें सर्व लोक नामर्द करून सोडले. आतां जेव्हां खुद्द साम्राज्यावरच भयंकर प्रसंग आला तेव्हां कोठें विलायतसरकारचे डोळे उघडले ! पावसाळा आला व पाऊस पडूं लागला म्हणजे घराचें गळतें कळतें—घरावर पाण्याचे हंडे ओतून कांहीं कोठें घर गळतें तें कळणार नाहीं. ( टाळ्या. ) या नोकरशाहीला साम्राज्यानें पांचपंचवीस लाख तरी सैन्य द्या म्हणून म्हटलें पण सैन्य आहे कोठें ? ३० कोटी लोकांतून इतकेंसुद्धां जेव्हां सैन्य मिळेना, तेव्हां ' हा कारभार आहे तरी काय ' हें पहावयास मॉंटेग्यु साहेब धांवून आले. मॉंटेग्युसाहेबांनीं भर पार्लमेंटांत जाहीर सुद्धां केलें कीं ' हिंदुस्थानास स्वराज्य देणें इष्ट आहे.' आज स्वराज्य

द्यायचें की नाहीं हा वाद नाहीं. वाद आहे तो इतकाच की पाहिला हप्ता केवढा द्यावयाचा ? आम्ही म्हणतों की काँग्रेसनें ठरविलेला पाहिला हप्ता तरी आज द्या. आज अनुकूल परिस्थितीनें नोकरशाहीची मूठ इतकी सैल झाली आहे की एक बारीकसा हिसका द्याल तरी त्यांतून स्वराज्य गळून पडेल ! ( टाळ्या. ) ही वेळ गेली तर पुन्हा अशी वेळ येणार नाहीं. आतां स्वराज्याचा तंटा विलायतेस चालणार आहे, तेथें तुमचे वकील हजर पाहिजेत. माणसें असाल व वेळेची किंमत कळत असेल तर आपोआप प्रयत्नाला लागला ! माझी आपणांस प्रार्थना इतकीच आहे की यत्न करा व देशमातेशीं बेइमान होऊं नका. '' ( टाळ्यांचा गजर. ) नंतर ७०० रु. ची थैली समर्पण करण्यांत आल्यावर स्वयंस्फूर्तीनें जागच्याजागीं अनेकांनीं देणग्या दिल्या. स्फूर्तीला चेतविण्यासाठीं दे. भ. शिवाप्पा यांनीं आपल्या गळ्यांतील देवतेचें रौप्यलिंग देणगीदाखल स्वराज्यदेवतेच्या पायीं वाहिलें. ( टाळ्या. ) शेवटीं एक महार गृहस्थ पुढें येऊन म्हणाला:—'' महाराज, आमच्यावरील एवढा विटाळ काढा. '' लोकमान्य म्हणाले:—'' आम्ही तुम्हांला परकी मानीत नाहीं. '' अध्यक्ष म्हणाले:—विटाळ निकल गया ! '' हारतुरे होऊन समारंभ खलास झाला. मंडळीची तैनात श्री. माधवराव व तुकारामराव पाटील यांनीं स्वतः ठेविली होती. त्यांच्या पाहुणचारानें व दक्षतेनें मंडळी खूष झाली. याठिकाणीं दे. भ. निळकंठराव देशमुख दौऱ्यांत सामील झाल्यानें फार मौज आली. पुलगांवची एकंदर थैली १३०० रु. झाली.

## ( प्रकरण ४ थें )

# यांत राजद्रोह कसला ?

## ( आर्वी )

ता० १४ रोजीं सकाळीं ८ वाजतां लोकमान्य टिळक पुलगांवहून छोट्या रेल्वेनें आर्वी येथें जावयास निघाले. येथें ब्रॅ. अभ्यंकर देशमुख वगैरे मंडळी येऊन मिळाली. वाटेंत वेरूळ, रोहणा येथें थाटाच्या पानसुपाऱ्या झाल्या. धनोडी येथील समारंभ फारच अपूर्व होता. स्टेशनानजीकच्या निर्जन शेतामध्यें खालची जमीन साफसूफ करून एक भव्य मंडप उभारला होता. मंडपाची शोभा झालरी कमानींनीं वृद्धिंगत केली असून मुद्दाम तयार केलेल्या तात्पुरत्या मार्गभर केळींचीं सुंदर तोरणें बांधलीं होतीं. मार्गावर शंखाच्या वेलींतून ' टिळकमहाराजकी जय ! ' अशीं सुमनें गुंफल्यामुळें अपूर्व शोभा आली होती. मंडपामध्यें लोकमान्यांना वाजत गाजत नेण्यांत आल्यावर ३।४ हजार श्रोतृसमुहापुढें लोकमान्यांनीं ४।५ मिनिटें स्वराज्योपदेश केला. गांवोगांवाहुन जमा होऊन स्टेशनावरसुद्धां एवढा थाट उडवून दिला तेव्हां लोकांच्या तिलक-प्रेमाची कमालच झाली ह्मणावयाची !

आर्वी येथें लोकमान्य टिळक श्री. चिपलुणकर वकील यांच्या बंगल्यांत उतरले होते. इतर मंडळी शालिग्रामाच्या धर्मशाळेंत उतरली होती. जेवणें वगैरे आटोपल्यावर शेट नारायण लालजींच्या कंपौंडांत व्याख्यान समारंभ झाला. श्रोतृसमुदाय २० हजारांवर असून त्यांची व्यवस्था लावतां लावतां व्यवस्थापक थकून गेले. वेळ उन्हाची असल्यामुळें सावलीसाठीं फार मोठा मंडप उभारला होता. मंडपाचा एकंदर शृंगार ' अप् टुडेट ' असून अग्रभागीं भलें मोठें व्यासपीठ थाटलें होतें.

डाव्या हाताला चिकाच्या पडद्यांमध्यें स्त्रीजनांची बसण्याची व्यवस्था केली होती. सभास्थानीं श्री. रामराव देशमुख, नारायणराव देशमुख, रघुनाथराव देशपांडे इ. ऑनररी मॅजिस्ट्रेट व श्री. दादासाहेब उधोजी हे प्रमुख होते. शेट खुशालचंद हे स्वागत मंडळाचे अध्यक्ष होते. प्रथम श्री. रामभाऊ अभ्यंकर ह्मणाले:—" आजचा समारंभ हा आर्वीच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखा आहे. आज येथें प्रत्यक्ष स्वराज्यमूर्ति अवतरली आहे. लोकमान्य व स्वराज्य यांचा एकजीव झालेला नाहीं काय? परवांच अर्धचंद्रोदयपर्व झालें, पण आज मी तुह्मांस पूर्णचंद्रोदयपर्व दाखविणार आहें. लोकमान्य हे पूर्णचंद्र तर आहेतच पण सूर्याप्रमाणें तेजस्वीहि आहेत. अशा तेजस्वी पुरुषाच्या व्याख्यानप्रसंगीं तसाच मोठा करारी व तेजस्वी नियंता पाहिजे ह्मणून मी सूचना करतों कीं ३२ गांवचे मालगुजार श्री. अंबादासपंत उर्फ बाळासाहेब देशपांडे यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें " ( टाळ्या ) या सूचनेस रा. अगस्ते यांचें अनुमोदन मिळून टाळ्यांच्या गजरांत अध्यक्ष स्थानापन्न झाले. नंतर रा. ताह्मनकर यांनीं खालील पद्य गायिलें.

**पद्य चालः—( प्रतिकूल होईल. )**

वंदितों गुरो श्री तिलका तुला प्रेमभावें ।
स्वागतास या स्फूर्तीच्या गोड करुनि घ्यावें ॥ धृ० ॥
तपत्रय आह्मांसाठीं तूं प्रभो शीणलासी ।
ज्ञानदीप उजळुनि आम्हां मार्ग दाविलासी ॥
चुकविलीस हांसी अमुची उदार स्वभावें ॥ १ ॥
दास म्हणुनि मुकलों होतों अम्हीं धनिपणास ।
विश्वसुनि परावरि केला अह्मीं स्वकियनाश ॥
कृपा छत्र विसरुनि आह्मां त्वरें पदरिं घ्यावें ॥ २ ॥
प्राण गेलिया तव आज्ञा कधींही न मोडूं ।
सत्व रक्षणीं सर्वस्वावरी उदक सोडूं ॥
स्वराज्य ध्वजाखालीं त्वां अह्मां शीघ्र घ्यावें ॥ ३ ॥

भेद भाव नडति न अह्मां या स्वराज्य कार्जी ।
परस्पर सुखें क्षणिं होऊं अम्हीं पूर्ण राजी ॥
बाजि राखुं कीं रणगाजी जनिं आम्हां ह्मणावें ॥ ४ ॥
अमोलिक असें त्रिभुवनिं हें सुस्वराज्य रत्न ।
मिळवुं शीघ्र त्वत्पद पुण्यें करुनी थोर यत्न ॥
महाराष्ट्र कर्तृत्वें या जगत् चकित व्हावें ॥ ५ ॥
त्वत्समान नेता असतां स्वदेशाभिमानी ।
आम्हांसाह्य निर्वाणीं ती अंबिका भवानी ॥
कां स्वराज्य साम्राज्यहितीं अह्मां ना मिळावें ॥ ६ ॥
शर्थ करुनि स्वातंत्र्याचें अम्हीं सौख्य चाखूं ।
प्रयत्नेंच पौर्वात्यांचा पूर्णमान राखूं ॥
स्वत्वरक्षणीं चहुंराष्ट्रीं अह्मां अनुसरावें ॥ ७ ॥

पद्य गायनानंतर श्री. रामचंद्र वासुदेव अभ्यंकर यांनीं केसरी-चिन्हांकित सुंदर रौप्यकरंडकांतून मानपत्र अर्पण केलें.

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक.

यांस.

आम्ही आर्वी तहसिलीचे रहिवाशी अत्यंत प्रेमानें, व आदरानें, आपलें स्वागत करितों. आपली प्रकृति अतिशय नादुरुस्त असतांना, इतक्या दूरच्या प्रवासाचे कष्ट सोसून, आपण आह्मांस आपल्या स्फूर्तिदायक दर्शनाचा लाभ दिला; याबद्दल आह्मांस वाटणारी कृतज्ञता कोणत्या शब्दांनीं व्यक्त करावी, हें आह्मांस सुचत नाहीं. तथापि भाषेची उणीव आपल्यासंबंधानें आमच्या हृदयांत वसणाऱ्या भक्तीनें भरून निघेल, असा आह्मांस भरंवसा आहे.

आपण आपलें सर्व आयुष्य भरतभूमीच्या उद्धारार्थ खर्च करून, महाराष्ट्राला किंबहुना सर्व हिंदुस्थानाला कायमचे ऋणी करून ठेविलें आहे.

आपली असाधारण विद्वत्ता, असामान्य बुद्धिमत्ता, अविरत उद्योग, आणि कर्तव्यतत्परता, साधु पुरुषांसहि आदर्शभूत अशी सरळ व निष्कपट वृत्ति, मनाचा मोठेपणा व आचरणाचा साधेपणा, आणि या सर्व सद्गुणापेक्षां सध्याच्याकाळीं दुर्मिळ असें आपलें धैर्य, तेजस्विता, करारीपणा शील, इत्यादि अनेक सद्गुणसमुच्चयामुळें आपण हिंदुस्थानांत '**एकमेवाद्वितीयम्**' या वर्णनाला पूर्णपणें पात्र झाला आहांत. हिंदुस्थानांत प्रजापक्ष निर्माण करण्याचें, आणि जनतेला आपल्या निसर्गसिद्धहक्कांचें यथातथ्य ज्ञान देण्याचें श्रेय सर्वस्वी आपल्याला आहे. लोकांत स्वदेश, स्वधर्म, व स्वभाषा, याविषयीं अभिमान आपल्या लेखणीनें, भाषणानें, आणि स्वसुखाविषयीं निरभिलाष वृत्तीनें, कारागृहवासासारख्या खडतर अपेष्टा भोगून, आपण सर्व देशभर, जागृत केला; आणि त्यांच्या अंतःकरणांत आशा, उत्साह, व धैर्य, उत्पन्न केलें. विपरीत परिस्थितीच्या कचाट्यांत व अज्ञानाच्या अंधकारांत गुरफटलेल्या समाजाला आपण सुस्थितीचा मार्ग दाखविला, आणि भेदनीतीच्या कारस्थानांना दाद न देतां प्रजापक्षाला हिमतीनें पुढें नेले, हें आपले सर्व समाजावर अवर्णनीय उपकार झाले आहेत.

आपण उपदेशिल्याप्रमाणें स्वराज्यध्येयाचा पहिला हप्ता ह्मणून, **कॉंग्रेस** व **मॉस्लेमलीग** यांनीं जी योजना तयार केली आहे, **ती संपूर्ण ताबडतोब** मिळाल्या खेरीज आमचें समाधान होणार नाहीं; आणि स्वार्थी लोकांच्या बोलण्याकडे लक्ष देऊन, किंवा दुसऱ्या कोणत्याहि सबबीवर सरकारानें जर ती हिंदुस्थानची एकादिलाची मागणी दिली नाहीं, तर ती प्राप्त करून घेण्यासाठीं आपणास आम्हीं सर्व प्रकारची मदत करूं. सांप्रत कांहीं ठिकाणीं जातिभेदादिकांचें जें थोतांड माजाविण्यांत येत आहे, तें सर्वस्वी घातुक असून त्याचा दुष्परिणाम घालविण्याचे कार्यांत आम्हीं सर्व जातीचे लोक आपणास मदत देण्याचें अभिवचन देतों.''

यानंतर सौ. यमुनाबाई चिपळूणकर यांनीं जरीच्या कांठानें मढविलेल्या हातरुमालावर कोरलेलें मानपत्र अर्पण केलें.

# भारत भूमीचे सुपुत्र लो० बाळ गंगाधर टिळक, यांस,

आर्वी तहसिलींतील एकंदर स्त्रीसमाजातर्फे आम्हीं अत्यंत प्रेमानें व आदरानें आपलें स्वागत करतों.

हिंदुस्थानच्या कल्याणाकरतां आपण जी स्वराज्याची मोहीम सुरू केली आहे, तिला आम्हां स्त्रीसमाजाचीही पूर्ण सहानुभूति आहे, व आम्हीं जन्मतः अबला असलों तरी त्या कामाकरितां शक्य व योग्य असलेला स्वार्थत्याग करण्यास अंतःकरणपूर्वक तयार आहों; व या स्वार्थत्यागाची खूण म्हणून जी लहानशी देणगी आम्हीं आपणास आजरोजीं देत आहों, तिचा आपण स्वीकार कराल अशी आम्हांस आशा आहे.

एकंदर हिंदी स्त्रीसमाजामध्यें शिक्षणाचा बराच अभाव आहे, व अलीकडे प्राथमिक शिक्षणाची जरी सारखी वाढ होत आहे. तरी हल्लींचें स्त्रीशिक्षण स्वराज्यध्येयाला मुळींच पोषक नसून, आर्यसंस्कृति व परंपरा यांच्याशीं अगदींच विसंगत आहे. तेव्हां वरील ध्येयाला पोषक अशा स्त्रीशिक्षणाचा आमचेमध्यें सारखा फैलाव होऊन, आपणासारखे सुपुत्र जन्माला यावे, व असल्या सुपुत्रांची माता म्हणवून घेण्याचें आम्हांपैकीं कांहींना तरी भाग्य प्राप्त व्हावें, अशी आमची परमेश्वरापाशीं सविनय प्रार्थना आहे.

आर्वी. आपला आज्ञांकित.

ता० १४।२।१८ आर्वी तहसिलींतील अनुयायी स्त्रीसमाज.

मानपत्रवाचनाच्या व समर्पणाच्या समारंभानंतर श्री. शेट नथमलजी यांनीं लोकमान्यांस पुष्पहारांनीं मंडित केलें. आतांपर्यंतचें कार्य लोकांच्या गलबल्यांतच पार पडलें पण व्याख्यानाच्या वेळीं असा गलबला असून कसें चालेल ? पण समाज फार मोठा असल्यामुळें गडबड शांत होण्यास फार त्रास पडला. टाळ्यांच्या गजरांत लो. टिळक ह्मणाले:—“ एवढा मोठा समाज येथें जमलेला पाहून आपणांलाहि आनंद होईल. माझें भाषण ऐकावयाचें असेल तर विनंति आहे कीं गलबला बंद करा—माझ्या

शब्दाला मध्यें प्रतिशब्द उठतां कामा नयेत. जीं दोन मानपत्रें आत मला देण्यांत आलीं त्याबद्दल मी आपला फार आभारी आहे. मी पुनः पुनः मनाशीं विचार करून पहात आहें कीं हा एवढा मोठा समाज कोणाकरितां जमला आहे? हा समाज माझ्या व्यक्तीकरितां नाहीं—अर्थात् तो स्वराज्याच्या उत्कट भक्तींनेंच जमला आहे (डाव्याहाताला वळून.) जीं माणसें त्या टोंकाला उभीं आहेत, त्यांनीं मेहरबानी करून खालीं बसावें. एवढ्या मोठ्या समाजाला ऐकूं जाईल एवढ्या मोठ्यानें तास-भर बोलणें अशक्य आहे. ह्मणून आतां खाडीलकर दोन शब्द सांगतील.'' यानंतर खणखणीत आवाजांत श्री. खाडीलकर यांनीं थोडेंसें भाषण केल्यावर शांतता प्रस्थापित होऊं लागली. तेव्हां खालीं मंडपांत मध्य-भागीं उभे राहून

## लोकमान्य ह्मणाले:—

"स्वराज्य मागण्यांत राजद्रोह होतो कीं काय, याचा खुलासा आतां मी करणार आहें. आमच्या स्वराज्यानें जर साम्राज्याचें व बादशहाचें अनाहित न होतां उलट हितच होणार आहे, तर त्यामुळें राजद्रोह कसा काय होणार तेंच मला समजत नाहीं. साम्राज्याचेंहि हित स्वराज्यामध्यें साधत असेल तर त्यांत बादशहांचें काय बिघडणार? उलट त्यांना प्रजेचें सुख पाहून आनंदच होईल. आह्मी स्वराज्य मागतों तें काय लोकांजवळ थोडेंच मागतो? आह्मी स्वराज्य हें ब्रिटिश पार्लमेंट जवळ मागणार तर मग त्यांत राजद्रोह कोठून आला? मुलानें जर बापाजवळ हट्ट धरला तर झाला का तो पितृद्रोह? तुह्मांला वाटतें कीं हे कमिशनर—तहसीलदार—पोलीस सारे सरकार! पण हे कांहीं सरकार नव्हत—राजे नव्हत! हे जर राजे असते तर त्यांना ५।६ वर्षें नोकरी करून निघून कां जावें लागलें असतें? (हंशा व टाळ्या) हे राजे नव्हत—यांचे मुलगेहि राजे नव्हत. हे लोक विलायतेंत परीक्षा देऊन इकडे नोकरी करायला येतात. आतां ते तुह्मांला भेवडावतात, हें खरें! पण हे राजे नव्हत अशी जर तुमची समजूत होईल तर भीति जाईल व स्वराज्य कळेल. पांच हजार कोसांवर खरे बादशहा असून तेथें त्यांचें एक

पार्लमेंट आहे. त्या पार्लमेंटानें हे नोकर इकडे आमच्या हिताकरितां पाठविले आहेत. एकाद्या व्यापाऱ्याचीं दहा ठिकाणीं दहा दुकानें असलीं ह्मणजे तो जसा आपले मुनीम ठेवतो तसे हे बादशहांनीं मुनीम पाठविले आहेत. पण या मुनीमांना पगार कोठून मिळतो ? तुह्मी कर देतां त्यांतून. हें सारें नीट लक्षांत आलें ह्मणजे स्वराज्य काय तें सहज समजेल ! आतां जे नोकर आमचा पगार खातात, त्यांच्यावर आह्मी हुकूम चालविणें वाजवी आहे कीं नाहीं ? जर हें वाजवी तर हे नोकर आमचें अहित करतात ह्मणून त्यांना काढा असा जर आह्मी अर्ज केला तर त्यांत गैर-वाजवी काय झालें ? ज्यानें या नोकरांना नेमलें, त्याची खात्री पटवून दिली कीं 'नोकरांचा कारभार प्रजेच्या हिताचा नाहीं' तर तो कां काढणार नाहीं ? बादशहांना त्यांच्या हातांत दिलेली सत्ता काढून घेण्याचा अधिकार आहेच. मग आमच्या तक्रारींत राजद्रोह कोठून आला व बाद-शहांचा अपमान तरी कसा झाला ? मागें एकदां असेंच झालें होतें. पूर्वी हिंदुस्थानचा कारभार कंपनीच्या हातीं होता. पण ती कंपनी पडली व्यापारी ! त्या कंपनीच्या हातून प्रजेवर जुलूम होतो असें जेव्हां बादशहांनीं पाहिलें तेव्हां त्यांनीं तिच्या हातून कारभार काढून कमिशनर-गव्हर्नरांच्या हातीं दिला. आतां आह्मींहि तेंच ह्मणतों कीं या नोक-रांच्या हातून कारभार बरोबर होत नाहीं ह्मणून तो काढा व प्रजेच्या हातांत द्या. मग या आमच्या मागणींत राजद्रोह तो कोठें आहे ? एरवीं हे नोकर शहाणे आहेत, कर्तबगार आहेत, कोणी त्यांना भेटायला गेला तर गोड बोलतात, शेकहँड करतात, असे सर्वगुणसंपन्न आहेत. ( हंशा ) नोकरांबद्दल तक्रार नाहीं, तक्रार आहे ती त्यांना हुकूम कोणी द्यावा याबद्दल ! गेलीं १०० वर्षें काय झालें पहा ! आमच्याकडील कोष्टयांचा धंदा बुडाला, रंगांचे कारखाने बुडाले, आणि आतां येथून कापसाच्या गठड्या विलायतेला जातात व कापडाच्या तिकडून येतात. येथें १ रुपयाला १ शेर कापूस खरेदी करतात व ५ रुपये कापडाचे घेतात. मग ही मलई कोणी खाल्ली ? व खाणारांना तरी या नोकरांनीं कां खाऊं दिली ? या नोकरांना हें कळत नाहीं इतके ते मूर्ख आहेत

असें मला तरी वाटत नाहीं. यांचें सारें लक्ष विलायतेंतील प्रजेचें पोट कसें भरेल ! आणि हिंदुस्थानचे कोष्टी काय बादशहांची प्रजा नव्हे ? ही झाली कापसाची गोष्ट; आणि रंगाची गंमत तर याहून और आहे ! आमचे कारखाने बुडाले व जर्मनीचा रंग खपूं लागला. या रंगाच्या व्यापारावर जर्मनी गबर झाला व त्याच पैशांच्या जोरावर आतां तो लढत आहे. आतां हें साम्राज्यावर संकट कोणी आणलें ? या नोकरांनीं कीं आम्हीं ? ( टाळ्या. ) हीच गोष्ट लष्करी बाण्याची. या नोकरांनीं प्रजेच्या हातीं शस्त्र राहूं दिलें नाहीं, सर्व लोकांना नामर्द केलें, तरवार उलटी धरायची कीं सुलटी हें सुद्धां माहीत नाहीं, आणि आतां म्हणे लढायला चला ! आतां रडा कीं लढा ? ( हंशाच हंशा. ) तालमी बुडविल्या, कोणी तरुण छाती वर काढून चालला कीं त्याच्यावर पोलिसचा डोळा बसलाच ! मग अशा कैचींत धरून जर वडाचें झाड कुंडींत वाढविलें तर मग आतां तरी त्याचा वड एकदम कसा होणार ? विश्वासानें राज्य करा, प्रजेला संतुष्ट राखा, शिकवा म्हणजे १।२ महिन्यांत तयार होऊं ! आम्ही आज नामर्द दिसत असलों तरी शूर पूर्वजांचे वंशज आहों हें ध्यानांत ठेवा. ( टाळ्या. ) स्वराज्य देत असाल तर देशाकरतां मरूं, साम्राज्याकरितां मरूं, पण या नोकरांची अरेरावी वाढावी म्हणून कोण मरायला तयार होणार ? शिक्षणाचीहि तीच रड. शिकवा म्हणून ओरड केली पण यांचें एक उत्तर ' पैसा नाहीं. ' बरें शिक्षणाकरितां कर्ज काढा म्हटलें तर तेंहि करीत नाहींत ! जपाननें अवघ्या ४० वर्षांत सर्व देश सुशिक्षित केला, पण या नोकरांना तें १०० वर्षांतसुद्धां करतां आलें नाहीं ! ! लढाईला कर्ज द्या—दिलें. पण आतां जास्त काय मदत करणार ? प्रार्थना ! ती प्रभूची प्रार्थना करतों आहों, झालें ! ( हंशा. ) आम्ही पुष्कळ ओरड केली पण पहिल्यानें विलायतच्या लोकांना आमचें म्हणणें खरेंच वाटेना ! पण जेव्हां आतां साम्राज्यावरच प्रसंग आला तेव्हां कोठें विलायतच्या लोकांचे डोळे उघडले आहेत. त्यांना वाटलें होतें कीं ५।५० लाख तरी लोक सहज मिळतील—पण येथें १०।५ लाख सुद्धां लोक नाहींत. आम्हांला काय हौस नाहीं ? आहे,

पण हे नोकर आम्हांला वर डोकें काढूं देतील तेव्हां कीं नाहीं ? आतां विचार करा, हा जो बादशहांवर मानहानीचा प्रसंग आला, तो कोणाच्या कर्माचें फळ ? ( टाळ्या. ) हें या नोकरांच्या राज्यव्यवस्थेचें फळ आज बादशहांना भोगावें लागत आहे ! हें मी नाहीं म्हणत, खुद्द मॉंटेग्युसाहेबच तसें म्हणाले आहेत. कोणी म्हणतात, यांनीं आगगाड्या–तारायंत्रें केलीं कीं नाहीं ? होय केलीं, पण तो मढ्यावर शृंगार झाला ! ( हंशा. ) लोक जवान होतील, शूर होतील, विद्वान होतील तर उपयोग, नाहीं तर मला या शृंगारांची मुळींच किंमत नाहीं. ( टाळ्या. ) आगगाड्या झाल्या, परदेशांचा व्यापार वाढला, पण ( त्रासून ) आम्ही मधल्यामध्यें नागवलों ना ? आगगाडी आहे, मला कबूल ! अथवा ती रोज कोंकटणार मग नाहीं म्हणून तरी काय उपयोग ? ( हंशा. ) या नोकरांनीं आगगाड्या आणल्या, पण त्याबरोबर दारूहि आणली ! इंग्रजी राज्य होण्यापूर्वी आमच्याकडे मुळींच दारूचें व्यसन नव्हतें. ( टाळ्या. ) आज काय स्थिती आहे पहा–यांनींच कायदे करावे व यांनींच अंमल करावा ! असें हें आमच्याच देशांत नोकरांचें राज्य झालें आहे. स्वराज्य करायचें म्हणजे राज्य बुडवायचें नाहीं, इंग्रजी राज्याला 'खो' नाहीं, फक्त नोकरांच्या हातचा अधिकार मालकाच्या हातीं आणायचा, इतकेंच. स्वराज्य झालें म्हणजे काय फरक होईल पहा. आज केवढाहि शेटसावकार--इजारदार असला तरी त्याच्यापुढें १० रुपयांचा पोलिस मिशा वर करून तोऱ्यानें जातो तोच उद्यां अदबीनें वागावयास लागेल ! पूर्वी रामोशी होते. आतां पोलीस झाले, दोन्ही शब्दांचा अर्थ एकच–एक इंग्रजी शब्द व एक मराठी इतकाच काय तो फरक होय ! ( टाळ्या. ) ही जी हल्लीं नोकरशाही माजली आहे ती काढून टाका, हीच आमची स्वराज्याची मागणी, मग यांत राजद्रोह तो कोठें व कसा आला ? असा हा रस्ता साफ आहे, स्वराज्य मागणें कायदेशीर ठरलें आहे, तुमच्या तर्फे विलायतेंत जाऊन भांडावयास दादासाहेब खापर्ड्यांसारखे वकील तयार आहेत. पण ( रागानें ) तुम्ही इतके मठ्ठ कीं त्यांना मदत करायला सुद्धां तयार नाहींं. इतके मूर्ख होऊं नका—आळशी बनूं नका. आज चुलीवर भांडें

चढलें आहे तें तुम्ही हलगर्जीपणा कराल तर लाथाडलें जाईल, हें लक्षांत ठेवा. बरें, आम्ही तेथें गेलों आणि तुमचा पाठिंबा नसला तर विलायतेंतील लोक आम्हांला विचारतील ' टिळक—खापर्डे मागायला आले खरे, पण लोक कोठें मागतात ? तुम्ही आपला निश्चय कायम ठेवा, भुलावणीला भुलूं नका व कोणी भीति घातली तर भिऊं नका. नोकरावर सत्ता मागण्यांत राजद्रोह कसला ? मग भिता कां ? वेळ अशी आली आहे कीं, यावेळीं डोळ्यांत तेल घालून सावध राहिलें पाहिजे. भांडून भांडून मूठ सैल केली आहे, आतां एक हिसका दिला तर रुपया बाहेर पडेल. ( येथेंच लोकमान्यांनीं भाषण संपविलें. पण व्यवस्थापकांकडून सूचना आली कीं, ' वेळ आहे, चालू द्या. ' ) भाषण बंद केल्यावर आतां काय उपयोग ? प्रसंग अत्यंत बिकट आहे. स्वराज्याचा वाद ही एक प्रकारची कुस्ती आहे. कुस्ती खेळतां खेळतां एखादा क्षण असा येतो कीं, ताबडतोब टांग मारून पेंच घातला तर कुस्ती जिंकतां येते. तसा आज प्रसंग आला आहे. घर तुमचें बादशाहा तुमचे, मग आपल्याच घरांत असे कैद्यासारखे कां राहतां ? ( लोकांमध्यें गडबड सुरू होते. ) आतां इतकेंच भाषण पुरे. काय सांगायचें होतें तें सांगितलें आहे. आतां त्याप्रमाणें वागणें किंवा न वागणें हें तुमच्या हातीं आहे. ( थकल्यामुळें सुकून गेलेल्या मुखचर्येनें ) मला आतां यापेक्षां जास्त वेळ बोलण्याची शक्ति उरलेली नाहीं. ''

अशा तऱ्हेच्या सणसणीत भाषणानंतर रा. नारायणराव वैद्य यांनीं तहाहयात सभासदांची यादी वाचून दाखविली. व ७००० रुपये जमल्याचें जाहीर करण्यांत आलें. नंतर रा. वैद्य खणखणाऱ्या आवाजांत म्हणाले, ' अशी विभूति केवळ तुमच्या सुदैवानेंच येथें प्राप्त झाली आहे. हें स्वराज्याचें झाड वाढावें म्हणून लोकमान्यांनीं केवढी तपश्चर्या केली आहे, व किती संकटें सोसलीं आहेत याची तुम्हांला जाणीव आहे काय ? लोकमान्य बासष्टाव्या वर्षी एवढी मेहनत घेत असतां त्यांच्या कार्याला ७००० रुपये देऊन आर्वीकर तृप्त आहेत काय ? ज्यांना आणखी पैसे द्यावयाचे असतील त्यांनीं ते द्यावे. लोकमान्यांच्या पायांवर आज रुपयांचा

सडा पडला पाहिजे.' वैद्यांच्या जाहीर विनंतीप्रमाणें लोकांनीं भराभर रुपये आणून दिले. रा. माधवराव पाटील म्हणाले:—"मी पुलगांवला तहाह्यात सभासद झालों, आणि येथेंहि ५१ रुपये देतों." ( टाळ्या. ) बॅरिस्टर अभ्यंकर म्हणाले:—" बाया मंडळींनीं फक्त ६०० रुपये दिले आहेत." सभेचें काम संपल्यावर मंडळी तडक स्टेशनवर गाडी गांठण्यास गेली. इकडे गांवामध्यें स्वराज्याची दंगल उडून राहिली असतां शाळेमध्यें आज मुलांचा अभ्यास सकाळीं ९॥ पासून सायंकाळीं ६ वाजेपर्यंत मास्तरलोकांनीं धडाक्यानें चालविला होता. आजच अभ्यासाला इतका ऊत येण्याचें काय कारण असावें बरें ?

---

( प्रकरण ५ वें. )

# रूसो आणि वेदान्त.

( चांदा. )

लोकमान्य आर्वीहून ता. १४ रोजीं निघाले ते रात्रीं दहा वाजतां परत पुलगांवांस विश्रांतीसाठीं आले. रात्रभर विश्रांति घेतल्यावर दुसरे दिवशीं सकाळीं सहा वाजतां त्यांनीं पुलगांव सोडलें. वाटेंत दहिगांवच्या पानसुपारीचा स्वीकार करून ते ८॥ वाजतां वर्ध्यास पोंचले. स्टेशनच्या पलीकडे पाहुणे मंडळीची तंबु—राहुट्यांतून चहापानाची व्यवस्था केली होती. वर्ध्याची सर्व प्रमुख मंडळी स्वागतार्थ हजर असून हजारों लोक तिलकदर्शनार्थ आले होते. याठिकाणीं श्री० गंगाधरराव देशपांडे दौऱ्यांत सामील झाले. लोकांच्या गर्दीची व्यवस्था ठेवण्यांत

पोलिसहि येथें सामील झालें असून त्यांचा मुख्याधिकारी गळ्यांत स्वयंसेवकाचा पट्टा अडकवून मोठ्या मौजेनें आपल्या कामांत चूर झाला होता ! चहा-पाणी झाल्यावर लोकमान्य मंडळीसमवेत ९॥ वाजतां चांद्याच्या गार्डींत जाऊन बसले. वाटेमध्यें सोनेंगांव, हिंगणघाट, नागरी येथें पानसुपाऱ्या व मानपत्रें झालीं. दुपारीं १२ वाजतां वरोडा येथें धर्मशाळेंत जेवणखाण उरकून घेतल्यावर पुन्हां गाडी चालू झाली, ती वाटेंतील हजारों लोकांच्या स्वागताचा स्वीकार करीत चांदा येथें ३॥ वाजतां पोंचली. स्टेशनवर व गांवामध्यें लोकमान्यांच्या स्वागतार्थ २५।३० हजारांचा लोकसमुद्र उसळला होता. थाटदार मिरवणुकीनंतर श्री० बळवंतराव देशपांडे यांजकडे लोकमान्य व इतर मंडळी मुक्काम करावयास गेली. मुख्य इमारतींत लोकमान्य व अध्यक्ष यांचा कँप असून सभोंवताली दिलेल्या डेऱ्यांमधून इतर पाहुण्यांची उतरण्याची व्यवस्था केली होती. सायंकाळीं ७ वाजतां सार्वजनिक जागेंतील भव्य पटांगणांत व्याख्यानसमारंभ झाला. पटांगणाच्या मर्यादा चिरांगणाच्या लखलखाटानें सुशोभित केल्या होत्या. अग्रभागीं छोटासा झालरींचा मंडप उभारला असून व्याख्यानश्रवणास जमलेला श्रोतृसमूह पंधरा हजारांवर होता. लोकमान्य यावयास थोडा उशीर असल्यामुळें वे. शा. संपन्न द्विवेकरशास्त्री यांनीं वाईच्या प्राज्ञपाठशाळेची माहिती सांगितली. लोकमान्यांचा रथ ८॥ वाजतां सभास्थानीं दाखल होतांच लोकांनीं जयजयकारानें त्यांचें स्वागत केलें. प्रारंभीं डॉ. वैद्य यांनीं बारीक व मधुर सुरेलींत ' वंदेमातरम् ' गीत गाइल्यावर ह. भ. प. दाजीशास्त्री चांदेकर यांनीं लोकमान्यांचा पाळणा खणखणीत आवाजांत म्हटलाः—

## राग—सारंग

भूवरि अवतरला । गुणवंत । लोकमान्य बळवंत
भारतमातेचा । मौक्तिक । सौभाग्याचा तिलक ॥ धृ० ॥
निद्रित विश्वाला । किरणांनीं । जागृत करि हा तरणी

ह्मणुनी कीं व्यसनीं । तो पडला । कर्तव्य न परि चुकला
अमुचा बाल रवी । तेजानीं । फुलवी मानसनलिनी
बांधवकल्याणीं । तो सजला । संकटार्णवीं पडला
तेथुनि काढियलें । दिव्याला । कर्मयोग रत्नाला
धन्य आर्यवीर । धीमंत । लोकमान्य बळवंत ॥ १ ॥
ज्ञानाचा पुंज । पापभिरू । धैर्याचा कीं मेरू
वज्राहुनि काठिण । हृत्कमल । पुष्पाहुनि कीं मृदुल
नीतीचा पुतळा । निरलस । मौत्सद्याची मूस
वैराग्यनिधी हा । निर्मेळ । स्वराज्याची तळमळ
लोकोत्तर चरित । नयवंत । लोकमान्य बळवंत ॥ २ ॥
पावन चंद्रपुरी । झाली ही । शुभ आगमनें पाही
स्वागत काय करूं । मधुर पहा । भक्तीचा निर्झर हा
गोड करुनि घेई । प्रेमाला । भक्तिसुमनमालेला
यावच्चंद्ररवी । गगनांत । तोंवरि आयुष्मंत
नरवर बळवंता । तूं होई । ईशछत्र शिरिं राही
भोग सुखें फल तूं । सुतपाचें । स्वराज्य अमृत साचें
कर्णधार अमुचा । जयवंत । लोकमान्य बळवंत ॥ ३ ॥

---

नंतर कार्यक्रमास सुरवात करतांना रा० बळवंतराव देशमुख म्हणालेः— " हिंदी जनतेच्या अनाभिषिक्त राजाचें दर्शन झाल्यामुळें आज आपल्या मनकामना पूर्ण झाल्या आहेत. आज वसंत पंचमीचा दिवस आहे. या दिवशीं प्रभु भक्ताकरितां प्रगट होतो असें म्हणतात. जी मूर्ति आमच्या हृदयांतून ' कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं ' अशा सरकारलाहि हद्दपार करतां आली नाहीं, ती मूर्ति डोळे भरून पाहण्याचा मंगलदिन प्राप्त झाला असतां कोणाचें अंतःकरण आनंदानें उचंबळून जाणार नाहीं ? "

श्री. गंगाधरराव देशपांडे यांची अध्यक्षस्थानीं योजना झाल्यावर म्यु. प्रेसिडेंट श्री. चेंडके वकील यांनीं सुंदर रौप्यकरंडकांतून मानपत्र व ६००० रुपयांचे तोडे लोकमान्यांस अर्पण केले.

यानंतर श्री. खाडिलकर यांचें प्रास्ताविक भाषण झाल्यावर लोकमान्य जयजयकारांत बोलावयास उठले. ते म्हणालेः—"मानपत्रामध्यें माझी जी इतकी स्तुति केली आहे ती काय म्हणून ? काय मी स्वराज्य आणणार ? पूर्वी येथें स्वराज्य होतें पण तें कालगतीनें नष्ट झालें व तें पुन्हां पुनरुज्जीवित होत आहे. आजचा काळ स्वराज्याला अनुकूल आहे. काल अनुकूल आला असतां जो प्रयत्न करील तोच खरा पुरुष. यावेळीं जर स्वस्थ बसाल तर परमेश्वराच्या घरीं पापी ठराल. स्वराज्य हा प्रत्येकाचा हक्क आहे असें रूसो म्हणतोः—" Man is born free, but is found everywhere in fetters "
'मी जर स्वतंत्र जन्मलों तर मला कोंडून कोणीं ठेवलें ? ' हा रूसोचा प्रश्न आहे. आमचा वेदांतही तोच सिद्धांत प्रतिपादन करतो. वेदांताच्या मतें आत्मा हा स्वतंत्र असून तो मायेच्या पाशांनीं बद्ध झालेला आहे. आत्म्याला बंधमुक्त करणें याचें नांव मोक्ष. तोच न्याय देशालाहि लागू आहे. अनेक आत्म्यांचा मिळून देश बनत असतो. त्या देशाला मोक्ष प्राप्त करून देणें म्हणजेच स्वराज्य मिळवून देणें होय. जें वेदान्त बोलतो, तेंच रूसोहि सांगतो. आतां प्रतिकूल परिस्थितीमध्यें असतांना अनुकूल कालाची वाट पहात बसावें लागतें हें खरें, पण एकदां काल अनुकूल आला म्हणजे मग स्वस्थ बसणें हें पाप होय. दहा वर्षांपूर्वी असा काळ होता कीं, स्वराज्य शब्द उच्चारतांच तुरुंगाची वाट धरावी लागे, पण आज काल असा आला आहे कीं, पोलिसांचे रिपोर्टर व अधिकारी हजर असतांहि ' स्वराज्य मागा ' असें सांगावयास बिलकूल भीति वाटत नाहीं. दहा वर्षांपूर्वी जें स्वराज्य बेकायदेशीर ठरत होतें, तेंच आज राजरोस मागतां येतें. इतकेंच नव्हे तर लाटसाहेब व मॉंटेग्यूसाहेब, वर असें जाहीर करतात कीं ' स्वराज्य हें लोकांनीं मागितलें पाहिजे व आम्ही दिलें पाहिजे. ' आज मॉंटेग्यू साहेबांनीं येथें येऊन ' तुम्ही कोणतें स्वराज्य मागतां ? ' अशी चौकशी केली आहे. या सर्वांचा अर्थ ' काल अनुकूल आला ' असा नव्हे काय ? आज काय स्थिति आहे ? बादशहांनीं जे नोकर तुमच्या हितासाठीं म्हणून पाठविले तेच मालक

होऊन बसले आहेत. आरामानें राज्य कसें करतां येईल, एवढेंच हे नोकर पहात असतात. दारूचें व्यसन वाढो, व्यापार बुडो वा लोकांचें कांहींहि होवो. या नोकरांना त्याची पर्वा नाहीं ! पहिल्यानें गणपति–उत्सव सुरू झाला, तेव्हां एक वडे अधिकारी मला म्हणाले:–' हें तुम्ही गणपतीचें नवीन सोंग काय काढलें आहे ? ' मीं म्हटलें, ' हें सोंग नाहीं, हा आमच्या देवाचा उत्सव आहे. ' तेव्हां ते म्हणाले, ' तुमचा उत्सव होतो, पण आम्हांला त्रास होतो ! ' जणूं काय या नोकरांच्या आरामाकरतांच राज्यकारभार चालला आहे ! ! ( हंशा. ) हे नोकर कांहीं लोकांकरितां नाहींत, लोक मात्र नोकरांच्या आरामाकरितां आहेत ! ! ! ( हंशाच हंशा. ) कोणतीहि गोष्ट करा, तुम्हांला अगोदर या नोकरांची परवानगी आणली पाहिजे, या नोकरांनीं कायद्यानें लोकांना अगदीं जखडून टाकलें आहे. या नोकरांची नेहमीं सबब एक ' राज्य चांगलें कां ? तर आगगाड्या आहेत म्हणून. ' मग त्या आगगाड्यांत तुमची सोय कांहींच कां नसेना. जसें काय आगगाड्यांच्या रुळांनीं राष्ट्रीयत्व मोजलें जातें ! ' तुम्ही या राष्ट्राला जिवंत ठेवलेंत का ? ' हा आमचा नोकरशाहीला सवाल आहे. या नोकरांनीं लोकांचें हित पाहिलें नाहींच पण आपली वडेजावकी मात्र वाढवून घेतली ! इंग्रजी राज्याचें थोडक्यांत लक्षण असें:—वर बादशाही, मध्यें नोकरशाही व खालीं आम्ही ! ( हंशा. ) ही राज्यपद्धति बरोबर नाहीं, तींत साम्राज्याचेंहि नुकसान आहे, अशी ओरड करून करून दादाभाईसुद्धां दमले, पण त्यांचें कोणीं ऐकलें नाहीं. ही नोकरशाही जशी लोकांना अवजड झाली, तशीच बादशहांनाहि अवजड झाली आहे. बादशहांनीं यांच्याजवळ सैन्य मागितलें, पण त्यांच्याजवळ दोनचार लाखापेक्षां जास्त सैन्य आहे कोठें ? आतां कुठें साम्राज्याचे डोळे उघडले आहेत. आम्ही बादशहासाठीं मरायला तयार आहों पण अगोदर या नोकरशाहीचा तोरा गेला पाहिजे. ' स्वराज्य म्हणजे काय ? ' असें जर कोणी मामलेदारानें तुम्हांस विचारलें, तर तुम्ही त्याला सांगा कीं ' साहेब, तुमचा तोरा गेला व तुम्ही लोकांशीं नरमपणानें वागावयास लागलां म्हणजे स्वराज्य झालें. '

( हंशा व टाळ्या. ) ही वेळ स्पष्ट बोलण्याची आहे, या वेळीं मौन धारण कराल तर फसाल ! " ( टाळ्यांचा कडकडाट. )

शेवटीं आभारप्रदर्शन, हारतुरे वगैरे झाल्यावर समारंभ आटोपला. रात्रीं श्री. बळवंतराव देशमुख यांजकडे बादशाही थाटाची मेजवानी झाली. दुसरे दिवशीं ( ता. १६ रोजीं, ) सकाळीं आठ वाजतां नाटकगृहामध्यें चांदा जिल्हापरिषदेचें काम श्री. गंगाधररावजी देशपांडे यांच्या अध्यक्षतेखालीं सुरू झालें, तेव्हां लोकमान्य स्वतःहजर राहिले होते. दुपारीं श्री. देवईकर यांजकडे मेजवानीचा थाट झाल्यावर लोकमान्य सायंकाळीं ४ वाजतां जैनमंदिराचें दर्शन घेऊन वणी येथें जावयास निघाले. श्री. माधवरावजी अणे हे स्वतः बारा सीट्‌ची जंगी मोटार घेऊन दाखल झाले होते.

---

## प्रकरण ६ वें

# ' कुत्र्याला शिवूं देणार का ? '

( वणी )

लोकमान्यांची मोटार वणी येथें ता. १६ रोजीं रात्रीं ९ वाजतां पोंचली. वाटेंत वरोडा येथें ध्वजा कमानींच्या शृंगारलेल्या रस्त्यांतून चिरागणांच्या प्रकाशांत ३।४ हजार लोक बँड वगैरे मिरवणुकीचें साहित्य घेऊन उभे होते. या लोकांच्या घोळक्यांत सांपडलें तर लवकर सुटका होणें नाहीं, आणि वणीच्या लोकांचा विरस होईल ह्मणून पानसुपारीचा स्वीकारसुद्धां न करतां मोटार वेगानें हाणण्यांत आली ! वरो-

ड्याच्या मंडळीची निराशा झाली असेल पण इलाज नव्हता. वणी येथें ४।५ मैलांवर श्री. बाबुराव स्वयंसेवक घोड्यावरून सामोरे आले होते. लोकमान्यांच्या स्वागतांत २५।३० हजार लोक सामील झाले असून व्याख्यानाला १२।१५ हजार जनसमुदाय गोळा झाला होता. सभास्थानीं व्यासपीठावरील मानाच्या खुर्च्यांना तिकिटें ठेविलीं असून २५।२५ रुपये देऊन कांहींनीं आसनें घेतलीं होतीं ! प्रथमतः मंगल गायन झाल्यावर यवतमाळचे सुप्रसिद्ध राष्ट्रभक्त श्री. माधवरावजी अणे ह्मणाले:–" लोकमान्यांचे पवित्र पाय या शहराला लागावे ह्मणून आपणांसर्वांची आज कित्येक वर्षांची इच्छा होती; त्याप्रमाणें मीहि अनेकदां प्रयत्न केला. पण कार्यबाहुल्यामुळें तो सुयोग आजपर्यंत आला नाहीं. आज तो योग आला तेव्हां आपलें महद्भाग्यच उदयास आलें असें ह्मटलें पाहिजे." अध्यक्षांची सूचना पुढें मांडतांना रा. ब. पुराणिक ह्मणाले:–" असा सुप्रसंग प्राप्त झाल्याबद्दल या वणी नगरीचें काय भाग्य वर्णन करावें ?" श्री. दाजीबा देशपांडे यांनीं अनुमोदन दिल्यावर श्री. गोविंदरावसाहेब देशमुख अध्यक्ष या नात्यानें ह्मणाले:–" मी या बहुमानाला पात्र नाहीं, तत्रापि आपली आज्ञा मानणें भाग आहे. (लोकमान्यांकडे वळून) या चरणांमुळें आमच्या जन्माचें आज सार्थक झालें आहे." नंतर वे. शा. सं. रईच यांनीं संस्कृतामध्यें तिलकस्वागत केल्यावर श्री. सीताराम लक्ष्मण भेदी, श्री. विठ्ठल माधव देशपांडे, यादव श्रीहरि अणे, डॉ. अबदुल रझाद, महादेव सदाशिव उपाध्ये इ--इ. गृहस्थांनीं निरनिराळ्या संस्थांतर्फे लोकमान्यांस हारतुरे अर्पण केले. नंतर श्री. खाडिलकर यांचें भाषण झाल्यावर

## लोकमान्य टिळक

ह्मणाले:—" इतके लोक येथें जमून आपण जो माझा सन्मान केला त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. मी चांद्याहून निघालों त्या-वेळीं येथें इतके लोक तिष्ठत बसले असतील अशी मला बिलकुल कल्पना नव्हती. इतर कांहीं कारणांमुळेंहि मला यावयास थोडा उशीर लागला याबद्दल मी आपली माफी मागतों-- ( no, no ! ) आतां रात्रीचे १०

वाजले असल्यामुळें मी थोडकेंच बोलणार आहें. माझी आपणांस अशी विनंति आहे कीं, आपण शांत राहिल्याखेरीज मी कितीहि मोठ्यानें बोललों तरी, माझें भाषण सर्वांस ऐकू जावयाचें नाहीं. आज स्वराज्याच्या चळवळीला असें स्वरूप आलें आहे कीं, आपण यापुढें नेटानें प्रयत्न केला नाहीं तर मागील २५ वर्षांची सारी खटपट फुकट जाईल. पूर्वी स्वराज्यासाठीं सरकारनें कोणाचीं वतनें जप्त केलीं, कोणाला तुरुंगांत टाकलें, ( टाळ्या ) कोणाची कशी संभावना केली, कोणाला कायद्याच्या अक्षरांच्या कचाटींत धरलें, पण आतां तें सारें भय नाहींसें झालें आहे. आतां लाटसाहेबांनींहि स्वराज्याची मागणी योग्य ठरविल्यामुळें स्वराज्य न मागणाराच मूर्ख व राजद्रोही ठरेल अशी स्थिति प्राप्त झाली आहे. पहिल्यानें येथें कंपनीसरकारचें राज्य होतें. त्यानंतर बादशहांनीं हे नोकर नेमले, पण घरच्या मालकाचें हित कसें तें पाहिलें नाहीं. दारूचें व्यसन वाढलें तरी त्याची यांना फिकीर नाहीं--यांची तिजोरी भरली ह्मणजे झालें! झालें काय ? दुकान संभाळावयाला ह्मणून जो नोकर--मुनीम ठेवला तोच दुकान बळकावून बसला ! या नोकरांनीं आपली वडेजावकी वाढविण्याकरितां सर्व व्यवस्था आपल्या हातीं ठेवली व लोकांना वर डोकें करूं दिलें नाहीं. यांच्या कारभारानें देशभर चोंहोंकडून आटल्यासारखें वाटतें. गेलीं तीस चाळीस वर्षें ओरड केली, ठराव केले, तक्रारी झाल्या, अर्ज गेले, डेप्युटेशनें पाठविलीं, पण हे नोकर बोलून चालून बेजबाबदार--ते कशाला आमचें ह्मणणें मनावर घेतात ? या नोकरशाहीच्या चुका दाखवूं लागलें तर तें एक चुक्यांचें सहस्रनामच होईल ! (हंशा.) मिळून काय ? मुद्याची गोष्ट एक--यांच्या कारभारानें लोकांना सुख लाभलें नाहीं--देशाची भरभराट झाली नाहीं. तेंच जपान पहा. तीस वर्षांत भरभराटलें ! हे नोकर आजपर्यंत आमचें ह्मणणें ऐकावयास तयार नव्हते पण महायुद्धामुळें त्यांचे कान हळूहळू खुले होऊं लागले आहेत. बादशहांनीं सैन्याची मागणी केली पण यांच्याजवळ भरपूर सैन्य आहे कोठें ? जर मुळीं १००--१५० वर्षांमधील यांच्या कारभारानें लोकांचें पौरुष नष्ट झालें तर आतां एकदम सैन्य तरी मिळणार कोठून ? जेव्हां सैन्य

९५२०

मिळेना तेव्हां विलायतेंतील लोकांची खात्री झाली, कीं ' लोकांची ओरड खरीरे खरी ! ' या नोकरांनीं किती जरी कुरापत्या मारल्या तरी हे राजे नव्हत हें लक्षांत ठेवा व दाता खुषींत आहे तोंपर्यंतच काय मागायचें असेल तें मागा. या नोकरशाहीनें साम्राज्याचें कधींहि कल्याण व्हायचें नाहीं, हें मी उघड सांगतों. पण हें मीच म्हणतों असें नव्हे--असें खुद्द मॉंटेग्युसाहेबांनीं भर पार्लमेंटांत बोलून दाखविलें आहे. मॉंटेग्यु म्हणतात कीं ' ही पद्धति कुचकी झाली आहे, हिला कीड लागली आहे !' ( टाळ्या ) नोकरशाही नको याचा अर्थ काय ? नोकर हेच ठेवायचे पण त्यांची जी हल्लीं ' शाही ' म्हणजे अंमल माजला आहे तो नको. तो वरचा हुकुम मला मिळाला म्हणजे हेच नोकर फार चांगले आहेत. आजचा काळ स्वातंत्र्याच्या विजयाचा आहे. इतर वसाहतींना स्वराज्य मिळालें, आयर्लंडला इतक्यांत मिळणार, आणि आफ्रिकेंतल्या काळ्या सिद्दी लोकांनाहि देण्याचें घाटत आहे--मग हिंदुस्थाननेंच काय पातक केलें ? आतां लोकांना स्वराज्य मिळालें तर या नोकरांना वाईट वाटेल हें खरें, पण आमचा तो हक्क आहे, आणि तो मला पाहिजे, मग कोणाला वाईट वाटो वा कांहीं वाटो ! हा काळ भिण्याचा नाहीं. कोणी तुम्हांला विचारलें कीं ' तुह्मी सभेला कां गेलां होतां ? ' तर त्याला सांगा कीं साहेब, तुमची शेंडी लोकांच्या हातीं यावी म्हणून ! ' ( हंशा व टाळ्या ) तुमच्या हातीं स्वराज्य पडूं नये म्हणून सिडनहॅम साहेब आणि युरोपियन व्यापारीवर्ग टपून बसला आहे. भाताचें भांडें चुलीवर शिजून तयार आहे. आतां कुत्र्याला त्या भातास शिवूं देणार कीं त्याचा पाय मोडणार ? ( हंशा ) कुत्र्याला शिवूं देऊं नका, मग तो बाजूला भुंकत बसला तरी पर्वा नाहीं. ( टाळ्या ) सिडनहॅम साहेबाजवळ पैसा पुष्कळ असेल, पण त्याच्या पक्षाला सत्य व धर्म हीं नाहींत. आमचा पक्ष सत्याचा आहे म्हणून आम्हांला जय मिळाला पाहिजे हें ध्यानांत ठेवा. कौरवांच्या बाजूला ११ अक्षौहिणी सैन्य होतें आणि पांडवांच्याजवळ ७ होतें तरी शेवटीं पांडवांनाच जय मिळाला. ' यतो धर्मस्ततो जयः ' हें वचन लक्षांत घ्या व कार्याला लागा. दादासाहेब

खापर्ड्यांसारखे विद्वान् लोक तुमची बाजू मांडण्यासाठीं विलायतेस जायला तयार आहेत. गंगा आपण होऊन चालून आली पण तुम्ही आळशासारखे तिला लाथाडणार कीं पुढाऱ्यांस मदत करणार? भुतांना वाट दाखविणारे मांत्रिक तयार आहेत, पण तुह्मी त्यांना बोलवाल तेव्हां कीं नाहीं? वेळ इतकी आणीबाणीची आहे कीं, धडपड करून एकतर जिवंत रहा, नाहींतर ठार मरा! तुमच्याच घरांत तुम्हांला मालकासारखें रहावयाचें असेल तर ' उठा व उद्योगाला लागा. ' या कामांत आज राजद्रोह तर नाहींच नाहीं, पण भयंकर देशद्रोह मात्र होईल! (ऐका, ऐका!) मला तुमची अंतःकरणें पाहिजेत—पैसे नकोत! (त्रागा करून) एकादा श्रीमंत गांठला तर, किंवा एकादी रांडसुद्धां पैसे देईल! तुम्ही आलांत तर पैशाची मला बिलकुल काळजी नाहीं. प्रश्न असा आहे कीं ' तुम्ही पुरुषांप्रमाणें वागायला तयार होतां कीं नाहीं? ' शपथा घ्या कीं मी या कार्याला तनमनधनें करून मदत करीन! १।१ रुपया दिलात तरी दोन लाख माणसांचे दोनलाख रुपये होतील. दोन दिवस उपास केलात तरी ८ आणे होतात! स्वराज्याची आठवण पदोपदीं झाली पाहिजे. स्पष्ट उत्तरें द्या व उघड मदत करा. आळशी पुरुष नरकाला जातो असें गीतेंत सांगितलें आहे. परमेश्वर तुम्हांला उद्योग करण्याची बुद्धि देवो अशी त्याची प्रार्थना करून व आपण शांतपणें माझें भाषण ऐकून घेतलेंत याबद्दल आपले आभार मानून मी आपलें भाषण संपवितों. ' (टाळ्यांचा धडाका.) श्री. अणे यांनीं गोरगरिबांनीं जमा केलेले ३००० रु. लोकमान्यांस अर्पण केल्यावर, अध्यक्ष म्हणाले:—" गुरुवर्यांच्या उपदेशाप्रमाणें वागण्याचा निश्चय करा. दुष्काळ असला तरी उपासांत उपास काढून मदत केली पाहिजे. " श्री. गणपतराव दवंडे म्हणाले:--" बसा, बसा. लोकमान्य मोटारींत सुखरूपपणें बसेपर्यंत जाग्यावरून कोणीहि हालूं नये. आतांच त्यांच्या कपाळाला मघांच्या गर्दीत कोणाची तरी काठी लागली आहे. शिवाय पायाची जखम बरी झालेली नाहीं. " नंतर लोकमान्य जात असतां ' हे प्रभोवरदवर ' हें यवतमाळचें लोकप्रिय तिलकगीत गाण्यांत येत होतें.

( प्रकरण ७ वें )

# त्याला नमस्कार असो !

( पांढरकवडा )

चांद्याहून वणी ४२ मैल व पुढें वणीहून पांढरकवडा ३६ मैल ! म्हणजे हा प्रवास बराच कठीण होता. पण मोटार भरभक्कम असल्यामुळें फारशी भीति वाटत नव्हती. लोकमान्य हे वणीहून ( ता—१७—२-१९१८ रोजीं ) सकाळीं ९ वाजतां निघाले पण त्यांस पांढरकवडा गांठण्यास १२॥ झाले. वेशीवर हजारों लोकांनीं जमून लोकमान्यांचें स्वागत केलें. श्री. दामुअण्णा गद्रे हे आलेच होते. मंडपाच्या आड एक टेंकाड होतें तें पाडून मुद्दाम रस्ता बनवावा लागला होता. मोटार लोकांनीं ढकलीत नेली व ही छोटीशी मिरवणूकच झाली म्हणावयास हरकत नाहीं. सर्व शहरानें लोकमान्यांच्या आगमनाप्रीत्यर्थ आज दिवाळी साजरी केली होती. सभास्थान श्री. शेट ठाकरसीदास इंद्रलाल यांच्या जिनाच्या मंडपांत निश्चित केलेलें होतें. भर दोनप्रहरची तापाची वेळ असल्यामुळें व्यासपीठापुढें कुंड्या मांडून व सुरूच्या छोट्या वृक्षांमध्यें शतिल तुषारांचें कारंजें सोडून मौजेचा गारवा आणला होता. यवतमाळहून या समारंभास श्री अण्णासाहेब बापट, तात्यासाहेब हूड वगैरे पुढारी मंडळी मुद्दाम आली असल्यानें समारंभास विशेष प्रौढपणा आला होता. सभास्थानीं ४।५ हजार लोकसमूह जमला असून जाळीदार पडद्यामागें दोनशेंपर्यंत स्त्रीसमाजहि हजर होता. प्रारंभीं श्री. दामोदर नरहर ऐलकुंचीवार यांनीं सूचना केल्यावरून व श्री. सय्यद अबदुल यांच्या अनुमोदनानें श्री. अण्णासाहेब बापट या लोकमान्य—मित्रवर्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें. नंतर पांढरकवड्याचे करारी पुढारी श्री. दामुअण्णा गद्रे यांनीं लोकमान्यांस मानपत्र सादर केलें.

मानपत्र

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक!

केळापूर तालुक्यांतील लोकांतर्फे केलेल्या विनंतीस मान देऊन शारीरिक अस्वास्थ्य व कार्यबाहुल्य असतांहि अशा एकीकडील भागांत येऊन आपण आपल्या दर्शनाचा लाभ आम्हांस दिला त्याबद्दल आम्हीं आपले अत्यंत आभारी आहों.

प्रातकाल प्रसंगानुसार कर्तव्याकर्तव्याची आपल्या ठिकाणची जाणीव प्रशंसनीय आहे. स्वराज्यहक्क प्राप्त झाल्याशिवाय भारतभूचा तरणोपाय नाहीं हें जाणून आपण जे अहर्निश प्रयत्न करीत आहां ते आपणासारख्या कर्मयोगवीरास अनुरूपच आहेत. आपण केलेली " हिंदी स्वराज्यसंघा " ची स्थापना व देशांतील भिन्न मतांच्या राजकीयपक्षामध्यें अत्यंत परिश्रमानें घडवून आणलेला समेट इत्यादि गोष्टी याच्या निदर्शक आहेत.

शारीरिक अस्वास्थ्यामुळें इकडील भागांत येणें होत नाहीं, असा एकवार योग येऊन आमची निराशा झाली असतांहि केवळ वैदर्भीय बांधवांवर आपलें खरें प्रेम ह्मणूनच आपण वेळांत वेळ करून, प्रवासाचे दुःसह क्लेश सोसून येथवर आलां व आह्मास दर्शन देऊन पुनीत केलेंत याबद्दल आह्मांस धन्यता वाटते.

पांढरकवडा केळापूर तालुक्यांतील नागरिक.
ता. १७ फेब्रुवारी १९१८

मानपत्रवाचनानंतर श्री. खाडीलकर यांचें पांच मिनिटेंपर्यंत स्वराज्यावर व्याख्यान होऊन टाळ्यांच्या गजरांत लोकमान्य बोलावयास उठले.

लोकमान्य म्हणाले

" अध्यक्षमहाराज, व सभ्यगृहस्थहो, आपण सर्व लोक येथें जमून माझा जो सत्कार केलात, त्याबद्दल आभार मानणें हें माझें पाहिलें कर्तव्य होय. आभारीपणाचें देवाण–घेवाण कशा प्रकारें चालतें व त्याचा विनिमय कोणत्या तऱ्हेनें होतो हें पाहिलें म्हणजे आभार मानण्याची ही एक पडत

चाललेली पद्धतच होय असें वाटतें. तुम्ही बोलावलेंत, मी कबूल केलें व आलों याबद्दल तुम्ही माझे आभार कां मानावे तें कळत नाहीं. मी तरी आपले कां आभार मानावे ? मी ज्या कार्यासाठीं येथें आलों तें माझें एकट्याचें नाहीं, तें तुमचें एकट्याचें नाहीं, तें तुमचें व माझें आणि सर्व देशाचें आहे. ( टाळ्या. ) असें जर आहे तर कोणी कोणाचे आभार मानावयाचे ? आभार मानण्यासारखें मी कांहींच केलेलें नाहीं. आभार मानण्यासारखा कांहीं प्रसंग असेल तर वऱ्हाडांतील अगदीं दूरच्या गांवीं-सुद्धां स्वराज्याच्या व्याख्यानाला इतके लोक जमतात हें होय. पण हीं आनंदाची गोष्ट आहे–आभाराची नव्हे. येथें एवढा समाज जमलेला पाहून मला खरोखर फार आनंद होत आहे. व माझ्यासारखा आनंद ज्यांना स्वराज्य पाहिजे त्यांना होईल अशी माझी खात्री आहे. पण जे स्वरा-ज्याला विरुद्ध आहेत त्यांना मात्र दुःख होईल–वैषम्य वाटेल ! आभार मानण्याचा असला प्रसंगच सोडून द्या. स्वराज्याची इतकी कळकळ खेडे-गांवांतलि लोकांनासुद्धां लागली आहे असें जर मला कळलें तर मी एकदां काय दहादांसुद्धां येईन. ( टाळ्या. ) आम्ही जे लोक स्वराज्याची खटपट करतों, त्यांना देशांतील लोकांचें पाठबळ पाहिजेच आहे. आम्हांला असें विचारण्यांत येतें कीं ‘ तुम्ही स्वराज्य मागतां खरें, पण लोकांना तें कोठें हवें आहे ? ही तुमची १०।५ वकील लोकांची चळ-वळ आहे, झालें ! ’ या लोकांच्या प्रश्नाला चोख उत्तर म्हणजे आज येथें स्वराज्याच्या व्याख्यानाला जमलेला समाज होय. हे सारे लोक काय नोकऱ्यांसाठीं जमले आहेत ? ही आमची खटपट नोकरी मिळविण्याक-रितां नाहीं, मान मिळविण्याकरितां नाहीं. माझे हक्क गेले व माझ्याच घरांत मी परकी झालों याची मला शरम वाटते म्हणून ही सारी धडपड आहे. ( टाळ्या. ) अगदीं अशिक्षित शेतकरी असला तरी त्याला सहा-जिकच वाटतें कीं ‘मी माझ्या मताप्रमाणें शेतकी करीन, खर्च करीन.’ सारांश, प्रत्येकाला स्वतंत्रपणा पाहिजे आहे. स्वराज्य म्हणजे काय ? प्रजेचा हक्क प्रजेच्या हातीं देणें ! आज काय चाललें आहे ? सर्व भेदभा-वानें राज्य चाललें आहे. एकाच बादशहांच्या छत्राखालीं काळा व गोरा

असा भेद कां ? ज्याला साम्राज्य चालवावयाचें आहे, त्याला असा भेद करून चालावयाचें नाहीं. बादशहांना काय ? सगळी प्रजा सारखीच. ' आम्ही वर्णावर्णामध्यें व धर्माधर्मामध्यें भेद करून राज्यकारभार करणार नाहीं ' असें राणीसरकारांनीं वचन दिलें. मग तें मोडलें कोणी ? या नोकरांनीं, आम्ही नाहीं. ( टाळ्या. ) कमिशनरपासून पोलिसापर्यंत सारे नोकर, पण ते स्वतःला राजे समजतात. शेतावर नांगरायला म्हणून जो नोकर ठेवला तोच शेताचा मालक होऊन बसला अशी आज स्थिती झाली आहे. ' ही गोष्ट ज्या मालकाला खपेल तो माणूसच नव्हे ! ( टाळ्या. ) फार दिवस मानेवर जूं असलें म्हणजे जसा घट्टा पडतो, तशी आज तुमची स्थिती झाली आहे. 'असेंच चालायचें, काय करावें' हें खरें उत्तर नव्हे. तुम्ही मालक व हे नोकर हें खरें उत्तर होय. नोकर घरांत मालका-सारखा नाचत असतां जो मालक कपाळाला हात लावून स्वस्थ बसतो व ज्याला मुळींच वाईट वाटत नाहीं, त्याला नमस्कार असो ! अशीच जर तुमची स्थिती असेल तर ही सभा राहूं दे ! ( रागावून ) काय आम्हांला हें सारें कळत नाहीं ? कां आह्मांला डोळे नाहींत, कीं नाक नाहीं, कीं बुद्धि नाहीं ? नोकरांनीं चालविलेली पुंडाई बंद होईपर्यंत मी आपला प्रयत्न थांबवणार नाहीं, असा निश्चय करा, व स्वतःच्या घराचे मालक बना, ( टाळ्या. ) ही वेळ आहे. आज सर्व जगभर स्वातंत्र्याचा डंका वाजत आहे. किडकें धान्य वाळत घालायचें तर तें उन्ह पडलें असतांच घातलें पाहिजे. भिऊं नका. ' स्वराज्य देणार ' असें आतां खुद्द लाटसाहेबांनींच जाहीर केलें आहे. यावेळीं डगमगाल तर देश बुडवायला तयार व्हाल ! दादाभाईसारख्यांनीं खटपट करून या मार्गांतलें कांटे दूर केले आहेत, त्यांचे उपकार फिटणें शक्य नाहीं. या राजमान्य रस्त्यावरून जाणें हेंच त्यांच्या उपकृतीला स्मरणें होय. झोंपा घेऊं नका, प्रयत्नांची शिकस्त करा व जगाला कळवा कीं ' हिंदुस्थानांत सारे पशू नाहींत ! ' "

( टाळ्यांचा प्रचंड कडकडाट ) यानंतर रा. गद्रे यांनीं २७०० रुपयांची थैली अर्पण केल्यावर श्री. उद्धव सावकारांनीं घाटजी तर्फे २१५ रु. देणगी दिली. श्री. माधवरावजी अणे म्हणालेः—" आपण रा.

गणपतराव दंवडे यांना पाठविलें व लोकमान्य आले, तेव्हां त्यांचे उपकार कसे फेडावे ? लोकमान्यांचे सबंध भरतखंडावरच इतके उपकार झाले आहेत कीं, ( प्रेमभरानें ) आपल्या कातड्याचे जोडे करून त्यांच्या पायांत घातले तरी ते फिटणार नाहींत. आजच्या प्रसंगीं आपल्या प्रान्ताचें मंगलभूषण जे श्रीनिवासमहाराज ते येथें हजर राहिल्यामुळें समारंभास विशेष मांगल्य प्राप्त झालें आहे. '' रा. सहस्रबुद्धे म्हणाले:—" या गांवाला बाजिरावसाहेब पळतां पळतां आले होते पण आज हे पुण्याचे वीर स्वराज्यासाठीं पैसे गोळा करावयास आले आहेत. ''

रा. शिवरामपंत पत्की यांनीं हार घातल्यावर सभा संपली.

—:०:—

## प्रकरण ८ वें.

# बादशहानांस ठेंच लागली !

( वरोडा )

लोकमान्य पांढरकवड्याहून सायंकाळीं ४ वाजतां निघाले ते परत वणीच्या मार्गानें वरोड्यास आले. वाटेंत सायंकाळीं ६ वाजल्यावर वणी आलें. तेथें रस्त्यावरच पाहुणेमंडळीच्या चहाफराळाची व्यवस्था वणीकरांनीं केली होती. पाहुणचाराचा स्वीकार करून मंडळी निघाली ती वरोड्यास रात्रीं १० वाजल्यावर पोंचली. पांढरकवडा ते वरोडा हा प्रवास एकंदरींत फार सुखाचा झाला. मोटार खूप जंगी असल्यामुळें एका बाजूला लोकमान्यांच्या आसनांची स्पेशल व्यवस्था केली होती व त्यावर अंथरूण पसरलें असल्यामुळें लोकमान्यांसहि आरामानें प्रवास करतां आला. मोटारींत श्री. माधवरावजी असल्यामुळें लोकमान्यांनाहि

बोलण्याचालण्याची करमणूक लाभली. बरोडा येथें वेशीवर हजारों लोक बँड वगैरे वाद्यांनिशीं वाजत गाजत सामोरे आले होते. या ठिकाणीं नागपूरचे श्री. दादासाहेब उधोजी व बॅ. अभ्यंकर वगैरे मंडळी दौऱ्यांत येऊन सामील झाल्यामुळें दौऱ्यास विशेष शोभा आली. शृंगारलेल्या उघड्या बैलांच्या रथांत लोकमान्यांस बसविण्यांत आल्यावर शहरांतून थाटानें मिरवणूक काढण्यांत आली. पाहुणेमंडळीची उतरण्याची सोय श्री. पुरुषोत्तमराव पाटील यांच्या भव्य वाड्यामध्यें करण्यांत आली होती.

सकाळीं ८ वाजतां (ता. १८) गोलहजारांत व्याख्यानसमारंभ झाला. व्याख्यानासाठीं मैदान शृंगारलें असून मध्यभागीं एक छोटासा मंडप उभारून त्याचा आकार मखरासारखा केला होता. मंडपास नक्षत्रमाळादिकांनीं सजविलें असल्यामुळें एकंदर शोभा अप्रतिम दिसत होती. सभास्थानीं जमलेल्या १२।१५ हजार लोकांनीं जयजयकारानें लोकमान्यांचें सुस्वागत केल्यानंतर गोड आवाजाच्या मुलींनीं ‘ लोकमान्यांच्या सवालां’- तून ‘ बाळाचा पाळणा ’ व ‘ हे जगन्निवासा वितरीं चिरसौख्याला ’ हीं पद्यें फारच मोहक रीतीनें म्हटलीं. फुलें उधळून मुली स्वस्थानाधिष्ठित झाल्यावर रा. कांकडे वकील यांच्या सूचनेवरून व रा. नारायणराव भागवत यांच्या अनुमोदनानें श्रीमंत श्रीहरि देवराव देशपांडे यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें. नंतर श्री. देवराव मुकुंदराव पाटील ( ऑनररी मॅजिस्ट्रेट ) यांनीं लोकमान्यांस रौप्यकरंडकांतून मानपत्र अर्पण केलें.

### मानपत्र

## लो० बाळगंगाधर टिळक.

**प्रिय मान्यवर,**

आम्हीं बरोरा येथील नागरिक फार दिवसांपासून आपल्या दर्शनामृताची चातकाप्रमाणें अपेक्षा करीत असतां आज कपिलाषष्ठीच्या योगाप्रमाणें आपल्या दर्शनाचा योग आला आहे. आम्हांला झालेल्या आनंदाचें वर्णन करण्यास समर्थ अशा शब्दाभावीं, त्या निरर्थक प्रयत्नांत आम्हीं पडत नाहीं. तो आमचा आनंद आपण कल्पनेनेंच जाणावा.

उदंड व खडतर देहदंड सोसून केलेल्या अखंड देशसेवारूपी तपश्चर्येमुळें स्वराज्योन्मुख हिंदी राष्ट्राचे आपण आचार्य झालां आहांत. सर्वसामान्य देशमातेच्या हितसंवर्धनाकरितां केलेल्या असामान्य स्वार्थत्यागाबद्दल आपले अत्यंत ऋणी असलेले आम्ही लोक, आपणाला लोकमान्य म्हटल्याशिवाय कधींहि राहणार नाहीं. किंबहुना हिंदुस्थानांतील महाराष्ट्रांतील तेजस्वी राष्ट्रीय चळवळीचे आद्य प्रवर्तक आपण झालांत, म्हणून आम्ही आपलें अभिनंदन करितों. अनेक संकटकंटकांतून मार्ग काढीत काढीत आपण आपली स्वदेशी चळवळ स्वराज्याच्या मागणीपर्यंत नेऊन भिडविली या गोष्टीचा आम्हांला अभिमान वाटतो. सदाचरण, स्वार्थत्याग, मनोधैर्य, इत्याद्यनेक गुणांनीं आपण आम्हांला आदर्शभूत झालां आहांत.

आपण नेहमीं आमचे नजरेसमोर असावेत अशी आमची इच्छा असणें साहजिक आहे, परंतु तें शक्य नाहीं; म्हणून आपला प्रेमौघ आमचेवर निरंतर वाहत रहावा अशी आपलेपाशीं आमची प्रार्थना आहे.

आपले कृपाभिलाषी,

**वरोरा येथील नागरिक.**

नंतर जयजयकारांत लोकमान्य ह्मणाले:--"अध्यक्षमहाराज, व बंधुभगिनींनों, आपण जो हा माझा सन्मान केलात त्याबद्दल आपले आभार मानणें हें माझें कर्तव्य होय. हा सन्मान माझा व्यक्तीचा नसून मला निमित्त करून तो आपण स्वराज्याचाच केला आहे असें मी समजतों. आज सर्व देशभर जी एवढी स्वराज्याच्या चळवळींची लाट उसळली आहे ती जर उसळली नसती तर आपल्यामध्यें एवढा उत्साह उत्पन्न झाला असता कीं नाहीं याची मला शंकाच आहे. आज देशाला जी स्वराज्याची तहान लागली आहे, ती इतकी प्रखर आहे कीं, ती स्वराज्याविना दुसऱ्या कशानेंहि भागणें शक्य नाहीं. येथें एका निशाणावर लिहिलें आहे कीं 'स्वराज्याची तहान सुराज्यानें भागणार नाहीं.' पण मी ह्मणतों कीं, स्वराज्याची तहान सुराज्यानेंच काय पण दुसऱ्या कशानेंहि भागणार नाहीं' (टाळ्या) आतां जें मानपत्र आपण मला दिलेंत त्यावर ऑनररी मॅजिस्ट्रेट, इजारदार

यांच्याहि सह्या आहेत. हे लोक आजपर्यंत सरकारी अधिकाऱ्यांच्या रोषाला व पुंडाईला भीत होते. पण ती स्थिति आज गेली आहे. थोर पार्शी देशभक्त दादाभाई नौरोजी यांनीं आपल्या ८४ व्या वर्षी राष्ट्रीयसभेच्या अध्यक्षपदावरून जाहीर केलें कीं 'आतां किरकोळ मागण्या मागत बसण्यांत अर्थ नाहीं, स्वराज्य मागा.' (टाळ्या) अधिकारीवर्ग कांहीं वेडा नाहीं. ते एवढाले पगार खातात, त्यांना काय तुमची दुःखें कळत नाहींत? कळत नाहीं हें खोटें आहे. ते करीत मात्र नाहींत! 'स्वराज्य मागा' असें एका पार्शी गृहस्थानें सांगितलें-ब्राह्मणानें नाहीं. तरी लोकांत भीति होती; नंतर एका माणसावर खटला झाला, पण सुदैवानें स्वराज्य मागणें हें कोर्टानें कायदेशीर ठरविलें. पण भीति ही पिढ्यानपिढ्याहि चालत असते. भीति कांहीं पार गेली नाहीं. आईबापांचीं दुष्कृत्यें केव्हां केव्हां मुलांना भोंवत असतात, तसें झालें. (हंशा) पुढें निघालें कीं, मागा पण दोष देऊं नका. हांक मारायची तर मारा पण शिवी देऊन मारूं नका. पण स्वराज्य मागायचें तर पूर्वीच्या राज्यद्धतीचे दोष दाखावेणें हें हि कायदेशीर ठरलें. पुढें युद्ध आलें व आमची बादशहांना पारख झाली. प्रसंग आल्याशिवाय पारख होत नसते असें जें ह्मणतात तेंच खरें. गव्हर्नरसाहेब वगैरे सारे अधिकारी ह बादशहांचे नोकर! या नोकरांना बादशहांनीं सांगितें कीं, 'लोकांची सुधारणा करा, त्यांना शिकवा, शूर करा.' पण या नोकरांनीं काय केलें? त्यांनीं आपलाच सपाटा सुरू केला व 'लोक बंड करतील' या भीतीनें लोकांना असें कदरंत ठेवलें कीं, 'सर्वांना जीव मुठींत धरून रहावें लागलें! या नोकरांचा तडाखा असा कीं, त्यांनीं राणीच्या जाहिरनाम्यालाच अशक्य ठरवून राणीला व बादशहांनाच कर्झन साहेबांनीं वेडें ठरविलें. पण त्यावेळीं या नोकरांना असें कोणीं सांगितलें नाहीं कीं, 'जर तुम्हांला जाहीरनामा अशक्य वाटतो तर नोकरी सोडा--दुसरा कोणी जाहीरनामा शक्य करून दाखविणारा इसम येईल! (हंशा, व टाळ्या.) या नोकरांची कदर इतकी कीं, तुम्ही सभेला गेलां तरी तेथें तुमच्या मुलांनीं जातां कामा नये! बागवान जसा लहानपणींच झाड वळवितो तसें हें यांचें कृत्य

आहे. सात रुपयांचा पोलिससुद्धां जेव्हां कोणाहि प्रतिष्ठित माणसावर कद्र चालवितो, तेव्हां आतां यापेक्षां जास्त लाजिरवाणें तें काय राहिलें? ज्या नोकरांनीं खुद्द बादशहांच्या हुकुमाला गुंडाळून ठेवलें, ते लोकांची काय पर्वा करणार तें दिसतेंच आहे! या नोकरांचें येऊन जाऊन धोरण काय, तर ३३ कोटी लोक गुरांसारखे एका गोठ्यांत कसे राहतील? 'हे वाजवीपेक्षां फाजिल उर्मट झालेले नोकर काढा व त्यांच्यावर अधिकार चालविण्याची सत्ता लोकांच्या हातीं द्या' अशी आह्मी पुष्कळ ओरड केली पण ऐकतो कोण? ही ओरड केली तेव्हां काय आम्ही राजद्रोही? आम्ही राजद्रोही नाहीं--बादशहांचा हुकूम धाब्यावर बसविणारे नोकरच राजद्रोही! आम्हांला बादशहा पाहिजेत--आम्हांस साम्राज्यापासून तुटावयाचें नाहीं, मग आम्ही कसे राजद्रोही? पण असें आहे कीं, धन्यालाच ठेंच लागल्याशिवाय तो उंबरठा उंच करीत नाहीं. दुसऱ्यांनीं पुष्कळ सांगितलें कीं 'हा उंबरठा आपटतो' पण तें मालकाला थोडेंच खरें वाटणार? जेव्हां मालकाचेंच टाळकें सडकेल तेव्हां तो आपोआप सुतार बोलावतो व उंबरठा नीट करतो! तशी ठेंच या महायुद्धानें बादशहांना लागली. बादशहांनीं या नोकरांना सांगितलें 'हिंदुस्थानांत तीसकोट माणसें आहेत, त्यांपैकीं ५।५० लाख माणसें तरी पाठवा.' पण या नोकरांजवळ ४।५ लाखांच्यावर माणसें आहेत कुठें? तेव्हां आतां बादशहांची खात्री झाली कीं, 'या नोकरांनींच आपला मान न ठेवतां मधल्यामध्येंच शाही गाजविली रे गाजविली!' (हंशा व टाळ्या) यावेळीं बादशहांना स्पष्ट सांगा कीं 'आम्हांला संतुष्ट कराल, आमचे हक्क आह्मांला द्याल तर आम्ही तुमचेकरितां मरावयास केव्हांहि तयार आहों! (टाळ्या.) पण तुम्हांला विरोध करणारे लोक विलायतेंत कंबर बांधून बसले आहेत, त्यांचा पाडाव केला पाहिजे. याच कामाकरितां दादासाहेबांसारखे लोक जायला तयार झाले आहेत--त्यांना पाठिंबा द्या व मदत करा. परमेश्वर तुम्हांस तशी बुद्धि देवो!' (टाळ्यांचा गजर.) नंतर लोकमान्यांच्या चरणीं २५०० रुपयांची थैली नजर करण्यांत आल्यावर श्री. खाडिलकर म्हणालेः--"विलायतेंत सिडनहॅम साहेबासारखीं धुवडें तुमच्या विरुद्ध धुः-

थुः करीत आहेत! ( हंशा. ) त्यांना पिंजऱ्यांत घालण्याकरितां लोकमान्यांसारखे तेजस्वी पुरुष तिकडे जात आहेत. असे तेजस्वी पुरुष गेले, तर त्या बुद्रुडांना त्यांच्याकडे पाहण्याचीसुद्धां छाति होणार नाहीं." ( टाळ्या. ) नंतर हारतुरे अर्पण करतांना शेट दाउदभाई म्हणाले:—मुसलमान बिरादरोंके तर्फ हार अर्पन करतां हूं." श्री. पुरुषोत्तम पंडे म्हणाले:—" ज्यांच्या आगमनाची आम्ही चातकाप्रमाणें वाट पहात होतों, त्या लोकमान्यांच्या दर्शनानें आम्ही तृप्त झालों आहों. ज्यांनीं ज्यांनीं आम्हांस मदत केली त्यांचेंहि आभार मानले पाहिजत." नंतर एका मोलमजुरी करणाऱ्या बाईनें दोनरुपये दिल्यावर श्री. नारायणराव वैद्य यांनीं लोकांस स्वराज्य फंडास मदत करण्याविषयीं आव्हान केलें व श्री. शेट चुनीलालजी यांनीं पानसुपारी केली. शेवटीं अध्यक्ष म्हणालें:—" लोकमान्यांचा जलप्रवास सुखकर होवो!"

व्याख्यानानंतर मंडळी रेल्वेवर वर्ध्याची गाडी गांठण्यासाठीं गेली. लोकमान्य २ वाजतां वाटेंत हिंगणघाट येथें उतरले. त्यांचें तेथें ५००० लोकांपुढें स्वराज्यावर व्याख्यान होऊन त्यांस १ हजार रुपये अर्पण करण्यांत आलें. व्याख्यानानंतर लोकमान्य तडक मोटारींतून वर्ध्याकडे रवाना झाले.

---

## ( प्रकरण ९ वें. )

# ' प्राण जावो वा राहो ! '

## ( वर्धा. )

हीं कांहींतरी वर्धानिवासी जनांची पूर्वपुण्याईच असली पाहिजे; नाहीं तर असला सृष्टिदेवीला माहीत नसलेला चमत्कार कसा घडून

यावा ? ता. १८ रोजींचा सूर्य रजनीदेवीच्या श्यामल मुखकमलाकडे टक-मक पहात खालीं खालीं चालला होता. सूर्य अस्ताला गेला म्हणजे अंधार पडत असतो हा जो सृष्टीचा सर्वसामान्य नियम तो काय वर्ध्याला घडत नसतो ? वाः, असें कसें होईल ? सूर्य जसजसा अस्ताचलाकडे धांव घेऊं लागला तसतसें अन्धःकाराचें राज्य माजून राहण्याऐवजीं जिकडे तिकडे एका प्रकारच्या विलक्षण तेजानें दशदिशा फुलून गेल्या होत्या. 'मी चाललों पण माझा सहकारी प्रकाश कसा येत नाहीं' हें कोडें कांहीं सूर्यदेवाला उलगडेना !

प्रकाशाचा हा लपंडाव

पाहून सूर्याला जास्त जास्त जणुं चीडच येत होती कीं काय असा भास होत होता. प्रकाशाची ही वंचना ओळखून सूर्य रागानें लाल झाला. सूर्याची चीड इतकी बेफाम झाली कीं, त्यानें समुद्रांत उडी घेऊन जीव दिला.

सूर्यानें आपलें तोंड लपविलें म्हणून कांहीं आज वर्ध्याला प्रकाशदेव भ्याला नाहीं; त्याला जणुं हर्ष होत आहे असें दिसलें. आणि कां नाहीं हर्ष होणार ? तो सूर्यदेव गेला असला तर असो, पण तेवढ्यानें तेजाला काय फिकीर वाटणार ? तेजाला काय जो तेजोगोल भेटेल त्याच्या पुढें प्रकाशावयाचें एवढें माहीत ! वर्ध्याचा सूर्य अस्ताला गेला पण दुसरा एक दैदिप्यमान सूर्य आज वर्ध्याला प्रकाशावयाचा होता. हा सूर्य चैतन्यपूर्ण आणि स्वयंप्रकाश होता. हा बालसूर्य वर्धा येथें ता. १८ रोजीं सूर्यास्तसमयीं प्रकाशला आणि काय मौज उडाली ? त्या सूर्याला आपलीं मुखकमळें कधींहि न दाखविणाऱ्या तारकावली नभांच्या नीलवर्ण सौधांवर आरूढ होऊन या बालरवीला पहावयास शुभ्रवर्ण शालू पेहरून डोकावूं लागल्या ! जी तारकाबालिकांची महाराज्ञी चंद्रिका त्या प्रखर पराक्रमी सूर्याच्या पुढें तोंडावरील बुरखा कधींहि काढून टाकावयाची नाहीं तीच चांद्रिकादेवी सर्वांना बरोबर घेऊन नभाच्या दिव्य मंदिरामध्यें बालरवीचें दर्शन घेण्यास येऊन बसली. ही झाली वरच्या नभांतील गोष्ट ! खालील भूतलावरसुद्धां हाच

## आनंदाचा थाट

उडाला होता. वर्धानगरीमध्यें आज दिवाळीचा सण साजरा होत नसून जिकडे तिकडे दीपावलीचा लखलखाट चमचमत होता. बालरवीच्या रथाला आक्रमावयाचे मार्ग गुढ्यातोरणें व नानातऱ्हेच्या कमानी यांनीं मनोरम रीतीनें शृंगारले असून वाद्यांचा झुमझुम ध्वनि कर्णांना आल्हाद देत होता. वर्ध्यांतील भव्य चौकाची शोभा तर काय वर्णावी ? एवढें विस्तीर्ण पटांगण पण तें श्रृंगारानें मढवून टाकलें होतें. पटांगणावर साध्या रुजाम्यांचें आच्छादन घातलें असून सर्व पटांगणभर लखलखीत दीपांचा चकचकाट उडवून दिला होता; पटांगणाच्या मध्यभागीं उच्च सिंहासन उभारलें असून त्यावर गाद्यागिरद्यांचा पेशवाई थाटमाट केला होता. पटांगणाच्या भोंवतालच्या गृहांवरून दीपांचीं चिरांगणें थाटलीं असून त्यांना गुढ्यातोरणांनीं मांगल्य आणलें होतें. पटांगणामध्यें लोकांचा समुद्र पसरला असून जमलेला जनसमाज २०।२५ हजारांवर होता. चोहोंबाजूंच्या प्रासादांवर

## हजारों ललनांनीं

गर्दी उडविली असून त्या आपल्या बालकांना तिलकबाल दाखविण्याला उत्सुक झाल्या होत्या. चौकाच्या चारी रस्त्यांवर महंमदी व हिंदी व्यापाऱ्यांनीं भव्य व थाटदार कमानी उभारल्या असून त्यांवर स्वराज्योद्बोधक वाक्यें कोरलीं होतीं. लोकमान्यांची स्वारी सभास्थानीं दाखल होतांच लोकांनीं जयजयकार केला व ललनांनीं पुष्पवृष्टि केली. प्रारंभीं डॉ. मारुतराव व रा. देशपांडे यांनीं मंगल गीतें गाइल्यावर बॅ. धारपुरे म्हणाले:—" आजचा दिवस परम मंगल असून आल्हादकारक आहे. आज आमच्या शहरीं हिंददेवीची प्रत्यक्ष मूर्ति अवतीर्ण झाली आहे. ( टाळ्या ) आज येथें धैर्याचा मुकुटमणी, स्वदेशीचा पुरस्कर्ता, स्वराज्याचा आद्यजनक, जनतेचा अनभिषिक्त राजा, साधुवर्य टिळक आले म्हणून आम्हांला हा दिवस अत्यंत भाग्याचा वाटतो. महात्मा टिळक हे कर्मयोगाचार्य असून ते सूर्यनारायणाचे अंश आहेत. कृष्णानें

१० अध्याय गीता सांगितली पण अर्जुनाचा मोह दूर करण्याकरितां जसें परमेश्वराला

## विश्वरूपदर्शन

द्यावें लागलें तसें आम्हांला स्वराज्याचा मंत्र कथन करण्याकरितां लोकमान्यांनीं आपलें दिव्य व पुण्यपावन दर्शन दिलें आहे. " रा. देशपांडे जोरजोरानें म्हणाले:—" मेरा प्यारा तिलक, नहि नहि मेरा जान तिलक, नहि नहि मेरा दिल तिलक ( टाळी ) आज पोंहचा है। हम् तिलककु मेरा जान तिलक कहूंगा और नाचुंगा। " ( आनंदानें उड्या मारतात. ) रा. करमरकर म्हणाले:—" टिळक हे योगी आहेत. योगी हा जसा आपला इंद्रियग्राम आपल्या ताब्यांत ठेवतो त्याप्रमाणें टिळक हे अधिकारीवर्गाची सत्ता आपल्या ताब्यांत यावी म्हणून प्रयत्न करीत आहेत. " नंतर अध्यक्षस्थान स्वीकारून रा. पुरुषोत्तमपंत परांजपे म्हणाले:—' एवढा समाज माझ्या आठवणींत येथें जमलेला नाहीं. लोकमान्य टिळक हे एक जगद्विलक्षण पुरुष आहेत. ते जसे सरळ, शांत स्वभावाचे व मनमिळाऊ आहेत तसेच ते विद्वान असून जगाला तेजानें दिपविणारे आहेत; आतां स्वराज्याची चळवळ करण्याकरितां जें डेप्युटेशन लवकरच विलायतेस जाणार आहे त्याकरितां पैसे मागण्यास ते आले आहेत, तर त्यांचा आपण योग्य सत्कार करावा. ' नंतर रा. गोपाळराव लुले-यांनी रेशमी रुमालावर सुवर्णाक्षरांनीं कोरलेलें मानपत्र रौप्य करंडकांत घालून

## लोकमान्यांच्या चरणीं

समर्पण केलें. २०।२५ समाजांतर्फे हारतुरे अर्पण करण्याचा विधि झाल्यावर श्री० गंगाधरराव देशपांडे म्हणाले:—" अध्यक्षमहाराज व सभ्यगृहस्थहो, आतां थोड्याच वेळानें लोकमान्य टिळक आपणांस दोन उपदेशपर शब्द सांगणार आहेत. पण त्यापूर्वीं मी दोन शब्द बोलावे म्हणून मला अध्यक्षांनीं आज्ञा केली आहे. लोकमान्यांच्या आगमनानें व दर्शनानें आपण धन्य झालां आहांत असें जें आपण मानपत्रांत नमूद केलें आहे तें अगदीं खरें आहे. लोकमान्यांचें दर्शन हें नेहमींच पुण्यकारक व परिणाम-

कारक असतें. पण आज ज्या मंगलकार्याकरितां त्यांनीं आपणांला प्रेमाची भेट दिली आहे तो प्रसंग विशेष महत्वाचा आहे. यावरून आपणांस हा प्रसंग किती मंगल व अभिमानास्पद आहे याचा

उलगडा होईल.

लोकमान्यांनीं जें कार्य हातीं घेतलें आहे त्या कार्यासाठीं लोकमान्यांना पैसा पाहिजे आहे व तो मागण्यासाठीं लोकमान्य येथें आले आहेत ही गोष्ट कांहीं अंशीं खरी आहे. पण केवळ पैसा मागण्याकरितां ते आले असें मला वाटत नाहीं. ( टाळ्या ) लोकमान्यांना पैशाची बिलकुल किंमत वाटत नाहीं. त्यांना काय, नुस्ती इच्छा केली तरी केवळ इच्छा-मात्रें करून वाटेल तितका पैसा त्यांच्या पायांवर लोटांगण घालून येईल ! ( टाळ्या ) या त्यांच्या अद्भुत शक्तीचा अनुभव केवळ महाराष्ट्रालाच आला आहे असें नव्हे तर सर्व हिंदुस्थानाला आला आहे. ( टाळ्या ) लोकमान्यांना तुमचा पैसा नको आहे. लोकमान्यांना तुमचीं अंतःकरणें पाहिजे आहेत. तीं अंतःकरणें—पवित्र आणि निर्भय अंतःकरणें द्या; पैसा काय, ते वाटेल तेथें उत्पन्न करूं शकतील. ( टाळ्या ) ते आतां लवकरच विलायतेस आमच्या

स्वराज्याची शिष्टाई

करण्याकरितां जाणार आहेत. ते तेथें गेले म्हणजे त्यांना ' तुम्हाला हिंदी जनतेचा पाठिंबा आहे काय ? ' असा जर कोणी विलायतेस प्रश्न केला तर काय, त्याला १० लाख रुपये माझ्याजवळ आहेत असें ते उत्तर देतील ? हिंदुस्थानांतील ३३ कोटी लोक माझ्यापाठीमागें आहेत, असें लोकमान्यांना विलायतेंत उत्तर देतां आलें पाहिजे. नुसत्या रुपयांचा बोजा काय कामाचा ? तुमचीं अंतःकरण त्यांच्या पाठीमागें आहेत असें सांगण्याचा अधिकार लोकमान्यांस द्या. अशीच शिष्टाई खरोखर परिणामकारक होईल हें लक्षांत ठेवा. ' स्वराज्याची मागणी ही हिंदुस्थानांतील अखिल जनतेची मागणी आहे व या मागणीचा अवमान कराल तर तुम्ही ३३ कोटी लोकांच्या असंतोषाला पात्र व्हाल व मग तुम्हांला त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतील ' असें लोकमान्यांना विलायतेंत जोरानें

सांगतां आलें पाहिजे. ( टाळ्या ) तरच शिष्टाईला यश येईल. पैशाला घेऊन काय करतां ? तुमचीं अंतःकरणें मागण्याकरितां लोकमान्यांनीं येथें येण्याची तसदी घेतली आहे. ती लक्षांत घ्या अशी आपणांस विनंति करून मी माझें भाषण पुरें करतों. ” ( टाळ्यांचा गजर ) नंतर

लोकमान्य टिळक

टाळ्यांच्या कडकडाटांत म्हणाले:—“ अध्यक्षमहाराज, सभ्यगृहस्थ आणि कुलीन स्त्रियांनो, आपण येथें जमून इतक्या अपूर्वरीतीनें माझा सन्मान केलात याबद्दल आपले आभार मानणें हें माझें पहिलें कर्तव्य आहे, पण आभार मानतांना मनामध्यें अशी शंका उद्भवते कीं, मी तुमचे आभार काय म्हणून मानावे व तुम्हीं तरी मी येथें आलों म्हणून माझे कां आभार मानावे ? कोणी, कोणाचे व काय म्हणून आभार मानावयाचे हा विचार करा. एकमेकांचे आभार मानून आभारांची देवघेव करणें हा जरी नेहमींचा शिरस्ता किंवा प्रचार असला तरी याचा तात्विक दृष्टीनें कोणी विचार केला आहे काय ? तुम्हांला वाटत असेल कीं, मी जें काय करतों तें तुमच्यासाठीं करतों म्हणून ! पण मी तुमच्यासाठीं हें काम करतों व तुम्हीं माझा सत्कार करतां या दोन्हीहि गोष्टी खोट्या आहेत. मी जें काय करतों तें कांहींतरी मला आंतून प्रेरणा झाली म्हणून करतों, तें तुमच्यासाठीं किंवा दुसऱ्या कोणासाठीं करतों असें मुळींच समजूं नका. मी जें करतों तें

कर्तव्य म्हणून करतों.

तें तुमच्यासाठींहि करीत नाहीं, सरकारकरितां नाहीं किंवा इंग्रज साम्राज्याकरितांहि नाहीं. मी या देशांत जन्मास आलों, मी पिढ्यानपिढ्या, या देशांत राहतों, मी या देशाचें अन्नपाणी खातों म्हणून माझ्यावर विशिष्ट प्रकारची जबाबदारी पडली आहे. ही जबाबदारी या देशांतील प्रत्येक माणसावर आहे. ती जबाबदारी न ओळखतां मी जर माझ्या मातृभूमीला विसरलों तर मला माझ्या धर्माप्रमाणें अधोगति प्राप्त होईल. ही माझी भावना आहे म्हणून मी हें काम करतों—तुमच्याकरितां नव्हे ! अथवा ‘मी हें काम दुसऱ्यासाठीं करतों’ अशी जर कोणाची भावना असेल

तर तें काम त्याच्या हातून नीट रीतीनें पार पडणें शक्य नाहीं. जेव्हां कांहीं कर्तव्याची मनांत प्रेरणा होते तेव्हांच त्या कामाला कांहीं फळ येतें. आमच्यामध्यें एक ग्राम्य ह्मण आहे कीं, म्हैस कांहीं मालकाकरितां दूध देत नाहीं. [ हंशा ]

## या ह्मणीचा अर्थ

लक्षांत आणा. तुम्हीं काय माझ्या दर्शनाकरितां जमलांत होय ? काय, मला पाहाण्यांत कांहीं पुण्य आहे ? ( ' आहे ! ' आहे ! ' असा ध्वनि ! हंसून ) आहे म्हणतां तर कसलें पुण्य आहे तें सांगा. आज ही जर स्वराज्याची चळवळ चालू नसती, तुमच्या मनांत जर स्वराज्याच्या कल्पना घोळत नसत्या, तर एक टिळकच काय, पण १० टिळक आले असते तरी येथें एवढा मोठा समाज खास जमला नसता ! स्वराज्याविषयीं आपण कांहीं तरी केलें पाहिजे या बुद्धीनें तुम्ही सारे जमलां आहांत असें मी समजतों. ( टाळ्या ) असें जर आहे तर कोणी कोणाचे आभार मानावयाचे ? मी तुमचे आभार मानीत नाहीं व तुम्हीं माझेहि आभार मानूं नका. आभार मानण्याची रीत ही पाश्चात्य आहे. या आभारप्रदर्शनास आमच्या वेदान्तशास्त्रांत आधार नाहीं. स्वराज्यप्राप्तीसाठीं ज्या गोष्टी तुम्ही व मी दोघे मिळून केल्या पाहिजेत, त्या अगोदर करूं या व आपल्या प्रयत्नांना यश आल्यावर परमेश्वराचे आभार मानूं या. ( टाळ्या ) आज आपण एकमेकांचे आभार मानणें म्हणजे तुमच्या भोंवती मी व माझ्या भोंवती तुम्ही

## दिवे ओंवाळण्यासारखें

आहे. अजून एकमेकांभोंवती दिवे ओंवाळीत बसण्याचा दिवस आलेला नाहीं. तो दिवस यावा म्हणून आमची ही खटपट आहे. ( टाळ्या ) तुम्ही जे देवळांत जातां ते देवाच्या मूर्तीचा दगड पाहण्याकरितां जात नाहीं. त्या मूर्तीच्या ठिकाणीं परमेश्वराची भावना ठेऊन आपण जातों. त्याप्रमाणें माझ्या ठिकाणीं स्वराज्याच्या दगडाच्या मूर्तीची भावना ठेवून माझ्या तोंडून स्वराज्याबद्दल दोन शब्द ऐकण्याकरितां आपण जमला आहां असें मी समजतों. ( टाळ्या ) आतांच जें आपण मला मानपत्र

दिलें त्यामध्यें माझ्या गुणांचें वरेंच वर्णन आहे. त्याचें जर मी विस्तृत खंडन करीत बसलों तर सर्व वेळ त्यांतच निघून जाईल. याकरितां त्या भानगडींत मी पडत नाहीं. हीं मानपत्रें म्हणजे ' अहोरूपमहो ध्वनिः ' या कोटींतलीं असल्यामुळें माझी आपणाला विनंति आहे कीं, तीं विसरून जा. इतकी प्रस्तावना करून आतां मी मुख्य विषयाकडे वळतों. आजचा काळ स्वराज्याच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचा आहे. आज हिंदुस्थानच्या राजकार- भारांत जी क्रांति होणार आहे त्या

## घडामोडीचीं कारणेंहि

तितकींच महत्त्वाचीं आहेत. ही केवळ राज्यक्रांति नसून ती एकप्रकारें समाजक्रांति आहे. राज्यक्रांति हा शब्द उच्चारल्यावरोबर कोणाला वाटेल कीं, इंग्रजी राज्य हिंदुस्थानांतून घालवून लावणार कीं काय ? पण राज्यक्रांति याचा अर्थ राज्यकारभारांत फेरबदल एवढाच आहे. इंग्रजी राज्याच्या कारकीर्दीत असा काळ शेंदोनशें वर्षांत आला नव्हता. ( मागें खेंचलेल्या गर्दीकडे पाहून ) खालीं बसा. खालीं बसाल तर सर्वांना ऐकायला येइल, तुम्ही शांत राहिल्याशिवाय माझा आवाज एवढ्या मोठ्या समाजाला ऐकावयास येणें शक्य नाहीं, वक्त्यावरोबर श्रोते चांगले असले तरच

## रंग उठतो,

असें दासबोधांत सांगितलें आहे. असो, स्वराज्य म्हणजे काय हें आज नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. स्वराज्य शब्द उच्चारतांच १०।१५ वर्षांपूर्वी गाळण उडत असे. पूर्वी असा समज झाला होता कीं, ज्यामुळें ऑनररी मॅजिस्ट्रेटी जाते, ज्यानें शिक्षा होते, ज्याच्यायोगानें वक्त्याला साहेब तुरुंगांत घालतो तें स्वराज्य ! (हंशा) स्वराज्य ही कांहीं तरी भयंकर चीज आहे असा पूर्वी समज होता. स्वराज्य शब्द उच्चारतांच आपणांस शिक्षा होणार, इस्टेट जप्त होणार, आपण बायकापोरांना अंतरणार अशी भीति वाटे. असें झालेलेंहि आहे. पण ती भीति आतां गेली आहे. (टाळ्या) स्वराज्य हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे असा

आतां सर्वांचा समज झाला आहे. स्वराज्य मागितलें नाहीं तर मी पशु ठरेन अशी भावना आज लोकांमध्यें पसरली आहे.

### भीति गेली.

पूर्वी स्वराज्य शब्द उच्चारतांच ज्या अधिकाऱ्यांची गैरमर्जी होत असे तेच अधिकारी आज ह्मणूं लागले आहेत कीं, 'लोकांनीं स्वराज्य मागितलें पाहिजे व आम्ही तें दिलें पाहिजे.' (टाळ्या.) स्वराज्य म्हणजे आज सरकारचा रोष होण्याची वस्तु राहिलेली नाहीं. क्षणभर विचार करा, एखादा माणूस तुमच्या घरांत शिरला आणि म्हणूं लागला कीं, 'मी सांगेन तेथें बस, मी देईन तेवढें अन्न खा, मी देईन तितकेंच पाणी पी, मी सांगेन त्याच शाळेंत मुलाला घाल,' तर तुम्ही त्याला काय म्हणाल? तुम्ही अशा माणसाला थारा द्याल? त्याला सांगाल मी या घराचा मालक, मी वाटेल तें खाईन व पिईन, तूं आधीं घराच्या बाहेर चालता हो. (टाळ्या.) जो माणूस पोर आहे किंवा वेडा आहे तोच

### असले धरबंद

सहन करील. अशी तुमची स्थिति तुमच्या घरांत झाली आहे. आजपर्यंत तुम्ही याविरुद्ध प्रयत्न केला नाहीं हीच मोटी दुर्दैवाची गोष्ट होय. १८५८ सालीं बंड झालें व बादशहांनीं कंपनीच्या हातून राज्यकारभार काढला ती कथा तूर्त राहूं द्या. नंतर बादशहांनीं हिंदुस्थानचा राज्यकारभार नोकरांच्या हातीं प्रजेच्या कल्याणासाठीं दिला. स्टेट सेक्रेटरीपासून तों पोलिस शिपायापर्यंत सारे नोकर आहेत. बादशहांनीं या नोकरांना सांगितलें कीं, प्रजेचा संतोष तीं राज्याची बळकटी. प्रजा व राजा या दोघांच्या तंत्रानें जो कारभार चालेल तोच प्रजेला सुखकर होतो. ज्याप्रमाणें प्रजेचे धर्म आहेत त्याप्रमाणें राजाचेहि धर्म आहेत. हे परस्पर धर्म पाळले नाहींत तर दोघांचेंहि नुकसान होतें. प्रजा म्हणजे कांहीं राजाचे गुलाम नव्हत, किंवा राजा म्हणजेहि अंमल चालविणारा राक्षस नव्हे. राजा व प्रजा यांमध्यें जेव्हां एकप्रकारची एकी असते तेव्हांच राज्यकारभार सुरळित चालतो. हें तत्त्व झालें. बादशहांनीं प्रजेचा संतोष

राहील असा कारभार करावयास या नोकरांना नेमलें पण तुमची काय स्थिति झाली पहा. हा देश हें

## तुमचें घर

आहे असें म्हणतां पण तुमची तुमच्या घरांत काय स्थिति झाली आहे ? तुमच्या नंबरांत झाड असलें तर त्याचीं पानें तरी तुम्ही तोडूं शकतां काय ? तुमची तुमच्या जमिनीवर मालकी किती ? जमिनींत नांगराचा फाळ जाईल इतकी ! यापेक्षां अधिक खणून जर द्रव्य सांपडलें तर तें सरकारचें ! तुह्मांला शेत वंशपरंपरा नांगरण्याचा मात्र हक्क राहिला आहे. तुम्ही शेती खुशाल करा, पण तुम्ही इतके दुबळे झालां आहां कीं, तें धान्य विकावयासुद्धां साहेब लागतो. तुह्मी येथें जें पोतें दोन रुपयांना विकतां त्याचे विलायतेंत १० रु. येतात. हा नफा मधल्यामध्यें कोणी खाल्ला ? तुमचा व्यापार बुडाला. तुमचे कोष्टी कोठें गेले ? रंगारी काय झाले ? पूर्वी तेली होते ते सुद्धां

## घासलेट तेलानें मारले.

मातीचीं भांडीं येतात त्यांना चायना म्हणतात. पण येतात विलायतेंतून ! जसें काय सर्व जीवन एकप्रकारें आटत चाललें आहे. ( टाळ्या ) तुमच्या मर्जीविरुद्ध सुराबाई तुमच्या घरांत शिरली ती कां ? शिपाई-गिरीचा धंदा होता तोही पूर्वी ज्यांनीं हिंदुस्थानांत धामधूम उडवून दिली होती ते जाट, रजपूत, मराठे कोठें गेले ? सारांश काय ? शेत-करी, वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण—सर्वांचाच धंदा बसला. ब्राह्मण पूर्वी वेद सांगणारे पण तें काम आतां मॅक्समुल्लर करतो. क्षत्रियांचें काम किचनेर-साहेबांकडे गेलें. वैश्य गेले आणि रॅलीब्रदर्स आले ! ही चोहोंबाजूंनीं देशाची ओहोटी कोणी केली ? शहाण्या पुरुषांनीं विचार करून ठरविलें कीं, अधिकारीवर्गाच्या राज्यपद्धतीनें ही ओहोटी लागली. बादशहांना हें संमत नव्हतें. हिंदुस्थानच्या लोकांना शिकवा, सुधारा, शूर करा, असा जाहिरनामा काढून बादशहांनीं या नोकरांना नेमलें. पण नोकर सनदी

## वतनदार बनले.

बादशहांना वाटलें कीं, हे नोकर प्रजेला सुखकर कारभार करतात. बाद-

शहांनीं मधून मधून ५।२५ वर्षांनीं यांच्या कारभाराचा आढावा घेतला नाहीं. दुकानाचा आढावा वर्षाच्या वर्षास घ्यावा लागतो, मग राज्य-कारभाराचा आढावा निदान २५।३० वर्षांनीं तर खरा? आम्हीं पुष्कळ तक्रारी केल्या पण कोणी ऐकेना, या नोकरांच्या कारभारानें लोक दिवसेंदिवस नामर्द बनत चालले आहेत अशीहि ओरड केली! आम्हीं सांगितलें कीं, या नोकरांनीं घरांत शिरून आम्हांला

'त्राहित्राहि' केलें

आहे. पण कोणीं त्या वेळीं लक्ष दिलें नाहीं. आमची कथा काय? बादशहांनीं प्रजेला संतुष्ट ठेवा म्हणून जाहीरनामा काढला तो सुद्धां या नोकरांनीं धाब्यावर बसविला! हे नोकर बादशहाची सनदसुद्धां अशक्य म्हणूं लागले. बादशहाची इच्छा 'प्रजा सुखी रहावी, शूर व्हावी, अशी होती. पण या नोकरांनीं पुढें आपल्या Prestige ची इतकी मजल आणली कीं, बादशहांना असा जाहिरनामा काढण्याचाच अधिकार काय? असा एक नोकर म्हणूं लागला. ही त्या नोकराची निमकहरामी होती! (टा.) बादशाही होती पण येथें ही नोकरशाही माजली! बादशहा आम्हांला पाहिजेत पण ही नोकरशाही नको. आमच्या इमारतीवर हें गवत वाढलें आहे तें काढून टाकायचें आहे. बादशहा काढायचें नाहींत. मधल्या

नोकरांची पुंडाई

बंद करणें याचें नांव स्वराज्य! [टाळ्या] नोकरशाही काढून

लोकशाही केल्यानें

बादशहांचें नुकसान नाहीं. उलट, त्यांत साम्राज्याचेंच हित आहे. [टाळ्या] मालकानें घराची मालकी मागितली तर त्यांत भाडेकऱ्यांचें नुकसान आहे ही गोष्ट खरी, पण त्याला आमचा काय इलाज? जेथें फुलें वेंचलीं तेथें गोवऱ्या वेंचण्याचा प्रसंग आला तर कोणाला वाईट वाटणार नाहीं? हें अगदीं स्वाभाविक आहे. (हंशा) पण मालकानें आपला हक्क मागणें यांत परमेश्वराचाहि गुन्हा नाहीं, आणि राजाचा तर नाहींच नाहीं! नोकर चडफडले तर चडफडोत, आमचा हक्क आम्ही मागणार व मिळविणार!! मग त्यांत कोणाला वाईट वाटो वा बरें

वाटो!!! (टाळ्या) या नोकरांनीं आह्मांला इतकें सतावलें कीं, (चिडून) आमच्या घरावरची मालकी राहोच पण आमच्या पोरांवर सुद्धां आमची सत्ता राहिलेली नाहीं. (धिःक्कार) तुह्मी तुमच्या देशांत

## बैलासारखे राहतां !

चारा घालायचा यांनीं पाणी पाजायचें यांनीं, तुम्हीं या देशाच्या गोठ्यांत तेहसीस कोटी गुरें झालां आहां, ३१ कोटी मुंग्यासुद्धां अशा रहावयाच्या नाहींत. तुमची ही बैलासारखी अवस्था पाहून इतर राष्ट्रें माना खालीं घालतात ! आगगाड्या झाल्या, पण साहेबाशेजारीं बसायला परवानगी नाहीं. (सात्त्विक त्वेषानें) आमची इतकी दुर्बल स्थिति झाली आहे कीं मन जळूं लागतें—खाऊं लागतें आणि संताप येतो. (टाळ्यांचा धडका) याचा दोष परमेश्वराकडे द्यायचा कीं

## तुमच्या मूर्खपणाकडे

याचा विचार करा. एका नोकराविरुद्ध तक्रार केली तर ती वरिष्ठ नोकराकडे जाते. मग वरिष्ठ नोकरानें खालच्या नोकराकडे प्रकरण रिपोर्टाकरितां पाठवावें. तुझ्याविरुद्ध तक्रार आणि तुझाच रिपोर्ट पाठव, काय कपाळ ? बरें चौकशी झाली, कीं निकाल करावयाचा कीं 'झालें तें बरोबर झालें, नाहींतर खालच्या कामांत हात घालूं इच्छित नाहीं.' ही काय राज्यव्यवस्था कीं सोंग ? बादशहांची इच्छा कीं प्रजेच्या संमतीनें कारभार चालावा. पण यांनीं सांगावें कीं हे बंड करतील; राज्य जाईल ! आमच्या ओरडीकडे बादशहांनीं शंभर वर्षें लक्ष दिलें नाहीं. आतां आम्ही ही ओरड पार्लमेंटसभा व बादशहा यांकडे करणार आहों. कोणी विचारील कीं आतां तरी हीच रड गाणार ना ? होय. पण आतां काळ बदलला आहे. आतां यजमानालाच ठेंच लागून तो शहाणा झाला आहे.

आमची बादशहांना मदत करण्याची इच्छा आहे. पण या नोकरांनीं आम्हांला पांगळे करून टाकलें आहे. ज्या बादशहाजवळ ३० कोटी प्रजा त्याला अमेरिकेकडे सैन्यासाठीं तोंड वेंगाडावें लागलें ! ही

## बादशहाची मानहानि

कोणी केली ? काय आम्ही केली ? आमची इच्छा आहे पण आतां आम्ही काय करणार ? आतां ही बादशहांची मानहानि करणारे हे नोकर राजद्रोही कीं आम्ही ? ( टाळ्या ) ही वेळ आहे. बादशहांची आम्हाला स्वराज्य देण्याची इच्छा आहे. विलायतेंतील लोक अनुकूल आहेत, तोंच उद्योग कराल तर यश येईल. शिष्टाईचें काम अवघड आहे. एका माणसानें जाऊन यश येणार नाहीं. त्याला सर्व लोकांचें पाठबळ पाहिजे, तरच त्याच्या शिष्टाईला जोर येईल. हें पाठबळ तुम्ही देणार कीं नाहीं हें विचारण्यासाठीं मी येथें आलों आहें. पैसा काय एकादी रांड सुद्धां देईल. मला तुमचा

## निश्चय पाहिजे आहे.

स्वराज्य मला पाहिजे, तें मी मिळविणार, स्वराज्य मिळालें नाहीं तर मी संतुष्ट राहणार नाहीं, स्वराज्यासाठीं मी सर्वस्व अर्पण करण्याला तयार आहें मग माझा प्राण जावो वा राहो ' असें छातीवर हात ठेऊन म्हणावयास तुम्हीं तयार आहां कीं नाहीं ? ( होय, होय ) असा निश्चय असेल व उद्योग कराल तर परमेश्वर खात्रीनें यश देईल ''

( जयजयकार ! )

व्याख्यानानंतर रा. अत्रे यांनीं ५११६ रु. लोकमान्यांस अर्पण केले. नंतर रा. नारायणराव वैद्य यांच्या आव्हानावरून ३ बायांनीं हातांतील सोन्याच्या आंगठ्या व पुरुषांनीं रुपये, चवल्या, पावल्या अर्पण केल्यावर रा. गोविंदराव पांडे यांनीं स्वराज्यसंघशाखेचा रिपोर्ट सादर केला व पोवाडा म्हणण्यांत आल्यावर सभा आटोपली. लोकमान्यांस सायंकाळीं तरुण मुलांतर्फे रा. ब. खरे यांच्या अध्यक्षतेखालीं पानसुपारीचा समारंभ झाला, हा वर्ध्यांचा सुविशेष होय. लोकमान्यांचा कॅंप शेट नथुसिंगच्या हवाशीर बंगल्यावर थाटला होता.

## प्रकरण १० वें

# आधिभौतिक कीं आध्यात्मिक ?

( शिंदी )

वर्धा येथेंच लोकमान्यांच्यां बरोबर असलेल्या मंडळीची बरीच फाटाफूट झाली. श्री. खाडिलकर हे मुंबईस निघून गेले. श्री. दा. वि. गोखले यांस कांहीं महत्त्वाच्या कामानिमित्त कलकत्त्यास रवाना करण्यांत आलें. श्री. वामनराव जोशी हे श्री. गंगाधरराव देशपांड्यांना बरोबर घेऊन उमरावतीस गेले. अशा रीतीनें फाटाफूट झाल्यावर लो. टिळक हे नागपूरकर मंडळीसमवेत वर्ध्याहून रात्रीं २॥ वाजतां निघाले व पहांटे ( ता. १९ ) शिंदीस पोंचले. गाडी गांठण्याच्या धांदलीमुळें लोकमान्यांस रात्रभर स्वस्थ झोंप आली नाहीं व शिंदीचें आगतस्वागत होऊन मिरवणूक श्री. बाबासाहेब देशपांडे यांच्या घरीं पोंचेपर्यंत जवळ जवळ उजाडलेंच—नंतर झोंप येणें शक्य नव्हतें, कारण सकाळचा व्याख्यानादि कार्यक्रम आटोपून लोकमान्यांस दोनप्रहरला नागपुरास जावयाचें होतें. बाबासाहेबांच्या घरीं सकाळची चहाकॉफी झाल्यावर बाजार पेठेंतील उंचवट्यावर लोकमान्यांचें ८ वाजतां व्याख्यान झालें. व्याख्यानास दोनअडीच हजार लोक हजर होते. प्रथम श्री. बाबासाहेब देशपांडे यांच्या सूचनेवरून श्री. दाजीसाहेब देशपांडे यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारल्यावर श्री. अंबादासपंत देशपांडे यांनीं ' हे प्रभोवरदवर ' हें तिलकस्तुतिपर पद्य सुस्वर म्हटलें. नंतर वे. शा. सं. वासुदेवशास्त्री काळे यांनीं संस्कृतमध्यें स्वागत केल्यावर श्री. यादव गणेश सुभेदार यांनीं लोकमान्यांस अर्पण करण्यांत यावयाचें मानपत्र वाचून दाखविलें.

मानपत्र

# भारत-नररत्न टिळक महाराज !

प्रस्तुत कालीं सर्व जग भौतिक शास्त्रांच्या प्रचंड मायावी शक्तीनें मोहवश झाल्यामुळें सृष्टिनियमांकडे दुर्लक्ष होऊन बलिष्ठ राष्ट्रांचें सर्व सामर्थ्य दुर्बळ राष्ट्रांना ग्रासून टाकण्याच्या अहमहमिकेंत खर्च होत आहे. असल्या अवाढव्य शक्तीच्या दुरुपयोगाचा परिणाम शेवटीं प्रबळ आणि निर्बळ यांच्या अतएव सर्व जगाच्या उन्नतिनाशांत होत असल्यामुळें आपण केवळ जगावर उपकार करण्याकरितां आपल्या आत्मीय शक्तीनें ह्या सर्व एकवटलेल्या प्रचंड भौतिकशक्तीस टक्कर देऊन भौतिकसामर्थ्यापेक्षां आध्यात्मिकसामर्थ्य श्रेष्ठ आहे, असें जगाच्या निदर्शनास आणून दिलें आहे. त्याप्रमाणें आध्यात्मिकशक्तीचें प्राधान्य कायम ठेवून लोकसंग्रहाकरितां भौतिक शक्तीची उपयुक्तताहि आपण दर्शविली आहे. तात्पर्य, गीतेंतील ज्ञानकर्मसमुच्चय आणि आध्यात्मिक व भौतिक समुच्चय तत्वार्थानें भिन्न नाहीं, हें आपल्या आचरणानें आपण सिद्ध केलें आहे.

ज्यावेळीं जग अज्ञानांधःकारांत विलीन होत असून लोक कर्तव्यपराङ्मुख होत असतात त्या वेळीं प्रभु आपणा सारखे महापुरुष निर्माण करून त्यांचे द्वारें धर्मजागृति करतो. कौरवपांडवांच्या युद्धकालीं भगवान् श्रीकृष्णानें ज्याप्रमाणें कर्तव्याकर्तव्याच्या मोहजालांत गुरफटलेल्या अर्जुनास गीता सांगून कर्तव्यतत्पर केलें त्याप्रमाणें कर्तव्यविमूढतेच्या रोगानें ग्रस्त झालेल्या आम्हां भारतवासीयांना गीतार्थामृत पाजून आपण संजीवित केलें.

लोकमान्य महाराज, आपणांस ह्या सिंदीसारख्या गांवांत आणि आमच्या सारख्या खेडवळ लोकांच्या सहवासांत भाजीभाकरीचा स्वाद घेतांना आम्हीं पाहिलें म्हणजे गोपांच्या सहवासांत क्रीडा करणाऱ्या श्रीकृष्णाचें आणि गोकुळाचें स्मरण होतें. परंतु दुसऱ्या क्षणीं असेंच वाटतें कीं, भगवान् श्रीकृष्णाचे उद्दिष्ट कार्याशीं गोपाळ ज्या प्रमाणें तन्मय झाले होते त्याच्या हजारांशानें सुद्धां आम्हीं आपली सेवा करण्यास असमर्थ आहों.

महाराज, आम्हीं आपणांस मानपत्र देण्याच्या योग्यतेचे नाहीं. आपण सम्यक्‌ज्ञानी असल्यामुळें आज आमच्या ह्या वेड्यावांकड्या मानपत्राचा प्रेमानें स्वीकार करीत आहां हा आमच्यावर मोठा अनुग्रह आहे.

आपले चरणांकित.

**सिंदी, हिंगणी, सेलू, घोटीवाडा, वेळ,**
**आष्ट, अडेगांव कान्होली, येथील रहिवाशी.**

मानपत्रसमर्पणानंतर लो० टिळक टाळ्यांच्या गजरांत म्हणाले:—
" आजच्या या प्रसंगीं तुमची आणि माझी स्थिति कल्याण स्टेशन-वरच्या खाणावळीसारखी झाली आहे. तुम्ही माझ्या भाषणाचें भोजन करावयास आलां आहां व आतां तर फारसा वेळ नाहीं. तेव्हां मी जे दोन शब्द सांगेन तेवढ्यावरच घाईघाईनें आपण आपल्या क्षुधेची शांति करून घ्यावी अशी माझी आपणांस विनंति आहे. मानपत्रांत असा उल्लेख आहे कीं, जगांत जो आधिभौतिक व आध्यात्मिक शक्तींचा प्रचंड झगडा चालू आहे त्यांत आध्यात्मिक शक्तींचाच अखेर जय होणार. आपण सद्यः-स्थितीमध्यें ज्या लोकांच्या तडाख्यांत सांपडलों आहों त्यांच्या व आमच्या ध्येयांत फरक आहे. इंग्रज लोक हे आधिभौतिक शक्तींचा आश्रय कर-णारे असून आमची आध्यात्मिक दृष्टि त्यांना नाहीं. ज्या नोकरांना बाद-शहांनीं आमच्यावर राज्य करण्याकरितां नेमलें ते लोक असें ओरडतात कीं ' जर्मनी हा रानटी आहे. ' कारण जर्मनीचें भौतिककौशल्य व भौतिकप्रगति हीं इंग्लंडपेक्षां जास्ती आहे. शिवाय जर्मनी हा दुसऱ्या लोकांचें स्वातंत्र्य हिसकावून घेण्याकरितां लढत असून इंग्लंड हें दुसऱ्या लोकांना स्वातंत्र्य मिळवून देण्याकरितां लढत आहे. लोकांना स्वातंत्र्य मिळवून देण्याची इंग्लंडची आजची दृष्टि ही आध्यात्मिक होय. आमची स्वराज्याची चळवळ हीहि आध्यात्मिकच आहे. ज्याच्या हातांत भौतिक-शास्त्र, ज्याच्या हातांत भौतिकशक्ति त्यानें दुसऱ्यास वाटेल तसें चिरडावें हें भौतिकतत्त्व आपल्याकडे बरेच दिवस लागू करण्यांत आलेलें आहे. पण आज महायुद्धानें इंग्लंडचे डोळे उघडून त्याचीहि दृष्टि आध्यात्मिक केली आहे. यापुढें कोणाचीहि दांडगाई जगावर चालणें शक्य नाहीं.

प्रत्येक राष्ट्राला स्वतःचा कारभार पाहण्याचा हक्क आहे हें तत्त्व आतां बादशहा, प्रधानमंत्री, फ्रान्स, अमेरिका सर्वांनीं कबूल केलें आहे. याच आध्यात्मिक तत्त्वाचा विजय होण्याकरितां दोस्तराष्ट्रांनीं हें युद्ध चालविलें आहे. एका राष्ट्राचे १ कोट लोक असले तर त्यांवर ज्याचे लोक १० कोट आहेत त्या राष्ट्रानें जुलूम करणें रास्त नाहीं. असें जर आहे तर ज्या राष्ट्राचे लोक २|४ कोटी त्यांनीं तरी ३० कोटी लोकांवर कां जुलूम चालवावा ? हाहि प्रश्न वरील तत्त्वांतच अंतर्भूत होतो. हेंच तत्त्व आज युरोपांत प्राधान्येंकरून पुढें आलें आहे. पण गेलीं शंभर वर्षें या नोकरशाहीनें हिंदी लोकांच्या हक्कांची पायमल्ली करण्याच्याच हेतूनें राज्य चालविलें आहे. बादशहांनीं सांगितलें कीं ' प्रजेला संतुष्ट ठेवा ' पण लॉर्ड कर्झन सारख्या नोकरांनीं बादशहांचा हुकूम अशक्य ठरविला ! आतां बादशहांना ज्याअर्थी ' ज्याचा कारभार त्यानें पहावा ' हें तत्त्व मान्य झालें आहे त्याअर्थी त्यांनीं ही राज्यपद्धति बदललीच पाहिजे. ( टाळ्या. ) जर्मन लोक इतर राष्ट्रांच्या हक्कांना तुडवितात म्हणून त्यांना जर रानटी म्हणतां तर तुम्हीसुद्धां आपल्या पायांखालीं काय जळतें आहे तें पहा असें इंग्लंडला विचारलें पाहिजे. आज इंग्लंडला वैराग्य उत्पन्न झालें आहे. कोणाचा आप्त मेला, पैसा गेला म्हणजे त्याला वैराग्य प्राप्त होतें तसें वैराग्य या महायुद्धानें इंग्लंडला प्राप्त झालें आहे, तोंच त्याला हा प्रश्न विचारला पाहिजे. आज येथें काय स्थिति आहे ? केवढाहि इजारदार असो, त्याला ८ रुपयांचा पोलिसशिपाई धमकावतो. आतां आम्ही अगदीं चोहोंकडून गांजले गेलों आहों. कायदा कसा पाहिजे तें सारें आम्हांला कळतें. फक्त आमच्या हातीं सत्ता द्या म्हणजे झालें ! आम्हांलाहि थोडें शहाणपण आहे—कांहीं सगळा शहाणपणाचा मक्ता परमेश्वरानें या नोकरांनांच दिलेला नाहीं ! ! हे नोकर स्वयंशहाणे खरे, पण यांचा सारा ओढा विलायतेकडे. स्वार्थ आला म्हणजे पंडितालासुद्धां मोह पडतो असें महाभारतांत म्हटलें आहे. यांच्या विद्वत्तेचा उपयोग काय तर आपल्या स्वार्थाचें कसें समर्थन करतां येईल ? उदाहरणार्थ, या नोकरांनीं हत्यारांचा कायदा केला तेव्हां त्यांनीं आपली

सर्व विद्वत्ता खर्च करून कारण शोधून काढलें कीं ‘ हत्यारें असलीं तर लोक आपापसांत मारामाऱ्या करतील ! ’ मात्र हें खरें कारण नव्हे, हें विद्वत्तेनें शोधून काढलेलें दिखाऊ कारण आहे. जेथें हत्यारें वापरण्याची परवानगी आहे त्या इंग्लंड—अमेरिका देशांत काय रोज खून—मारामाऱ्या होतात ? या नोकरांची ही दृष्टि म्हणजे आधिभौतिक होय—आध्यात्मिक नव्हे. ‘ मी कल्याण करतों ’ अशी भुरळ दाखवून तीस कोट लोक कद-रेंत ठेवावयाचें ही त्यांची राजनीति ! पण ‘ जसें करावें तसें भरावें ’ हा आमच्या शास्त्राचा सिद्धान्त आहे. लोकांच्या हातीं जर मोडकें तोडकें-सुद्धां हत्यार ठेविलेंत नाहीं तर आतां एकदम लोक लढाईला कसे मिळ-णार ? आमचा उद्देश तुम्हांला मदत करण्याचाच आहे, पण तुम्हीच आमचे हात—पाय मोडलेत ना ? आतां लोकांवर विश्वास दाखवा, त्यांचे हक्क त्यांना द्या म्हणजे लोक पुढें येतील व साम्राज्याचें रक्षण होईल. ही वेळ परमेश्वरानें उत्पन्न केली आहे ती फुकट घालवूं नका. यावेळीं नेट धरा म्हणजे परमेश्वरहि तुम्हांस यश दिल्याशिवाय राहणार नाहीं. ” ( टाळ्या. ) शेवटीं श्री. भक्त यांनीं लोकमान्यांस २७५० रुपयांची थैली अर्पण केली. शेवटीं अध्यक्ष म्हणाले:—“ लोकमान्यांनीं दिलेलें उपदेशामृत जरी पोटभर झालेलें नाहीं तरी त्यांनीं वेळांत वेळ काढून येथें येण्याची तसदी घेतली याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहों. ” ( जयघोष. )

व्याख्यान आटोपतांच लोकमान्य नागपूरची गाडी पकडण्यास स्टेशन-कडे गेले, व गाडी ९॥ वाजतां चालू झाली.

## प्रकरण ११ वें.

# शहाणपणाची वांटणी !

( उमरेड )

लोकमान्य शिंदीहून निघाले ते वाटेंत बोरखेडीचा सत्कार स्वीकारून नागपुरास दुपारीं १०॥ वाजतां पोचले. नागपुरची सर्व पुढारी मंडळी स्टेशनवर हजर होतीच. लोकमान्यांनीं या ठिकाणीं दिल्लीस जाण्याच्या परवानगीची तार दिल्लीहून मागविली होती. परवानगी मागण्याचें कारण असें कीं, ता. २३ फेब्रुवारी रोजीं दिल्ली येथें विलायतेला कॉंग्रेसचें डेप्युटेशन पाठविण्यासंबंधींच्या प्रश्नाचा खल करण्याकरितां ऑल इंडिया कॉंग्रेस कमेटीची बैठक व्हावयाची होती व तिला लोकमान्यांस हजर राहणें अवश्य होतें. पण दिल्लीशहरामध्यें पाऊल ठेवण्यास दिल्लीच्या कमिशनरनें लोकमान्यांस मागेंच बंदी करून ठेवलेली होती. ही बंदी मॅांटेग्युसाहेबांनीं ज्यावेळीं दिसेंबरांत कॉंग्रेस व होमरूललीगच्या प्रतिनिधींच्या मुलाखती घेतल्या त्यावेळीं तात्पुरती एका अटीवर काढून घेण्यांत आली होती. ती अट अशी कीं, ‘ टिळकांनीं दिल्ली येथें कोणत्याहि जाहीर सभेस हजर राहून भाषण करूं नये. ’ कदाचित् याच अटीवर पुन्हां याहि वेळीं कॉंग्रेस कमेटीच्या खासगी कामाकरितां परवानगी मिळेल अशी लोकमान्यांस आशा वाटल्यामुळें त्यांनीं आगाऊच तशी तार कमिशनरला केली होती व त्या तारेच्या उत्तराची मार्गप्रतीक्षा ते नागपुरास करणार होते. पण लो. टिळक नागपुरला पोंचण्याच्या अगोदरच तारेचें उत्तर ‘ नकारार्थी ’ येऊन पडलें होतें. लागलीच लोकमान्यांनीं व्हॉइसरायसाहेब व होममेंबर यांजकडे तारेनें परवानगीचे अपील अर्ज केले व ताबडतोब उत्तर मागविलें. आतां यापुढें उत्तर येऊन लोकमान्य सभेच्या वेळेवर दिल्लीला पोंचावयाचे ह्मणजे अवधि कायतो फार तर एक दिवसाचाच होता.

या अवधीमध्यें लोकमान्यांनीं उमरेड व काटोल येथील कार्यक्रम आटोपण्याचें ठरविलें. जर कां आजच परवानगी येऊन दाखल झाली असती तर उमरेड–काटोलकडील कार्यक्रम अजीबात गाळावे लागणार होते. अशा धांदलीनें उमरेडकाटोलकरांची कोण निराशा झाली असती याचें चित्र काढणें फार कठीण आहे. असो. स्टेशनच्या वेटिंगरूममध्येंच फराळ वगैरे आटोपून लगेच १२ वाजतां लोकमान्यांची स्वारी मोटारींतून उमरेडकडे जावयास निघाली. बरोबर श्री. नारायणराव वैद्य, डॉ. मुंजे, श्री. दादासाहेब उधोजी व बॅ. अभ्यंकर ही मंडळी होती. उमरेड येथें लोकमान्य २ वाजल्यावर पोंचले. लोकमान्यांचा कँप श्री. दाणी यांच्या वाड्यामध्यें थाटला होता. नंतर मंडळींचीं जेवणखाणें झाल्यावर सायंकाळीं ४ वाजतां बाजारपेठेंतील विस्तीर्ण पटांगणांत व्याख्यान समारंभ झाला. व्याख्यानास १५।२० हजार लोकसमुद्र लोटला असून उच्चासन, राधाकृष्णाचे मनोहर पडदे व ध्वजपताकाझालरींनीं उत्तम प्रकारें शृंगारलें होतें. व्याख्यानस्थलीं इतकी विलक्षण गर्दी खेंचली होती कीं, शांतता करतां करतांच व्यवस्थापकांच्या नाकीं नऊ आले. प्रथमारंभीं श्री. बापुसाहेब ढेरे यांच्या सूचनेवरून व श्री. केळकर यांच्या अनुमोदनानें वयोवृद्ध स्थानिक पुढारी श्री. बापुसाहेब नाईक यांनीं टाळ्यांच्या गजरांत अध्यक्षस्थान स्वीकारलें. रा. केळकर यांनीं मानपत्र वाचून दाखविलें व सुंदर फ्रेममध्यें घालून तें लोकमान्यांस अर्पण करण्यांत आलें.

### मानपत्र.

## महात्मा बाळ गंगाधर टिळक

यांना उमरेड तहशिलींतील रहिवाशांनीं अर्पण केलेलें.

## लोकमान्यः—

ज्यांनीं डोंगरीच्या कारागृहांत नंदनवन वसविलें, येरोडा व साबरमती येथील तुरुंगांचा स्वर्ग बनवला, मंडालेच्या किल्ल्यांत पवित्र तीर्थस्थान

निर्माण केलें त्या आपल्या पावन चरणांचें आह्मी उमरेड तहशिलींतील रहिवासी आमच्या उमरेड गांवीं स्वागत करतों. ह्या वयांतहि आमच्या-साठीं आपण जो हा कष्टकर प्रवास करतां त्याबद्दल आम्ही आपले फार उतराई आहों. देवांनीं स्तविलेली आणि नरमणींनीं सेविलेली ही हिंद-भूमी आह्मीच आमच्या मनांनीं व शरीरांनीं निर्माण केलेलें एक विस्तृत कारागृह बनली असतां आपल्या ह्या चरणाशिवाय तिला आपलें पूर्वीचें पवित्र तीर्थस्थलाचें स्वरूप द्यावयाला दुसरें कोण समर्थ आहे? परा-धीनतेच्या चिखलांत कुजून मेलेलीं अंतःकरणें जिवंत करून फुलवावयाचें सामर्थ्य आपल्या अमृतमय वाणीशिवाय दुसऱ्या कशांत आहे? असंख्य संतति असूनही भारती केवळ आपल्यामुळेंच पुत्रवती आहे. विशालबुद्धि व्यासांची विद्वत्ता, कविश्रेष्ठ शुक्राचार्यांची बुद्धिमत्ता, बृहस्पतीची वाणी, बाणाची लेखणी, श्रीजनकाचा कर्मयोग, प्रतापसिंहाचा स्वाभिमान, तानाजी संताजींची देशभक्ति व श्रीशिवाजीमहाराजांची स्वातंत्र्यप्रीति आपल्या ठिकाणीं एकत्रित होऊन मातृभूमीच्या सेवेला लागत आहे. आत्मया-गाचा मार्ग दाखवून आणि स्वराज्याचा महामंत्र देऊन आमच्या मातृभूमीचें स्वातंत्र्य आपण आमच्या आशेच्या आटोक्यांत आणलें आहे. राजकीय, आर्थिक आणि मानासिक अशा त्रिविध पारतंत्र्यानें गतवैभव झालेलें आ-मचें राजकारण, आमच्या कला आणि आमचें शरीरबल स्फूर्ति मिळून पुन्हां ऐश्वर्यसंपन्न होण्याकरतां आशेनें आपल्याच मूर्तीकडे पहात आहे. अशा वेळीं, हल्लींच्या हीन स्थितींतही रेशीमकांठी कापडाच्या कलाकौश-ल्याच्या बाबतींत आपलें अग्रस्थान कायम ठेण्यासाठीं धडपडत असलेलें आमचें हें उमरेड शहर आपल्या चरणस्पर्शामुळें कोणच्या भावनांनीं भरलें असेल हें आह्मांला व्यक्त करून दाखवितां येत नाहीं! पदोपदीं आत्मयज्ञ मागणारा स्वराज्याचा दुर्गम मार्ग आपल्या स्फूर्तिदायक पुढारीपणाखालीं आमच्याकडून चोखाळवून घ्यावा आणि आपला योग्य सन्मान करण्याच्या भाग्याचा क्षण स्वतंत्र भारताच्या नशीबीं लिहावा अशी त्या दयामयाच्या सर्वशरण्य चरणांजवळ आमची प्रार्थना आहे.

उमरेड, ता. १९।२।१९१८ उमरेड तहशिलींतील रहिवासी.

लोकमान्य म्हणाले:--

"अध्यक्ष महाराज, उमरेड तालुक्यांतील सद्‌गृहस्थ, आणि कुलीन स्त्रियांनों, आपण जो माझा हा सत्कार केलात त्याबद्दल मला प्रथम आपले आभार मानले पाहिजेत. अथवा आभार मानण्याचा हा एक शिष्टाचार होऊन बसला आहे. पण एकमेकांनीं एकमेकांना बोलवावें व नंतर एकमेकांनीं एककांभोंवतीं दिवे ओंवाळावे तशांतला मात्र आजचा प्रसंग नाहीं. हें कार्य जितकें माझें आहे तितकेंच तें आपलेंहि आहे. समजा लग्न लागल्यावर नवऱ्यानें नवरीचे व नवरीनें नवऱ्याचे आभार मानले तर तें योग्य होईल का? तें जसें दोघांचें कार्य तसेंच हेंहि स्वराज्याचें कार्य सर्वांचेंच आहे. (टाळ्या.) हा सर्व समाज काय माझ्या करितां आला? मी काय केलें? हा तुमचा व माझा स्वराज्यासाठीं संयोग झाला आहे म्हणून कोणी कोणाचे आभार मानण्याचें कारण नाहीं. स्वराज्य म्हणजे काय? हें आतां खेडेगांवांतील लोकांनासुद्धां माहीत झालें आहे. स्वराज्य म्हणजे आपल्या घरची व्यवस्था आपण पाहणें. घरची व्यवस्था कोण पाहतो? घरांतील पुरुष. अन्न, वस्त्र, लहान मुलांचें पालन-पोषण सर्व कांहीं तो पुरुष करीत असतो. घरीं त्याचा तो मालक असतो. तुरुंगांतले लोक मात्र घरचे मालक नसतात. तसाच गुरांचा गोठा. पण मनुष्य वयांत आला म्हणजे मात्र त्याला स्वतःच्या घरचा कारभार पाहण्याचा हक्कच पोंचतो. ज्याचें दुकान, त्याला त्याची व्यवस्था पाहण्याचा हक्कच आहे. कुंळब्यालासुद्धां या गोष्टी कळतात. पूर्वी तुमच्या गांवचा कारभार कोण पहात असे? गांवांतले पंच. ते पंच चावडीवर जमत आणि खटले तोडीत; गांवांत चोरी झाली तर ती रामोशानें सांपडून द्यावयाची, न दिली तर त्याला पंच जमून दंड करीत. गांवची चावडी काय असेल ती सरकारांत भरली कीं, सरकारचें काम झालें! बाकी सारी व्यवस्था पंच पहात असत. अशी व्यवस्था करण्याला शिक्ल्याशिवाय तरी ती करायला कसें येणार? व्यवस्था हातांत आली तरच अक्कल वाढत असते. मुलाला जर एकसारखा जाचांत वाढविला तर तो पुढें कर्ता होईल का? मुलाच्या अंगावर काम टाकूनच त्याला कर्ता

केला पाहिजे. शेटजीसुद्धां मुलाला दुकानांत घालतात व व्यवहार शिकवितात. हा जो दुकानचा न्याय तोच राज्याला लागू आहे. तुमच्या घराची जरा व्याप्ति वाढवा व सर्व देश हें माझें घर असें ह्मणा म्हणजे स्वराज्य तें काय हें तुम्हांला कळेल. आज तुमच्या देशाचा कारभार तुम्ही पाहतां का? नाहीं. मग तो आपल्या हातीं पाहिजे अशी जी मागणी तिचें नांव स्वराज्य! (टाळ्या.) लोकांच्या हातीं राज्यकारभार पाहिजे म्हणजे काय? लोक जे आपले प्रतिनिधि निवडून देतील त्यांच्या बहुमतानें कायदे झाले व अंमल बजावणी होऊं लागली म्हणजे स्वराज्य झालें! या स्वराज्याच्या मागणींत कांहीं राजद्रोह आहे अशी आपली किंचित्सुद्धां कल्पना असेल तर ती प्रथम काढून टाका. बादशहांचें राज्य काय या कलेक्टर कमिशनरांचीं पोटें भरण्याकरितां चाललें आहे? बादशहांची कांहीं तशी इच्छा नाहीं. पण मधल्यामध्येंच ही बंडाळी माजली आहे. बादशहांनीं या नोकरांना सांगितलें कीं, 'राज्य चांगल्यारीतीनें चालवा.' पण बादशहा तिकडे लांब ६००० कोसांवर असलेले पाहून हेच स्वतः कारभार बळकावून बसले. हे स्वतःला नोकर ह्मणवतात, आमच्या करांतूनच पगार घेतात, पण वागतात मात्र मालकांसारखे! (टाळ्या.) येथें पूर्वीं उत्तम रेशीमकांठी धोतरजोडे तयार होत. मग आतां तो व्यापार कां बसत चालला? हल्लीं गिरणींतून धोतरजोडे येतात. मग तें तुह्मांलाच कां नाहीं शिकविलें? यांना जें बादशहांनीं काम सांगितलें तें कांहीं यांनीं केलें नाहीं. काय आमच्या सगळ्या कोष्ट्यांचे निर्वंश झाले? सर्व कारागीर आज शेतीवर आले आहेत. धंदे बुडाले, व्यापार बसला, आणि सत्ताहि गेली. लोकांना गांवांत दारूचें दुकान नको असलें तरी तें अबकारी खातें आणून घालतें. झाडाचें पान तोडावयाचें असलें तरी तीसुद्धां सत्ता तुमच्या हातीं राहिली नाहीं. आमचे गांवांतले मोठे लोक पाटील, देशमुख, देशपांडे सारे घरीं बसले. या राज्यांत कर्तबगारीचें चीज म्हणून राहिलें नाहीं. ज्यांच्या चारचार पांचपांच पिढ्या शूर म्हणून गाजल्या, त्यांचे वंशजांना आज बंदुक बाळगायची असली तर परवान्यासाठीं कलेक्टरकडे खेटे घालावे लागतात! (हंशा.) आजपर्यंत तक्रारी पुष्कळ

केल्या पण आमची ओरड ऐकतो कोण ? आजपर्यंत खिडक्यांवर ठोका-ठोकी पुष्कळ झाली पण आज लक्षांत आलें कीं, मुख्य दरवाजावर धक्का दिल्याशिवाय कांहीं उपयोग नाहीं. आतां किरकोळ मागण्या नकोत, सर्व अधिकारच आमच्या हातीं द्या याचें नांव स्वराज्य! बादशहा आहेत ते तसेच राहणार, फक्त या नोकरांच्या हातीं सत्ता आहे ती लोकांच्या हातीं येणार, मग यांत बादशहांचें काय नुकसान आहे ? आमच्या हातीं कायदे करण्याची सत्ता आली आणि मग जरी हेच नोकर राहिले तरी आमची हरकत नाहीं. स्वराज्य मिळालें तरी आह्मांला कांहीं नोकर हे लागतीलच ! (हंशा व टाळ्या.) बादशहा व पार्लमेंट वर राहूं द्या, पण या नोकरांची शेंडी आमच्या हातीं आली पाहिजे. स्वराज्य—स्वराज्य जें काय तें एवढेंच. यावेळीं उद्योग कराल तर स्वराज्य खचित मिळेल. आतां मॉंटेग्युसाहेब विलायतेला गेले म्हणजे आमचा दावा बादशहांपुढें निघणार आहे. त्यावेळीं आमचे पुढारी दावा चालविण्यास तेथें हजर पाहिजेत, त्यांना मदत म्हणजे कांहीं नुस्ता पैसा नव्हे. पैसा काय, वाटेल तितका मिळेल, मला तुमचा पाठिंबा पाहिजे आहे. तो द्यायचा नसेल तर मग आलांत कशाला ? काय गंमत बघायला ? तसें असेल तर जागा सोडून जा. येथें कांहीं गंमत करायची नाहीं. ज्याच्या अंतःकरणाला तळमळ लागली असेल तो माणूस मला पाहिजे. (टाळ्या.) येथें आज हजारों लोक जमले आहेत, ते सर्व स्वराज्यसंघाचे सभासद कां झालेले नाहींत ? एक गोष्ट आहे. एक माणूस वेडा होता. वेडा कां होता ? तर ब्रह्मदेवानें ज्यावेळीं शहाणपणाची वांटणी केली तेव्हां तो गैरहजर राहिला ! (हंशा.) आज सर्व जगभर स्वातंत्र्याची वांटणी होत आहे, अशावेळीं जर तुम्ही गैरहजर राहिलां तर बुडाल हें ध्यानांत ठेवा. अधिकाऱ्यांना न भितां, रावसाहेबी—रावबहादुरकीला भीक न घालतां, ‘ मला स्वराज्य पाहिजे ’ असें छातिठोकपणें ह्मणा. असा निश्चय दाखवाल तरच तुमचे वकील जे विलायतला जाणार आहेत त्यांना एक-प्रकारची वीरश्री चढेल!" (टाळ्यांचा धडाका.) शेवटीं रा. खेर वकील यांनीं उमरेडतर्फें १५०० रु. व जीवापुरतर्फें २१७ रु. अर्पण

केल्यावर समारंभ आटोपला. लगेच ५॥ वाजतां लोकमान्य निघाले ते २९ मैलांचा पल्ला झपाट्यानें तोडून ७ वाजतां नागपुरास येऊन पोंचले.

---

## ( प्रकरण १२ वें. )

# स्वराज्यवादाचें सारसर्वस्व.

—:*:—

## ( नागपूर. )

उमरेडाहून लोकमान्य मोटारींतून निघाले ते नागपुरास ( ता. १९ ) सायंकाळीं ७ वाजतां येऊन पोंचले. नागपूर शहरांत प्लेगचा कडाका उडाल्याकारणानें सर्व लोकवस्ति गांवाबाहेर होती. व्याख्यानसमारंभाची व्यवस्था श्री. माधवराव पाध्ये यांच्या देशसेवक प्रेसच्या कंपौंडांत केली होती. सभास्थानीं हजार दीड हजार श्रोतृसमुदाय जमला असून उच्चासनावर नागपूरच्या प्रमुख तिलकभक्तांशिवाय ना. अप्पासाहेब जोशी यांचीहि स्वारी दिसत होती. प्रारंभीं रा. भवानीशंकर नियोगी यांच्या सूचनेवरून व रा.· गोपालराव ओगले यांच्या अनुमोदनानें श्री. माधवरावजी पाध्ये यांनीं टाळ्यांच्या गजरांत अध्यक्षस्थान स्वीकारलें. अध्यक्ष म्हणाले:—मला आपण शेंदूर फांसून अध्यक्ष बनविलाच आहे तेव्हां आनंदानें अध्यक्षस्थान स्वीकारण्याशिवाय गत्यंतर राहिलेलें नाहीं. अध्यक्ष हा नेहमीं कल्ला व गोंगाट यांचें निराकरण करण्याकरितां नेमीत असतात. पण तेंहि काम आज नाहीं. आपणच मला म्हणाल कीं ' अध्यक्षमहाराज ! आपलें भाषण पुरे·करा, आम्ही लोकमान्यांच्या उपदेशामृताचें आकंठपान करण्याकरतां आलों आहों. ' ( हंशा. ) '' अध्यक्षांच्या विनोदप्रचुर भाषणानंतर नागपुरचे राष्ट्रीय कवि श्री. कृष्णाजीपंत ताह्मनकर यांनीं तिलकस्वागतार्थ पद्यगायन केलें.

( पद चालः—जोडुनिया कंथा साकळीयां )

महापर्व हें स्वातंत्र्याचें दवडुं नका जनहो वायां ॥
काया माया त्यजुनि झटा हो स्मरुनि गुरूच्या या पायां ॥धृ०॥
तुम्हांकारणें जो देहानें आजवरी अविरत झिजला ॥
सहनशीलता तुमची बघुनी तो तिलक प्रभु मनि थिजला ॥१॥
समय नव्हे हा आलस्याचा यत्न पाहिजे गुरु केला ॥
हितार्थ तुमच्या कळवाया हें तिलक प्रभु येथें आला ॥ २ ॥
स्वराज्य सत्फल करिं यायाची आलीसे ही शुभवेला ॥
चुकाल तरि तुम्हिं मुकाल ध्येया, यश लाभे प्रतिपक्षाला ॥ ३ ॥
बादशहानें लोकहितार्थचि निर्मिलि जी नोकरशाही ॥
कृतघ्न झाली जना न पाही, धन्यास डोईजड होई ॥ ४ ॥
सत्तालोभें प्रजाछलाची नोकरशाहिस बहु गोडी ॥
सत्ता करिंची गेल्या वांचुनि सुखें न जाई ही खोडी॥ ५ ॥
प्रभु तिलकछलें सीडनहॅमें येथ गव्हर्नारें गाजविली ॥
द्वीपांतारिंही तयें स्वराज्यद्रोही संस्था माजविली ॥ ६ ॥
फूत्कारें तो जणूं कालिया भारतियां जाळूं पाहे ॥
मस्तक त्याचें नमवाया हा बाळ तिथें जातो आहे ॥ ७ ॥
दैवगतीनें योग असाहा आला आज असामान्य ॥
यश संपादुनि लोकमान्य हा होइल बाळ जगमान्य ॥ ८ ॥
जल-स्थलाच्या दिव्य देवता रक्षितील मार्गी यातें ॥
माला घालिल कीर्ति कुमारी जनसत्ताकैवाऱ्यातें ॥ ९ ॥
सहाय्य यातें करावयातें चला उठा तय्यार रहा ॥
ध्वज स्वराज्याचा हा तुम्हां बोलावी फडफडुनि पहा॥ १० ॥
बादशहाची नोकरशाही स्वयें हीच झाली द्रोही ॥
साम्राज्याचें नित हित केलें एकनिष्ठ भारतियांहीं ॥ ११ ॥
चोरां सोडुनि संन्याशाला सुळीं काय सूज्ञें द्यावें ॥
सत्पक्षाला करीं धरोनी भलें ह्मणुनि रायें घ्यावें ॥ १२ ॥
द्वीपांतारिं तूं शिष्टाईला आम्हां कारणें जरि जासी ॥

माया वेडी; मन संकोचे निरोप तुजला द्यायासी ॥ १३ ॥
विरह तुझा बलवंता कैसा मुकी प्रजा ही साहील ॥
असह्य छल झालिया कुणाला तुझ्याविणें ती वाहील ॥ १४ ॥
सुकर्णधाराविना राष्ट्रनौ कुठें बुडे, केव्हां नकळे ॥
संकट खडकावरी फुटे कीं, काय आडमार्गास वळे ॥ १५ ॥
देउळ देवाविणें, देह वा प्राणावांचुनि, शून्य जसा ॥
भारत देशहि तसा तुझ्याविण होईल केवळ हा शवसा ॥ १६ ॥
त्वद्घोषित कर्तव्य स्मरुनी म्हणतों यश घेउनि यावें ॥
जनतेच्या आनंदाश्रुजलीं प्रेमभरें देवा न्हावें ॥ १७ ॥

पुष्पहारांचा स्वीकार करून टाळ्यांच्या गजरांत

**लोकमान्य म्हणाले:—**

" अध्यक्षसाहेब व सभ्यगृहस्थहो, मी आतां मोठें लांबलचक भाषण करण्याकरितां उभा राहिलों नाहीं. शिवाय एवढ्या भाषणाची नागपुरास जरूरीहि नाहीं. स्वराज्य म्हणजे काय, आजपर्यंत काय काय झालें, पुढें काय केलें पाहिजे या सर्व गोष्टी आपणांला माहितच आहेत. त्यांचा केवळ उच्चार केला तरी पुरे होईल. स्वराज्य म्हणजे राज्यघटनेंत मोठा फरक घडवून आणणें होय. खरी राजसत्ता बादशहा व पार्लमेंट यांच्या हातीं आहे. हिंदुस्थानचे खरे राजे ते. त्यांना हिंदुस्थानचा कारभार करावयास कोणालाहि सांगतां येईल व तो कोणाच्याहि हातून काढून घेतां येईल. ही सत्ता ज्यांच्या हातांत आहे त्यांना King in parliamen असें म्हणतात. पाहिल्यानें हिंदुस्थानचा कारभार कंपनीच्या हातीं होता. नंतर १८५८ सालीं तो कारभार बादशहांनीं गव्हरनर–जनरल, गव्हर्नर, कमिशनर वगैरेंच्या हातीं दिला. यांना सिव्हिलसर्विस असें नांव आहे. या सिव्हिलसर्विसनें हिंदुस्थानचा कारभार आजपर्यंत बादशहांच्या वतीनें चालविला. पण आज साम्राज्यापुढें असा प्रश्न उभा राहिला आहे कीं, या सिव्हिलसर्विसच्या हातीं राज्यकारभार ठेवल्यानें हिंदुस्थानचें व साम्राज्याचें अधिक हित होईल कीं लोकांच्या हातीं सत्ता दिल्यानें अधिक होईल ? हा प्रश्न फार सोपा आहे. पार्लमेंटनें राज्यकारभार आतां

कोणाच्या हातीं सोंपवावा ? हल्लीं कारभार सिव्हिलसर्विसच्या हातीं आहे, तो आम्हांला त्यांच्या हातून हिसकून घ्यावयाचा नाहीं. तो कायद्यानेंच बदलावयाचा आहे. हिंदुस्थानचा कारभार बादशहांनीं हिंदी प्रजेच्या कल्याणाकरितांच यांच्या हातीं दिला. बादशहांचा जाहिरनामा व पार्लमेंटचा कायदा हीं बरोबरच जन्मास आलीं. जाहीरनामा काढून बादशहांनीं आपले हेतु जाहीर केले व कायद्यानें त्यांच्या कारभारास धरबंद घातला. विलायतसरकारची समजूत अशी कीं, हे नोकर प्रजेच्या हातीं हळूहळू स्वराज्याचे हक्क देतील. पण या नोकरांना शेंदूर फांसल्याबरोबर तेच बादशहा बनले व त्यांची नोकरशाही निर्माण झाली. नोकरशाही हें Bureaucracy चें भाषांतर आहे. Bureau म्हणजे नोकर व cracy म्हणजे शाही ! पुढें या नोकरशाहीची मजल इतकी गेली कीं, त्यांतलेच एक नोकर लॉर्ड कर्झनसाहेब खुद्द बादशहांच्याच जाहिरनाम्याला अशक्य सनद (impossible charter) म्हणूं लागले. बेलजमचा तहच कागदाचें चिटोरें ठरतें असें नव्हे, तर मुख्य प्रधानांच्या संमतीनें बादशहांनीं जो जाहीरनामा काढला तोसुद्धां या नोकरांनीं 'अशक्य' ठरविला ! (टाळ्या.) राणीच्या जाहीरनाम्याला अशा रीतीनें धाब्यावर बसवून त्यांनीं असा कारभार केला कीं, लोकांच्या हातीं मुळींच सत्ता ठेविली नाहीं. पुढें तर मोर्लेसाहेब—हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी—असें स्पष्ट म्हणाले कीं, लोकांच्या हातीं सत्ता जाईल असा दिवस मला दिसत नाहीं.' लोकांच्या हातीं सत्ता देणें व लोकांना राज्यकारभाराचे वांटेकरी करणें (Government by participation) ही एक प्रकारची राजनीति आहे. दुसरी राजनीति आमच्या धर्मशास्त्रांत उत्कृष्ट रीतीनें सांगितली आहे. नवऱ्यानें यज्ञादि धर्मकर्मे करावीं व बायकोनें त्यावेळीं नवऱ्याच्या हातास हात लावावा. (हंशा.) यज्ञ करण्याची अशी बायकांना पूर्ण मुभा ठेवलेली आहे ! याचेंच नांव association. हीच राजनीति—Government by association—हल्लीं चालू आहे. गव्हर्नरसाहेबांनीं कायदा करावा व तो आम्ही पहावा हा त्याचा अर्थ होय. मोर्लेसाहेबांनीं कौन्सिलांतले आमचे सभासद वाढविले पण

आम्हांला फक्त associates साक्षीभूत ठेवलें. जुलमाचा कायदा पास करून घेतांना आम्हांला साक्षीभूत ठेवावयाचें व म्हणावयाचें कीं, या कायद्याला लोकांची अनुमति होती ! असला साक्षीभूत व्यवहार करणें म्हणजे राज्यकारभाराची निव्वळ थट्टा करणें होय. ही फसवणुकीची राज्यव्यवस्था आम्हांला नको आहे. कायदा पास होतांना हात मोजायची वेळ आली कीं, आमचे दोन हात तर त्यांचे चार हात ! या गोष्टी त्यांनीं आजपर्यंत जाणूनबुजून केल्या आहेत. त्यांना काय हें समजत नाहीं ? रिपोर्ट करायचे त्यांनीं, आणि त्यांतूनच, त्यांचेच आंकडे घेऊन बेरीज वजावाकी आम्ही करीत बसायचें ! जसें काय, त्यांना हें सगळें कळतच नव्हतें ? ते राज्यकारभार चालवितात, त्यांना सारें समजतें. स्वराज्य म्हणजे काय याबद्दल बरेच झगडे होऊन अखेरीस ठरलें कीं, आमच्या प्रतिनिधींनीं बहुमतानें पास केलेला कायदा देशांत चालावा याचें नांव स्वराज्य ! हें स्वराज्य प्रथम १९०६ सालीं दादाभाईंनीं कलकत्त्याच्या राष्ट्रीयसभेंत मागितलें. ( टाळ्या. ) तोंपर्यंत या भिंतीवर बुक्या मार त्या खिडकीला धक्के दे असें चाललें होतें. मुख्य दरवाजा उघडण्याचा मार्ग दादाभाईंनीं दाखवून दिला. मुख्य दरवाजा उघडला म्हणजे साऱ्या खिडक्या आपोआप उघडतां येतील असें त्यांनींच प्रथम जाहिर केलें. अमुक कायदा जाचतो, घ्या गव्हर्नरसाहेबांची मुलाखत ! पण त्यांनीं तरी कायदा काय म्हणून फिरवावा ? ज्यांनीं कायदा पास करून घेतला ते काय मूर्ख आहेत ? कायदा कशाकरितां केला हें काय त्यांना कळत नाहीं ? जेथें बादशहांचा जाहिरनामासुद्धां कागदाचें चिटोरें ठरतो तेथें आमच्या अर्जांची कथा काय ? आम्ही स्वराज्य मागतों म्हणजे बादशहांची सत्ता काढतों अशांतला मुळींच भाग नाहीं—तसें आमच्या मनांतहि नाहीं. वर बादशहा आहेत तसेच राहूं द्या, फक्त कायदे करण्याचे अधिकार आम्हांस द्या व जे हल्लीं नोकर आहेत ते नोकर या नात्यानें राहूं द्या एवढीच आमची स्वराज्याची मागणी आहे. हे नोकर स्वतःला तोंडानें नोकरच म्हणवितात—civil servant असें त्यांचें नांव आहे—पण हातानें वागतात मात्र मालकासारखे ! हें आम्हांला नको

आहे. आमचे ४ प्रतिनिधि कौन्सिलांत बसतील व जो कायदा करतील तो या नोकरांनीं मानला पाहिजे. त्यांनीं तो नाहीं मानला तर मात्र त्यांना काढून टाकण्याचा अधिकार आम्हांला पाहिजे. या नोकरांना, त्यांनीं हुकूम पाळले नाहींत तर काढायचें—उगाच फुकटंफाकटीं नाहीं हां! ( हंशा. ) हा अधिकार म्हणजे स्वराज्य. हें स्वराज्य मागण्याचें कॉंग्रेसनें ठरविलें पण त्यावेळीं दादाभाईनीं तें मोघम शब्दांतच मांडलें होतें. दोन वर्षांपूर्वी तो मोघमपणाहि गेला असून कॉंग्रेसनें आपली मागणी स्पष्ट शब्दांत मांडली आहे. मागणी निश्चित झाली, बादशहा पाहिजेत, फक्त या नोकरांच्या हातची सत्ता प्रजेच्या हातीं द्या एवढीच आमची बादशहांजवळ मागणी आहे. फरक फार थोडा आहे—यांत बादशहांचेंहि नुकसान नाहीं. ज्याचें नुकसान होणार त्यांना आमची चळवळ जाचते. ज्याच्या हातची सत्ता जाणार, त्याला वाईट वाटणेंहि स्वाभाविक आहे. ज्याठिकाणीं आजपर्यंत फुलें वेंचलीं त्याठिकाणीं आतां गोंवऱ्या वेंचण्याचा प्रसंग आला तर कोणाला वाईट वाटणार नाहीं ? मी आजपर्यंत घरांत भाडेकरी म्हणून राहिलों पण एकाएकीं जर मालक उपस्थित झाला तर वकिलाकडे जाऊन आधीं चौकशी करतों कीं, हें घर मालकाकडे न जाईल अशाला कांहीं कायद्याची युक्ति आहे का ? हा मनुष्यस्वभाव आहे. आजपर्यंत हे नोकर हिंदुस्थानच्या घरांत मालकासारखे वागले पण त्यांचा मोठा दोष आज बादशहांच्या नजरेस आला आहे. आजपर्यंत या नोकरांच्या विरुद्ध बादशहांजवळ मुळींच तक्रारी केल्या नाहींत असें नाहीं. आह्मी पुष्कळ ओरड केली पण आजपर्यंत बादशहांनीं तिकडे लक्षच दिलें नाहीं. आह्मी सांगितलें ' मिठाचा कर उठवा ' कीं, या नोकरांनीं बादशहांना भीति घालावी कीं, ' हिंदुस्थानचें राज्य बुडेल ! या नोकरांची जेव्हां तेव्हां ओरड ही कीं, ' आमचें ऐकलें नाहीं तर राज्य बुडेल, we are the men on the spot (हंशा.) या नोकरांची पोळी अशा तऱ्हेनें आजपावेतों नीट चालली होती. पण पुढें बादशहांवरच मोठा प्रसंग आला. युद्ध सुरू झालें तेव्हां इग्लंडनें खूप दारूगोळा तयार केला, पैसाहि खर्च केला. पण नुस्ता दारूगोळा काय आणि पैसा

काय, माणसांच्या मदतीशिवाय काय करणार? दारूगोळा यंत्रांतून भराभर बाहेर काढतां येतो पण अजून यंत्रांतून पटापट माणसें निर्माण करण्याची कांहीं युक्ति विलायतेंतसुद्धां निघालेली नाहीं. ( टाळ्या व हंशा. ) या महायुद्धांत बादशहांना जेव्हां माणसांची जरूर लागली तेव्हां त्यांनीं हिंदुस्थानांत लिहून पाठविलें कीं, ' सैन्य द्या. ' पण येथें सैन्य कुठें होतें? काय जीं ४।५ लाख माणसें होतीं तीं अगोदरच दिलीं पण आणखी शिपाई कोठें आहेत? इतर देशांतील मान पाहिलें तर शेंकडा दहा माणसें लढाईला मिळतात. या गणितानें हिंदुस्थानांत ३० कोटी प्रजेंतून ३ कोटी तरी लढवय्ये मिळावयास पाहिजे होते. युद्धाच्या आरंभीं हिंदुस्थानांतून जर तीन कोटी लढवय्ये युरोपांत युद्ध करण्यास गेले असते तर हें युद्ध पहिल्या १५ दिवसांतच समाप्त झालें असतें. इतक्या लोकांना जर्मनींत उभें रहावयालासुद्धां जागा मिळाली असती कीं नाहीं याची शंकाच आहे. (टाळ्या.) पण माणसें आहेत कोठें? सुरी सांपडली—कर खटला, बंदुक सांपडली—कर खटला, अशा रीतीनें राज्यकारभार करून या नोकरशाहीनें या पूर्वीच इकडे नायनाट करून टाकला होता! यामुळें येथें शूर पुरुष कांहीं राहिला नाहीं—खेडेगांवांत तालमी होत्या त्यासुद्धां नाहींशा केल्या. मग अशा स्थितींत आयत्या वेळीं शिपाई मिळणार कोठून? पूर्वीं भोंसल्यांच्या वेळीं या नागपुरांत ५।५० हजार सैन्य वाटेल तेव्हां मिळत असे. मग आज तें कां मिळूं नये? येथें नोकरशाही १०० वर्षें माजली—बोकाळली, लोकांना राज्यकारभाराविषयीं आपलेपणा वाटेनासा झाला मग आतां लढाईवर मरायला जातो कोण? या नोकरशाहीची पुंडाई अधिकाधिक माजावी म्हणून रणांगणावर जाऊन कोणी थोडेंच मरतो? आम्ही नाहीं मरणार. कांहीं लष्करी शिक्षण मिळणार असेल तर जाऊं. देशाचा फायदा असेल तर जाऊं. ' मी देशाकरितां मरेन ' अशी स्फूर्ति उत्पन्न होईल तेव्हांच लोक रणांगणावर जाऊन मरतात. ११ रुपयांकरितां कांहीं कोणी मरायला तयार होत नसतो. ज्यानीं कधीं दोनदोन पिढ्यांत तरवार काळी का गोरी, उलटी धरायची कीं सुलटी धरायची, हेंहि पाहिलें नाहीं, त्यांना

मारूनमुटकून युद्धावर नेलें तर त्यांच्याहातून लढाई नाहींच होणार, पण रडाई मात्र होईल. ( हंशा व टाळ्या. ) ज्यावर कधीं सूर्य मावळत नाहीं असें जें एवढें अवाढव्य साम्राज्य, त्यांत ५।५० लाखहि लोक प्रसंग आला असतां बादशहांना मिळूं नयेत याचा दोष कोणाकडे? दोष या नोकरशाहीकडे आहे—आमच्याकडे काडीइतका नाहीं. आमची मरण्याची इच्छा आहे, पण यांनीं आह्मांला शिकविलें असेल तेव्हां कीं नाहीं? हिंदुस्थानांत जाट, रजपुत, मराठे, मुसलमान अशा शूर लोकांच्या जाती होत्या, त्यांत आतां शिपाई उरला नाहीं असें जेव्हां बादशहांच्या अनुभवास आलें तेव्हां यांचे डोळे उघडले. 'या तीस कोटींच्या हिंदुस्थानांत सैन्य कां मिळूं नये' ही चौकशी करण्याकरितां लगेच मॉंटेग्यु साहेब स्वतः इकडे धांवत आले. आज बादशहांची काय स्थिति झाली आहे पहा. बादशहांना शेवटीं शिपायांकरितां अमेरिकेकडे भीक मागायची पाळी आली! ज्या अमेरिकेनें बंडाचें निशाण उभारून इंग्लंडपासून स्वातंत्र्य मिळविलें, त्याच लोकांजवळ आतां आमच्या बादशहांना तोंड वेंगाडण्याची पाळी यावी, ही बादशहांची मानहानि कोणी केली? आह्मी केली? जे आह्मी राजनिष्ठ, त्या आम्हांलाच यांनीं धुडकावून लावलें—मग आमचा तरी दोष काय? अमेरिका युद्धांत पडली तेव्हां त्यांनीं पहिल्यानें इंग्लंडला सांगितलें कीं, 'अगोदर आयर्लंडला खूष करा.' अजून हिंदुस्थानचें नांव अमेरिकेनें घेतलेलें नाहीं व केव्हां पुढें घेतील कीं नाहीं, हेंहि सांगतां येत नाहीं. झार एवढा जुलमी राजा पण त्याला सुद्धां एक दिवस तारेनें राज्य सोडावें लागलें. एवढा झार दोस्त राजा पण तो गेला तेव्हां इंग्लंडनें रशियन लोकांचेंच अभिनंदन केलें. झार पदच्युत झाला तर लोकांचें अभिनंदन अशी जगाची आज स्थिति पालटली आहे—इतिहासच पालटला आहे. मॉंटेग्यु साहेबांनीं जाहीरनामा काढला कीं, 'हिंदुस्थानच्या लोकांना स्वराज्य देणें हेंच बरोबर आहे.' बादशहांचा जाहीरनामा प्रसिद्ध होतांच गव्हर्नरसाहेबांनींहि गॅझेटांत जाहीर केलें कीं, 'आमच्या आजपर्यंतच्या राज्यकारभाराचा हेतु स्वराज्य देण्याचाच आहे.' यांचा हेतु आहे पण दिलें मात्र नाहीं! (टाळ्या.)

या इंग्रजी राज्य.त १०० वर्षांनीं हेतु कळत असतो! (हंशा.) आज कॉंग्रेसनें स्वराज्य म्ह णजे काय पाहिजे हें निश्चित केलें आहे. इकडे सर्व गव्हरनर-कामिशनर यांनीं परवां दिल्लीस मॉंटेग्यु साहेबांना भेटून हिंदुस्थानला काय द्यावें हेंहि ठरविलें आहे, पण ती गांसडी येथें फुटणार नसून मॉंटेग्यु साहेब ती विलायतेला गेल्यावर फोडतील. (हंशा.) हा आमचा पार्लमेंटपुढें दावा आहे असें समजा. त्यांत हिंदुस्थानचे लोक हे वादी असून, नोकरशाही व युरोपियन व्यापारी हे प्रतिवादी आहेत. प्रतिवादींनीं आमची मागणी न्याय्य आहे असें जाहीर करून मुख्य मुद्यासंबंधानें कबुलीहि दिली आहे. आतां तंटा कुठें राहिला? कोर्टाचा कल आमच्या बाजूचा आहे, विलायतेंतील लोकांच्या मनांत हिंदुस्थानास स्वराज्य द्यावयाचें आहे, प्रतिवादींनीं स्वराज्याचें ध्येय कबूल केलें आहे. यशाचीं सर्व पूर्वचिन्हें झालीं आहेत. पण तिकडे लॉर्ड सिडनहॅमसारखे लोक प्रतिवादींतर्फे भांडण चालविण्यास चंग बांधून सज्ज झाले आहेत, त्यांचे प्रयत्न आपणांस हाणून पाडले पाहिजेत. व्यापारी लोकांनीं त्यांना पैशाचाहि खूप पुरवठा केला आहे. सिडनहॅम साहेब मुंबईचे गव्हरनर होते तेव्हां त्यांनीं बराच करडा अंमल चालविला, आतां ते पेन्शन घेऊन इंग्लंडास गेले तरी 'स्वराज्य दिलें तर हिंदुस्थानचें राज्य बुडेल' अशी त्यांनीं ओरड चालविलीच आहे. परवां अशी भीति पडली होती कीं, कलकत्यास स्वराज्याच्या मागणींत बदल होतो कीं काय? पण सर्व पुढाऱ्यांनीं शहाणपणा दाखवून पूर्वींचाच ठराव कॉंग्रेसमध्यें कायम केला आहे, ही आनंदाची गोष्ट होय. आमची मागणी जर रोज बदलावयास लागली तर देणारानें तरी द्यावें काय? सुदैवानें आमची मागणी कायम राहिली आहे. प्रतिवादी व बादशहा हेहि आमचें म्हणणें कबूल करतात. आतां दुसरीच युक्ति निघाली आहे—एकदम देऊं नका. आमचे अध्यक्ष वकील आहेत, येथेंहि पुष्कळ वकील आले आहेत, त्यांना ठाऊक आहे कीं, दावा शाबीत झाला म्हणजे शेवटीं हत्तेबंदी मागायची! (हंशा.) हत्तेबंदी जितकी कमी मिळेल तितकें प्रतिवादी पहात असतो—तसें आमचा हा देशाचा दावा आतां हत्तेबंदीवर आला आहे. प्रतिवादीचें म्हणणें कीं लाखरुपये देणें

कबूल पण वर्षाला एक रुपयाची हप्तेबंदी द्या. आणि हा जो रुपया द्यायचा तोही विनव्याजी ! अशी १ रुपयाची हप्तेबंदी मिळाली म्हणजे लाख रुपये फिटण्यास लाख वर्षे लागतील. मग आम्ही आहों आणि काल आहे— पुढच्यापुढें पाहून घेऊं ! 'कालोऽह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी !' ( हंशा ) हप्तेबंदीची ही अखेरची शकल आहे. आमचें म्हणणें कीं, हप्तेबंदी आह्मांलाहि कबूल आहे, पण दर हप्ता निदान २५ हजारांचा तरी करा. पूर्ण स्वराज्य आम्हांला चार हप्त्यांनीं मिळालें तरी चालेल पण पहिला हप्ता भरपूर तरी द्या. दावा या थराला आला आहे. आतां तो विलायतेंत चालेल तेव्हां आपली बाजू तुम्ही कोर्टापुढें मांडणार कीं हात जोडून स्वस्थ बसणार ? सर्व प्रकारचीं साधनें अनुकूल झालीं आहेत, पार्लमेंटसभा अनुकूल, काल अनुकूल, आतां फक्त आम्ही काय प्रयत्न करतों इकडे सर्वांचे डोळे लागून राहिले आहेत. आतां तुमचे वकील शिष्टाईकरितां निघणार आहेत. पण शिष्टाई म्हणजे नुस्तें गोड बोलणें नव्हे हें ध्यानांत ठेवा. विलायतेंत जायचें, २।४ प्रमुख माणसांच्या भेटी घ्यायच्या, व्याख्यानें द्यायचीं व परत यायचें असली शिष्टाई आतां उपयोगीं पडणार नाहीं. आज जे शिष्टाईला जातील त्यांना तेथें सर्व लोक अनुकूल करून घेण्याकरितां तळ देऊन राहिलें पाहिजे. इकडे ऊष्ण हवा म्हणून तिकडे थंड हवेंत जा, इकडे थंड हवा म्हणून तिकडे ऊष्ण हवेंत जा, असली हवापालटीची शिष्टाई आतां नको आहे. हातीं घेतलेल्या कार्याला यश मिळेपर्यंत तिकडे नेट धरून राहण्याची तयारी पाहिजे. ( टाळ्या ) आज जगभर स्वातंत्र्याचा डंका वाजत आहे—बेल्जम स्वतंत्र होणार, जर्मनीच्या रानटी वसाहतींना सुद्धां स्वराज्याचे हक्क मिळणार, मग हिंदुस्थाननेंच काय पाप केलें आहे, असें निर्भीडपणें विचारणारीं माणसें तेथें जाऊन राहिलीं पाहिजेत. नोकरशाहीची शेंडी लोकांच्या हातांत येईल असा राज्यपद्धतींत बदल व्हावयास पाहिजे असेल तर धीराचें शिष्टमंडळ ताबडतोब इंग्लंडास गेलें पाहिजे. हें काँग्रेसचें काम आहे. असें शिष्टमंडळ काँग्रेसनें पाठवावें ह्मणून मी वर्षभर खटपटहि करून पाहिली, पण कोणी मनावर घेतलें नाहीं. आतां बारिकसारिक भाग सांगत बसत नाहीं,

पण माझी खटपट व्यर्थ गेली हें खरें आहे. आतां आपल्या हातून काय होईल तें करावें ह्मणून स्वराज्यसंघानें हा उद्योग हातीं घेतला आहे. आह्मी बॅप्टिस्टासाहेबांना ( टाळ्या ) पाठविलें तेव्हांहि कांहीं लोक विरुद्ध होते. पण आतां बॅप्टिस्टाचें काम कॉंग्रेसनें मंजूर केलें आहे. ( टाळ्या ) आतां यापुढें दिरंगाई करून भागावयाचें नाहीं. जें डेप्युटेशन आतां विलातेस जाईल, त्याला आपण पैसा पुरविला पाहिजे. विलायतेंत जाऊन सभा भराविल्या पाहिजेत, वर्तमानपत्रें आपल्या बाजूचीं करून घेतलीं पाहिजेत, पार्लमेंटच्या सभासदांकडे खेटे घालून त्यांपैकीं निदान ३०० लोक तरी आपल्या बाजूचे केले पाहिजेत. नुस्तीं व्याख्यानें झोडून हें काम होणार नाहीं. आज काल असा आला आहे कीं, यावेळीं नेटाचा उद्योग केला तर यश खात्रीनें येईल. ( टाळ्या. ) आतां उद्योग करणार कीं गंमत पहाणार हा प्रश्न आहे. काल अनुकूल आला आहे. प्रेसिडेंट वुइल्सन यांनीं मुख्य प्रधानांला कळविलें कीं ' आयर्लंडचा तंटा तोडा. ' तेव्हां मुख्य प्रधानांनीं आयर्लंडास सांगितलें कीं, ' तुम्ही जें आपापसांत एकजुटीनें ठरवाल तें देऊं; ' आम्हीं काय पाहिजे आहे तें अगोदर एकमतानें ठरवून टाकलें आहे. आपल्याकडे अल्स्टरचा तंटा नाहीं. मध्यंतरीं जातींजातींत भांडणाचें पिल्लूं निर्माण करण्याचा बराच प्रयत्न झाला, पण त्यालाहि चांगलेंसें पीक आलें नाहीं. ( हंशा व टाळ्या. ) असा काळ अनुकूल असतां तुम्हीं स्वस्थ बसणार कीं आम्हांला पाठिंबा देणार? एकट्या–दुकट्यानें इंग्लंडांत जाऊन काय होणार? त्याच्या पाठीमागें तीस कोट लोक खडे पाहिजेत. तुम्हीं तसे खडे राहणार कीं नाहीं हें विचारण्यासाठीं मी येथें आलों आहें. ( होय. ) रुपये मिळतील, मला तें मुळींच कठिण वाटत नाहीं. माणसें असल्यावर रुपयांना काय तोटा! मला माणसें पाहिजेत–रुपये आपोआप मिळतील ' स्वराज्याचे हक्क दिले नाहींत तर हिंदुस्थानांतील तीस कोटी लोक असंतुष्ट होतील असें तेथें सांगण्याचा अधिकार मला तुह्मी दिला पाहिजे. ( टाळ्या ) ' मला स्वराज्य पाहिजे, मी त्यासाठीं खटपट करणार ' असें प्रत्येकानें ठांसून सांगितलें पाहिजे. कोणाच्या धाकदपटशाहाला भीक

घालण्याचे किंवा भुलावणीला भुलण्याचे हे दिवस नाहींत. प्रतिवादी हृसेबंदीवर आला आहे ही त्याच्या दुर्बलतेचीच साक्ष होय. ( टाळ्या ) भाताची हंडी शिजून चुलीवर तयार झाली आहे. इतक्यांत दोन कुत्रे आपापसांत भांडून ती हंडी विटाळण्याच्या बेतांत आहेत. ही हंडी त्या कुत्र्यांना विटाळूं देणार कीं त्यांना हांकून तुह्मी भोजन करणार ? काळ ओळखा, स्वराज्य म्हणजे काय हें समजून घ्या, तुह्मांला समजलें असेल तें खेड्यांपाड्यांतील लोकांना समजावून द्या, व वेळ आली आहे ती आळसानें घालवूं नका. यावेळीं उद्योग केलात नाहीं तर जग तुम्हांला माणसें ह्मणणार नाहीं हें लक्षांत ठेवा. उद्योग करण्याची बुद्धि परमेश्वर तुम्हांला देवो अशी त्याची प्रार्थना करून मी माझें छोटेसें भाषण संपवितों. ”

( टाळ्यांचा प्रचंड कडकडाट. )

लोकमान्यांचें भाषण अवघें अर्धातासच झालें, पण तें स्वराज्यवादाचें केवळ सारच होतें. या भाषणांत केवळ सूत्ररूपानें स्वराज्यवादाच्या सर्व मुद्यांचा ऊहापोह झाला असल्यानें प्रत्येक स्वराज्यप्रेमी गृहस्थानें हें अमृताप्रमाणें मधुर भाषण नित्य पाठांत ठेवावयास हरकत नाहीं. नंतर रा. नानासाहेब अळेकर म्हणाले:— “ लोकमान्य हे आपणांजवळ पैसा मागणार नाहींत पण शिष्टमंडळ हें आपलें असल्यामुळें त्याचा खर्च चालविण्याची जबाबदारी केवळ आपल्यावरच आहे. लोकमान्यांच्या शब्दांत अशी कांहीं जादू भरली आहे कीं, ते जेथें जातील तेथें वाटेल तितका पैसा मिळवूं शकतील ! वऱ्हाड—मध्यप्रान्तानें लोकमान्यांस १ लाख रुपये दिल्याबद्दल कित्येकांस नवल वाटतें, पण प्रसंग असा आहे कीं, एक लाखच काय, पण दहा लाख रुपये लागले तरी ते देण्यास आपण कंबरा बांधल्या पाहिजेत. ( टाळ्या. ) दुष्काळ व महर्घता असतांना हा पैसा आणावयाचा कोठून, असा प्रश्न कोणी करतील, पण हा पैसा पुढील दुष्काळ वांचविण्याकारितांच जमवावयाचा आहे हें त्यांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. गाईचें दूध काढण्याच्या अगोदर ज्याप्रमाणें तिच्या आंचळांस घरचें दूध लावावें लागतें तसाच हाहि प्रकार आहे. आतांपर्यंत नागपुरास

स्वराज्य फंडासाठीं १००० रु. रोख आले असून त्यात अंबाझरी हेल्थ कँपाचे ५०६ रु. व कॉटन मार्केटाचे ५०० रु. जमा झालेले आहेत.'' ( टाळ्या ) लोकमान्यांस थैली समर्पितांना अध्यक्ष म्हणाले:—" लोकमा-न्यांच्या या स्वराज्यदौऱ्यांत आतांपर्यंत ९९ हजार रुपये जमले आहेत. आमचे हे कार्तिकस्वामी विलायतेस जात आहेत, त्यांना शस्त्रास्त्रसामुग्री देण्याचा हा मजवर पवित्र प्रसंग आल्यामुळें मला धन्यता वाटते. '' नंतर आभार-प्रदर्शन होऊन जयजयकारांत समारंभ आटोपला.

---

## ( प्रकरण १३ वें. )

# खरें ज्ञान म्हणजे काय ?

### ( काटोल. )

नागपूरचा व्याख्यानसमारंभ आटोपून लोकमान्य रात्रीं ९ वाजतां ( ता. १९–२–१८ ) मोटारींतून काटोलास जावयास निघाले. लोकमान्यांस न्यावयास काटोलहून रा. बळवंतराव घाटे बाके हे आले होते. इतक्या तांतडीनें काटोलास निघण्याचा लोकमान्यांचा उद्देश हा कीं, ' एकदां काटोलास जाऊन पडावें व विश्रांति घ्यावी. ' लोकमान्यांस आज विश्रांतीची इतकी जरूरी होती कीं, अतोनात श्रमांमुळें त्यांचा देह हालचालसुद्धां करण्याचें नाकारूं लागला होता. लोकमान्यांना जी काय विश्रांति मिळाली होती ती ता. १७ रोजीं रात्रीं वरोड्यास. त्यानंतर ते ता. १८ रोजीं सकाळीं वरोड्यास व्याख्यान होऊन दुपारीं हिंगणघाटास गेले. त्याच रात्रीं वर्ध्याचा समारंभ आटोपून रात्रींच्या रात्रीं वर्धा सोडून शिंदीस जावें लागलें. ता. १९ रोजीं सकाळीं शिंदीचा समारंभ पार पडतांच लोकमान्य नागपुरास गेले, पण तेथें दिल्लीला परवानगी मिळत नाहीं अशी संतापजनक बातमी मिळाल्यामुळें ते तडक उमरेडास

गेले. तेथें तिसऱ्याप्रहरीं व्याख्यान देऊन लोकमान्य नागपुरास आले; तेथेंहि सायंकाळीं व्याख्यान दिलें व आतां ते काटोलास निघाले ! ! या तब्बल दोन दिवसांत लोकमान्यांस शांतपणें विश्रांतीहि मिळाली नाहीं व स्वस्थपणें भोजनालाहि वेळ झाला नाहीं. शिवाय एकसारख्या प्रवासाशिवाय ३६ तासांच्या अवधींत चांगलीं पाऊण तास–तासतासाचीं ६ व्याख्यानें झालीं तीं निराळींच ! या दोन दिवसांतील लोकमान्यांचे श्रम पाहिले म्हणजे असें वाटतें कीं, या जीर्ण शरीराकडून काम खेंचून घेणारें मन तरी किती जोरकस असेल बरें ?

पण त्या मनाच्या खंबीरपणाची व सहनशीलतेची परीक्षा अजून संपली नव्हती. मोटारी ११ वाजतां काटोलच्या वेशीपर्यंत पोंचल्या खऱ्या, पण वेशीवरील देखावा जितका आनंदजनक, जितका स्फूर्तिदायक, तितकाच किंवा त्यापेक्षांहि कांकणभर जास्त त्रस्तमनाला भयानक वाटणारा होता. काटोलकरांची शाबास खरी, कीं त्यांनीं इतक्या अपरात्रीं १॥-२ मैल लांबवर सायंकाळपासून तिष्ठत उभें राहून लोकमान्यांच्या स्वागतार्थ हजारों लोकांनीं प्रेमोत्साह दर्शविला ! स्वागताचा थाट केवळ अपूर्वच होता. निर्जन प्रदेशांत जमलेले हजारों लोक, त्यांनीं पुकारलेला जयध्वनि, मिरवणुकीसाठीं शृंगारलेले मार्ग, लखलखीत प्रकाश देणाऱ्या त्या मशाली व ते दिवे, मिरवणुकीच्या अग्रभागीं झुलणारा तो प्रचंड हत्ती, मिरवणुकीपुढें दौडत जाणारे ते घोडेस्वार व सांडणीस्वार, मिरवणुकीपुढें झडणारा तो वाद्यांचा गजर, आणि सर्व गांवभर चाललेला तो दीपोत्सव हा सारा देखावा काटोलकरांच्या तिलकप्रेमास उज्ज्वलता आणणाराच होता. प्रेमा होता, उत्साह होता, आनंद होता, सर्व कांहीं होतें पण लोकमान्यांच्या थकून-गळून गेलेल्या मनाला प्रसन्नता असणें अशक्य होतें. मिरवणूक संपली तों १२ वाजून गेले व लोकमान्यांचा कँप श्रीरामचंद्र शेटजींच्या बगीच्यांत थाटला होता तेथें अडचणीच्या मार्गानें पोंचण्यास १२॥ झाले. व बगीच्यांतील देखावा मात्र खास लष्करी होता. बगीच्याच्या शीतल मध्यभागीं तंबू-राहुट्या-डेरे ठोकून कँपची उभारणी केली होती.

लोकमान्य एका राहुटींत उतरले व क्षणार्धांत निद्रावश झाले. ' कांहीं खावयाला पाहिजे का ? ' हें त्यांना विचारण्याची छाती अतुंकाकांसहि झाली नाहीं ! !

दुसरे दिवशीं सकाळीं ८ वाजतां व्याख्यानसमारंभ झाला. चहा घेऊन लोकमान्य प्रथम श्रीमंत शामराव हरि यांच्या उदार देणगींतून उभारण्यांत येणाऱ्या श्री मोफतवाचनालयाच्या पायाचा दगड बसविण्यास वाचनालयस्थानीं गेले. कोणशिलेची विधिपूर्वक पूजा झाल्यावर लोकमान्यांनीं रुप्याच्या करणीनें चुना घालून शिला चिरस्थायी केली. हा समारंभ आटोपल्यावर व्याख्यानसमारंभ श्री. गोपाळराव बुटी यांच्या विस्तीर्ण जिनाच्या पटांगणांत उरकून घेण्यांत आला. सभास्थानीं १०।१२ हजार लोक लोटले होते. जयजयकार शांत झाल्यावर रा. रामकृष्णपंत जोशी यांनीं 'जयजय श्री तिलकदेव' व रा. बाळाभाऊ दीक्षित यांनीं 'स्वदेशभक्ति करुनि जयानें भूषविलें जनका 'हीं पद्यें खणखणीत आवाजांत म्हटलीं. सौ. कमलाबाई कऱ्हाडे यांनीं म्हटलेलें 'वंदन करित्यें आनंदानें गंगाधरनंदना। देह झिजवुनी कीर्तिपरिमळें लाजविलें चंदना ॥' हें पद्य मधुर चालीचें असून तें त्यांनीं तितक्याच मधुरतेनें गाइलें. नंतर विधिपूर्वक श्री. रामचंद्र शेटजी यांची अध्यक्षस्थानीं योजना झाल्यावर त्यांच्यातर्फे रा. केळकर वकील यांनीं स्वागतपर भाषण केलें व लोकमान्यांच्या आगमनामुळें काटोलकरांच्या हृदयांत न मावणारा आनंद व्यक्त केला. नंतर स्वराज्यसंघाचे चिटणीस रा. मुलमुले यांनीं मानपत्र वाचलें.

मानपत्र

# लोकमान्य विद्वन्मणि योगिराज बाळ गंगाधर टिळक !

## संस्थान पुणें यांचे चरणीं.

आपल्या लोकशिक्षणैकव्यवसायितेनें, लोकहितपरतेनें, लोकसेवेच्या असिधाराव्रतानें, शरीरकष्टाबद्दलच्या बेपर्वाईनें, राजकारणपटुत्वानें, आ-

१५२०

श्चर्यजनक विद्याव्यासंगानें, तत्वज्ञानाचें रहस्य आचरणांत आणून दाखविण्यानें, अचल धैर्यानें, अनुपम लेखनकौशल्यानें, स्पृहणीय चिकाटीनें, निस्सीम स्वातंत्र्यप्रेमानें, समयज्ञतेनें आणि प्रगमनशीलतेनें आपण आह्मां हिंदवासीयांस अज्ञानपंकांतून, दारिद्र्यविपिनांतून, पारतंत्र्यगर्तेतून, पाश्चिमात्य सुधारणांच्या मोहजालांतून, आत्मप्रत्ययहीन परंतु लोकाग्रणीमन्य स्वजनांच्या पायबंदांतून बाहेर काढण्याच्या कार्यांत आजपर्यंत अविश्रांत श्रम करून जें यश मिळविलें त्याबद्दल आह्मी काटोल तहशिलींतील सर्व रहिवासी आपलें अभिनंदन करतों. आपली दिव्य मूर्ति शुक्राच्या ताऱ्याप्रमाणें उदयोन्मुख झालेल्या स्वातंत्र्यसूर्याचें शुभागमन आह्माला नेहमीं सुचविते. आमची पूर्ण खात्री आहे कीं, दिवसानुदिवस आपल्या प्रयत्नांना ज्यास्तज्यास्तच यशप्राप्ति होईल आणि लवकरच हिंदभूमीला आपल्या इच्छेप्रमाणें स्वराज्य मिळून ती जगांतील स्वतंत्र राष्ट्रांमधील आपल्या उच्च स्थानावर अधिष्ठित होईल. आपण आमच्या भावी स्वराज्याचे प्राण आहांत. आम्हां हिंदी लोकांच्या कृतज्ञ अंतःकरणांवर अप्रातिहत सत्ता चालविणारे अनभिषिक्त भूपति आहांत. आपल्या प्रयत्नानें स्वायत्त व संपन्न बनलेल्या हिंदमातेची दीर्घकालपर्यंत सेवा करण्याची संधि त्या दयामय परमेश्वरानें आपल्याला द्यावी अशी त्याच्या सर्वसमर्थ चरणांजवळ आमची नम्र प्रार्थना आहे.

**काटोल तहशिलींतील रहिवासी.**

सुंदर रौप्यकरंडकांतून मानपत्रसमर्पणाचा पवित्र विधि झाल्यावर टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटांत लोकमान्य ह्मणाले:--" आपण माझा सन्मान करून मला जें मानपत्र दिलें त्याबद्दल आपले आभार मानण्यापूर्वी मला प्रथम आपली माफी मागितली पाहिजे. वास्तविक मला येथें एक महिन्यापूर्वीच यावयास पाहिजे होतें, पण मला त्यावेळीं प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें तसें करतां आलें नाहीं. मला येतां न आल्यामुळें आपली केवढी निराशा झाली असेल याची, मला हा एवढा लोकसमुदाय पाहण्यापूर्वी बरोबर कल्पना आली नव्हती. त्या वेळची आपली पुष्कळ तयारीहि

फुकट गेली असेल. आपल्या निराशेला मी कारणीभूत व्हावें याबद्दल मला वाईट वाटतें व तो अपराध पायाला इजा झाल्यानें माझ्या हातून घडला याबद्दल आपण मला माफी करावी. ('टिळकमहाराज की जय!') दुसरी गोष्ट अशी कीं, आपली पूर्वी निराशा झाली असतांहि आपलें स्वराज्याबद्दलचें प्रेम व कळकळ हीं कायम ठेऊन आपण जो माझा गौरव केलात त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. तहशिलीच्या गांवांत एवढा मोठा समुदाय स्वराज्यावरील व्याख्यान ऐकण्यासाठीं जमावा ही खरोखर आनंदाची गोष्ट होय. आतांच येथें मोफत वाचनालयाचा दगड बसविण्यांत आला. या लहानशा गांवीं मोफत वाचनालयाला २।४ हजार रुपयांची देणगी देणारे लोक आहेत हीहि गोष्ट मोठ्या आनंदाचीच आहे. असे ज्ञानामृत पाजणारे लोक जितके अधिक निघतील तितकें देशाचें अधिक हित होईल. मी देणगी देणाऱ्या सद्गृहस्थांचें अभिनंदन करतों व हें मोफत वाचनालय भरभराटीला येवो व त्यापासून लोकांना अधिकाधिक ज्ञान लाभो अशी मी परमेश्वराजवळ प्रार्थना करतों. (टाळ्या.) ज्ञान म्हणजे काय याची आजपर्यंत पुष्कळ भवति-न-भवति झाली. नुस्तें पाटीवर लिहितां येणें याला ज्ञान ह्मणत नाहींत. जे लोक लाखों रुपयांचा व्यवहार चालवितात त्यांना पाटीवर लिहितां येत नसलें ह्मणून काय मूर्ख ह्मणणार? हल्लींच्या काळीं यंत्रेंसुद्धां बोलूं लागलीं आहेत म्हणून त्यांना विद्वान् म्हणणार का? छापखान्यांत ग्रंथ निर्माण होतात म्हणून छापखाना ज्ञानी झाला? देशाची स्थिति इतकी वाईट कां झाली, याचीं कारणें शोधून काढून तिचा प्रतिकार करण्याचें व ती सुधारण्याचें जें ज्ञान त्याला ज्ञान असें ह्मणतात. एकादा माणूस जरी फटाफट वेद ह्मणत असला तरी त्याला कोणीहि ज्ञानी म्हणत नाहीं. देशाबद्दल ज्याला सारखी तळमळ लागून राहिली असेल तोच खरा ज्ञानी होय. (टाळ्या.) गीतेमध्येंसुद्धां जो माणूस सर्वभूतांना आत्मवत् मानील तोच खरा ज्ञानी असें ह्मटलें आहे. अशा तऱ्हेचें ज्ञान या वाचनालयांत मिळेल अशी मला आशा आहे. आज देशाची स्थिति काय झाली आहे ती लक्षांत आणा. देश सर्वतोपरी खालावलेला असून,

तुम्हींच तुमच्या घरांत परक्यांसारखे झालां आहांत. आमच्या हातांत देशाच्या कारभाराचें काय राहिलें आहे? घरच्या मालकाला कैदेंत टाकून दुसऱ्यानें देशाचा कारभार पहावा अशी आमची अवस्था झाली आहे. तुम्ही कर तेवढे द्यावे पण कायदे करण्यापासून तों चोऱ्या कशा बंद कराव्या येथपर्यंत सर्व अधिकार या नोकरांच्या हातीं! आज देशांतला सर्व व्यापार, शौर्य, कर्तबगारी हीं सारीं इंग्रजांकडे गेलीं आहेत! व्यापार बुडाला, विद्या बुडाली, क्षत्रियांचा वर्गहि बुडाला! तुमच्या मुलांनीं कोठें जावें, कोठें न जावें हेंहि तुमच्या हातांत राहिलें नाहीं! मग आतां तुमच्या हातची सत्ता जायची—जायची ती काय राहिली? हिंदु असो, मुसलमान असो, पार्शी असो, सर्वांची हिंमत—सडकेवरील खडे ज्याप्रमाणें रूळानें दडपले जातात तशी—सरकारी रूळाखालीं चिरडून गेली आहे. जें काय सगळें करायचें तें या कमिशनर—कलेक्टरांनीं! तुरुंगाबाहेर ठेऊन कैद्यां-प्रमाणें कसें वागवावयाचें ही हल्लींची राज्यपद्धति आहे. जे लोक लक्षा-वधि रुपयांचा व्यवहार सुरेख करतात त्यांना गांवची व्यवस्था पहायला येऊं नये हें कोठचें तर्कशास्त्र आणि हा कोठला शहाणपणा? या स्थितीं-तून बाहेर कसें पडावें हा मार्ग सुचत नाहीं, हालचाल करावी तर सरका-रचा रोष होतो, बोलावें तर राजद्रोह होतो, अशी चोहोंकडून आट-ल्यासारखी स्थिति झाली आहे. मग या राज्यकर्त्यांनीं काय कांहींच चांगलें केलें नाहीं? होय, केलें; आगगाड्या केल्या, तारायंत्रें केलीं. ही सुधारणा झाली पण आमचें स्वातंत्र्य कितीसें ठेवलें? सर्व देशाला एक-प्रकारें कैदेंत कोण ठेवतो? सरकार. पण सरकार म्हणजे काय हे गव्हर्नर आणि कमिशनर का? ज्यांना तुम्ही सरकार म्हणतां ते नोकर आहेत-- सरकार नव्हे. खरें सरकार विलायतेंत आहे. त्या सरकारास म्हणजे बादशहांस व पार्लमेंटास असें सांगायचें आहे कीं, या नोकरांच्या हातची सत्ता काढून ती आमच्या हातीं द्या. आह्मी बादशहांची प्रजा झालों ह्मणून या नोकरांचे कैदी व्हावें हा न्याय कुठला? (टाळ्या.) या नोकरांचें राज्य प्रजेला सुखदायक नाहीं हें आज बादशहांच्या लक्षांत आलें आहे. आज बादशहांना शिपाई पाहिजेत. पण जो शिपाई

होणार तो आज रडतो बिचारा ! या नोकरांनीं दोन तीन पिढ्या लोकांना 'शेतकी उत्तम' म्हणून शिकविलें, त्यांचीं हत्यारेंहि काढून घेतलीं, मग तेच शेतकरी आज एकदम शिपाई होणार कसे ? खची केलेला रोपा एकदम थोडाच वाढणार ? ३० कोटी प्रजेच्या बादशहाला आज अमेरिकेजवळ माणसांकरितां भीक मागायची पाळी आली, ही बादशहांची मानहानी काय प्रजेनें केली ? नाहीं. हा बादशहांचा अपमान या नोकरांनीं केला आहे. पण हेच नोकर उलट आम्हांला म्हणतात कीं ' लोक राजद्रोही. ' आह्मीं राजद्रोही नाहींच पण हे नोकर मात्र राजद्रोही आहेत, इतकेंच नव्हे तर साम्राज्यद्रोही आहेत. ( टाळ्या. ) हा साम्राज्यावर जो मानहानीचा प्रसंग आला तो या नोकरांच्या जुलमाचें फळ आहे. लोकांना साम्राज्याला मदत करण्याची इच्छा आहे, पण आतां त्यांच्याजवळ राहिलें आहे काय ? प्रार्थना ! पण ही प्रार्थना पाहून इतर राष्ट्रांतले लोक विचारतील कीं ' कांहो, तुह्मांला देवानें चांगले हातपाय दिले आहेत, मग ही नुस्ती प्रार्थना कां करतां ? ' होय, देवानें हातपाय दिले आहेत खरे, पण या नोकरांनीं ते लुले केले ना ? हे नोकर वाईट आहेत असें मुळींच नाहीं. नोकर चांगले आहेत, पण ते जे आज मालक बनले आहेत ते नोकर झाले पाहिजेत. ते नोकर झाले, त्यांनीं आमच्या पंचांचें ऐकलें कीं आमचें स्वराज्य झालें ! आज तुमच्या मुलांना शाळेला कुलूप लावून कोंडून ठेवलें असेल, पण ही सत्ता जर गांवकऱ्यांच्या हातीं असती तर तुम्ही आपल्या मुलांना बरोबर आणलें असतें ! सत्ता हातीं येईल तर तुमची हांहां म्हणतां भरभराट होईल. ज्याच्या हातीं सत्ता आहे, त्यालाच खरें सुख आहे. आम्ही सुखी झालों, कर्ते झालों, तर त्यांत देशाचें कल्याण साधून साम्राज्याचेंहि कल्याण होईल. म्हणून जरा नेटाचा उद्योग करा म्हणजे स्वराज्यप्राप्ति झाल्याशिवाय खास राहणार नाहीं. " ( टाळ्यांचा गजर. ) अशा आशयाचें अस्खलित भाषण संपल्यावर रा. केळकर म्हणाले:—" हिंदुधर्माचा नियम असा आहे कीं, भोजन झालें म्हणजे ' अन्नदाता सुखी भव ' असें म्हणावयाचें. आतां ज्ञानामृताचें येथें भोजन केलेंच आहे तेव्हां ज्ञानदाता सुखीभव ' असें

आम्ही म्हटलें पाहिजे. लोकमान्यांनीं येथें येण्याचे जे कष्ट केले त्याबद्दल आपण त्यांचें उतराई कसें व्हावें तेंच मला समजत नाहीं. आमची आतां परमेश्वराजवळ प्रार्थना इतकीच आहे कीं, लोकमान्यांचा विलायतचा प्रवास सुखकर होवो ! " ( टाळ्या. ) नंतर त्यांनीं १४०० रुपये रोख व ६४ तहाहयात सभासद झाल्याचें जाहीर केलें, व सभासदांचीं नांवें वाचून दाखविलीं. नंतर रा. त्रिंबकराव गुर्जर म्हणाले:—" कुंतलापूर म्हणजे काटोल येथें आज श्रीकृष्णाची सगुण मूर्तिच अवतरली आहे. " शेवटीं अध्यक्ष म्हणाले:—" अजूनहि जर तुम्ही जागृत झालां नसाल तर तुम्हांला मनुष्यकोटींत घातल्याबद्दल परमेश्वरालाहि पश्चात्ताप होईल ! " जयजयकारांत सभेचें काम संपल्यावर ९॥ वाजतां लोकमान्यांनीं नागपूर गांठण्यासाठीं काटोल सोडलें.

---

## ( प्रकरण १४ वें )

# पुनश्च नागपूर !

काटोलाहून लोकमान्य नागपुरास येण्यास निघाले ते वाटेंत पानसुपाऱ्यांचा स्वीकार करीत दुपारीं १२ वाजतां तडक स्टेशनवर गेले. वाटेंत ढवळापूर येथें पानसुपारी घेऊन मोहप्यास आले. तेथें रस्त्यानजीक छोटासा मंडप उभारून स्वागताची उत्कृष्ट व्यवस्था केली होती. लोकसमुदायहि हजारावर होता. प्रथम श्री. गणपतराव देशमुख यांची अध्यक्षस्थानीं योजना झाल्यावर डॉ. यादवराव नाईक यांनीं मानपत्र वाचून दाखविलें.

### मानपत्र

हे जगविख्यात नरश्रेष्ठ, नरशिरोमणि गीताधारी बलवंता, आपण या हिंदभूमीकरितां आपला देह झिजवून स्वार्थाला तिलांजली देऊन आम्हांला ऋणी करून सोडलें, आपण आमचे करितां कष्ट सोसून कारा-

गृहवास सहन करून सर्व जगाला थक्क करून सोडणारें असें ज्ञानभांडार उपलब्ध केलें. आपण आमचे धर्मगुरु आहांत, कर्मगुरु आहांत, राष्ट्रगुरु आहांत; आपलें औदार्य, आपलें शौर्य, आपलें ज्ञान, आपलें कर्म, भारत-भूमीच्या पुराणप्रसिद्ध कुलाला शोभणारें असून श्रीकृष्णासारखे अवतारी आहांत असें जगाच्या निदर्शनास आणलें; या सर्वांबद्दल आम्ही आपली कृतज्ञता व्यक्त करणें हें आमचें कर्तव्य समजून या आपल्या स्वातन्त्र्य-देवीच्या द्रव्यानिर्धीत अल्पशी मदत रु. १००१ अर्पण करितों ' ती पत्रं पुष्पं फलं तोयं ' या न्यायानें गोड करून घ्याल अशी पूर्ण आशा आहे.

आपण अंगीकृत केलेल्या लोकसेवेचे कार्याला म्हणजे हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळाविण्याला पूर्ण यश मिळो अशी जगन्नियंत्या परमेश्वराला प्रार्थना करून हें मानपत्र आपले चरणारविंदीं मोहपेकरांतर्फे श्रीमंत बाबासाहेब देशमुख मालगुजार अध्यक्ष स्वागतमंडळ यांचे हस्तें अर्पण करितों याचा आपण स्वीकार करावा अशी नम्र विनंति आहे.

आपले दासानुदास,

अध्यक्ष—गणपतराव बाबासाहेब देशमुख मालगुजार.

सेक्रेटरी—यादव कृष्ण नाईक एल्. एम्. एन्ड्. एस्., (नॅशनल)

मेंबर्स.

रा० नारायणराव देशमुख किल्लेवाले.

रा. मुकुंदराव बालाजी देशमुख मालगुजार.

रा. राजाराम बापू किल्लोर मालगुजार.

रा. दिनकर कृष्णाजी टेकाडे.

रा. गोविंदराव तिवसकार देशमुख.

नंतर

लोकमान्य म्हणाले:—

" देशमुखसाहेब व इतर सभ्यगृहस्थहो, मोहप्यासारख्या बाजूला पड-लेल्या गांवीं स्वराज्याबद्दल इतकी कळकळ दिसून येईल असें मला वाटलें नव्हतें. आमचा दौरा हा खेडेगांवांत स्वराज्याची चळवळ पसरविण्याकरितांच

आहे. त्यांतल्या त्यांत आनंदाची गोष्ट ही आहे कीं, येथें जमलेल्या हजार माणसांनीं हे हजार रुपये दिले आहेत. हे रुपये जर एका माणसानें दिले असते तर त्यांत मला इतका आनंद झाला नसता ! एकाच्या हातांत हजार तरवारी असण्यापेक्षां हजार माणसांच्या हातांत हजार तरवारी दिल्या तरच त्या जास्त कार्यक्षम होत असतात ! ! स्वराज्य ही चीज कांहीं नवी नाहीं. तें कायदेशीर उपायांनींच मिळवावयाचें आहे. हें स्वराज्य आमच्या पूर्वजांनीं मिळविलें आहे—हें स्वराज्य आमच्या पूर्वजांनीं उपभोगलें आहे, आम्हीहि त्याला लायक आहों. आतां फक्त तुमच्या प्रयत्नांचीच कायती आवश्यकता उरली आहे. " शेवटीं छोट्या गीताबाईनें कोमल आवाजांत पद्य म्हटल्यावर लोकमान्य डोरली गांवीं गेले. तेथेंहि स्वागताची थाटदार व्यवस्था केली असून संत्र्यांच्या कमानींनीं समारंभास अपूर्व शोभा आणली होती. श्री. भगवंतराव पाटील यांनीं लोकमान्यांस १५१ रु. ची थैली अर्पण केल्यावर लोकमान्य निघाले ते मोहपा—सोनरी—मोहगांव—कोहळे वगैरे गांवच्या मंडळीनें एका नाक्यावर पानसुपारीचा समारंभ केला होता तेथें गेले. येथें जमलेला श्रोतृसमाज दोन हजारांवर होता. प्रारंभीं श्री. आप्पासाहेब हळदे यांनीं स्वागत केल्यावर

## लोकमान्य म्हणाले:—

" स्वराज्याची चळवळ यशस्वी व्हावयाची असेल तर ती खेडोखेडीं पसरली पाहिजे. स्वराज्याची चळवळ ही कोणा एकाद्या व्यक्तीच्या फायद्याकरितां नाहीं. ही चळवळ सर्व देशाची आहे. आज स्वराज्य नसल्यानें गांवांतील पाटील, कुळकर्णी, मुत्सद्दी वगैरेंचीं मोठमोठीं घराणीं पराक्रमहीन होऊन पडलीं आहेत. सरकार नेमील त्या अंमलदारांनीं कारभार पहावा व देशांतील शहाण्या लोकांनींसुद्धां स्वस्थ बसून काय होतें तें पहावें अशा तऱ्हेची हल्लींची राज्यपद्धति आहे. हल्लीं जे नोकर शिरजोर झाले आहेत, त्यांना खरे नोकर करणें व प्रजेच्या हातीं कारभार करण्याची सत्ता देणें याचें नांव स्वराज्य. आतां स्वराज्य मागण्यांत राजद्रोह उरलेला नाहीं. स्वराज्याच्या मागणींत जातिभेद, धर्मभेद हेहि येत नाहींत.

ही मागणी सर्व राष्ट्रानें एकदिलानें मागावयाची आहे. कोणी भुलथापी दिल्या तर त्यांना भीक घालूं नका. फसूं नका. या कार्यास बलानें, धर्मानें, पैशानें मदत करा अशी विनंति करण्याकरितां मीं आलों आहें. मेहेरबानी करा व ही विनंति लक्षांत ठेवा." भाषणानंतर लोकमान्यांस ५०० रुपयांची थैली अर्पण करण्यांत आली व तेथून लोकमान्य धापेवाड्यास गेले; तेथें कविवर आनंदराव टेकाडे यांनीं स्वागतपूर्वक १०१ रुपयांची थैली अर्पण केली. त्यानंतर कलमेश्वर मुक्कामीं लोकमान्यांचें स्वागत फार थाटाचें झालें. स्वागतार्थ सुंदर मंडप उभारला असून ध्वजाकमानींनीं समारंभास अपूर्व शोभा आणिली होती. श्रोतृसमुदाय ३-४हजार होता. प्रथम लोकमान्य म्हणाले:—" नागोजीराव देशमुख, माधवराव व इतर सभ्य गृहस्थहो, वेळ थोडा असतांहि आपण माझें इतक्या उत्साहानें स्वागत केलेंत याबद्दल मी आपला फार आभारी आहें. हा जो उत्साह दिसत आहे तो माझ्या करितां नसून आपल्या स्वराज्यप्रेमाचें तें द्योतक होय. माझ्याकरितां आपण इतका उत्साह दाखवावा असें मी काय केलें आहे? असो. पुर्वी जी चळवळ राजद्रोही समजली जात असे तीच आज कायदेशीर ठरली असून तिला गव्हर्नरसाहेब, मॉटेग्युसाहेब, व खुद्द पार्लमेंट यांनींहि जाहीरनामा काढून मान्यता दिली आहे. स्वराज्य म्हणजे काय? हल्लीं जो कारभार नोकर चालवितात, तोच कारभार त्याच नोकरांनीं चालविला तरी हरकत नाहीं पण तो त्यांनीं प्रजेच्या हुकमतीनें चालवावा म्हणजे स्वराज्य झालें. मग यांत काय राजद्रोह झाला? या मागणींत राजद्रोह नाहीं इतकेंच नव्हे तर स्वराज्य दिल्यानें प्रजा संतुष्ट होईल व प्रजेचा संतोष तीच साम्राज्याची बळकटी असें खुद्द राणी सरकारनें आपल्या जाहीरनाम्यांत म्हटलें आहे. काल अनुकूल आहे यावेळीं उद्योग कराल तर परमेश्वर यश दिल्याशिवाय खात्रीनें राहणार नाहीं." (टाळ्या.) नंतर प्रेमानें गहिंवरून श्री. नागोजीराव पाटील म्हणाले:—" माझ्या बापांनीं ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्या नीट ध्यानांत ठेवा. अशी वेळ पुन्हां येणार नाहीं. माझा बाप चार तपें तपश्चर्या करीत आहे. तुम्ही एकमय झालांत तर स्वराज्य हें मिळालेंच पाहिजे. माझा

बाप विलायतेला जाते. आतां परमेश्वराला प्रार्थना आहे कीं, आम्हांला स्वराज्य दे व आम्हांस पूर्वजांचे दिवस येऊं देत! माझा बाप टिळक आणि माझा बाप गणेश खापर्डे सातासमुद्रांपलीकडे विलायतेस जाते, त्यांना परमेश्वरा, संभाळ. ते दोघे मित्र आहेत. माझा बाप जाऊन स्वराज्य आणील आणि आपण लवकरच स्वराज्य करूं." (टाळ्या.) नंतर ३४९ रुपयांची थैली अर्पण करण्यांत आल्यावर श्री. बळीराम नारायण पाटील यांनीं १२१ रुपये दिले व समारंभ जयघोषांत आटोपला.

लोकमान्य कलमेश्वराहून निघाले ते १२ वाजल्यानंतर नागपुरस्टेशनवर गेले. परस्पर स्टेशनवर जाण्याचें कारण असें कीं, जर दिल्लीहून कमिशनर साहेबांची परवानगी आली असली तर तसेंच १॥ च्या मेलला निघतां यावें. स्टेशनवर लोकमान्यांचें सामानसुमानसुद्धां येऊन पडलें होतें! पण तारेचें उत्तरच आलें नसल्यानें लोकमान्य परत श्री. दादासाहेब उधोर्जींच्या बंगल्यावर गेले. दोनप्रहरीं विश्रांति घेतल्यावर रात्रीं ९ वाजतां लोकमान्य भंडाऱ्यांस मोटारनें गेले. बरोबर बॅ. मोरोपंत अभ्यंकर व रा. नारायणराव वैद्य होते. लोकमान्य याच वेळीं येणार ही बातमी भंडाऱ्याच्या लोकांना नसल्यानें लोकमान्यांचें आगमन अकस्मात् होतांच भंडाऱ्याच्या लोकांची फार गडबड उडाली. दिल्लीच्या परवानगीच्या घोंटाळ्यानें भंडाऱ्याच्या लोकांची लोकमान्यांच्या दर्शनासंबंधानें बहुतेक निराशाच झाली होती म्हणा ना! लोकमान्यांनीं असें अचानक प्रयाण केलें याचें दुसरें एक कारण असें कीं, मिरवणुकीचा त्रास वांचावा! आणि झालेंहि तसेंच!! कारण लोकमान्यांस सामोरें कोणीच आलें नव्हतें इतकेंच काय, पण त्यांनाच श्री. गोखले वकिलांच्या घराचा तलास करीत उतरण्याची जागा गांठावी लागली. गोखले वकिलांच्या घरासमोर मोटार उभी राहतांच घरांतील मंडळी कुतूहलानें बाहेर आली आणि पाहतात तों मोटारींत लोकमान्यांची स्वारी!

इकडे श्री. गोखले वकिलांची जशी धांदल उडाली तशीच गडबड गांवांतहि उडाली. रात्रीं ११ वाजण्याची वेळ पण लोकमान्यांच्या आगमनाची वार्ता सर्व शहरभर हां हां म्हणतां पसरली, व जोतो

गोखल्यांच्या घराकडे धांव घेऊं लागला. आज बुधवार असल्यानें गांवांत नाटकें चालू होतीं. ही बातमी थिएटराकडे जाण्यासहि अर्थात् वेळ लागला नाहीं—थिएटरांत तिलकागमनाची बातमी येतांच नाटक पहाण्यांत गुंग झालेल्या प्रेक्षकगणानें नाटक सोडलें व तिलकदर्शनार्थ गोखल्यांच्या घराकडे धांव घेतली. रंगभूमीवर सूत्रधार नटीला बाहेर येण्यास प्रार्थना करीत होता, पण त्यांच्या त्या प्रेमचेष्टा पाहण्यास थिएटरांत कोण होतें ? बरोबरच आहे, नाटकें तीं काय ? रोज पहायला मिळतील पण तिलकदर्शन मात्र फार दुर्मिळ होय ! ता. २१ रोजीं सकाळीं ८ वाजतां जिल्हापरिषदेच्या मंडपांत लोकमान्यांचें स्वराज्यावर व्याख्यान झालें. श्रोतृसमुदाय ७–८ हजारांवर होता. भंडाऱ्याच्या लोकांनीं ४५०० रुपयांची थैली लोकमान्यांच्या चरणीं डेप्युटेशनफंडाप्रीत्यर्थ अर्पण केली.

लोकमान्य भंडाऱ्याहून दुपारींच नागपुरास परत आले. पण दिल्लीची तार आली नव्हती. आणि आतां येऊन तरी तिचा काय उपयोग होणार? कारण ता. २१ हीच अगदीं शेवटची निघण्याची मुदत होती. दिल्लीला २३ तारखेला एरव्हीं पोंचणेंच शक्य नव्हतें. सायंकाळीं व्हाइसरॉय साहेबांची तार येऊन पडली. त्यांत त्यांनीं असें स्पष्ट उत्तर दिलें होतें कीं, ‘ कमिशनर साहेबांच्या कामांत आह्मांस पडतां येत नाहीं ! ’ नंतर त्या दिवशीं पूर्ण विश्रांति घेऊन लोकमान्य ता. २२ रोजीं दुपारीं १॥ वाजण्याच्या मेलनें दौरा आटोपून परत निघाले. निघतांना नागपुरांत श्री. बाघांची पानसुपारी झाली. वाटेंत शिंदी, वर्धा, पुलगांव येथेंहि लोकांनीं तिलकदर्शन घेऊन पानसुपाऱ्यांचे थाट उडवून दिलेच ! लोकमान्यांची गाडी धामणगांव येथें पोंचण्यास सायंकाळचे ४॥ झाले.

( प्रकरण १५ वें )

# जिव्हाळ्याचा निरोप !

( धामणगांव. )

लोकमान्य ता. २२ रोजीं दुपारीं नागपुराहून मुंबई मेलनें निघाले ते वाटेंतील शिंदी, वर्धा, पुलगांव येथील पानसुपाऱ्यांचा स्वीकार करीत करीत सायंकाळीं ४॥ वाजतां धामणगांवास येऊन पोंचले. स्टेशनवर श्री. शेट टिकमदास, रतनसावजी, श्री. बाबासाहेब खापर्डे, दे. भ. वामनराव जोशी, श्री. रामेकर वकील वगैरे मंडळींनीं लोकमान्य व इतर पाहुणेमंडळीचें सप्रेम स्वागत केलें. नंतर लोकमान्यांस मिरवणूक काढून श्री. माटे यांच्या जिनांत थाटानें वाजतगाजत नेण्यांत आल्यावर लोकमान्यांनीं थोडासा आराम केला. सायंकाळीं सात वाजतां शेट कादर-भाईच्या कंपाउंडांत व्याख्यानसमारंभ झाला. व्याख्यानासाठीं विस्तृत मैदान ध्वजापताकाकमानींनीं शृंगारलें असून श्रोतृसमुदाय तीन हजार होता. प्रारंभीं नामदेवबुवांचे पट्टशिष्य श्री. नथुराम यांनीं गायकी तान-बाजींत ' वंदेमातरम् ' गीत म्हटल्यावर श्री. हरकरे वकील यांनीं लोक-मान्यांचें उमरावती जिल्हा, चांदूर तालुका व धामणगांवतर्फे स्वागत केल्या-वर विधिपूर्वक अंजनासिंगीचे देशभक्त श्री. शेट टिकमदास यांची अध्य-क्षस्थानीं योजना झाली. नंतर लोकमान्य टाळ्यांचा गजर शांत झाल्यावर म्हणाले:—"अध्यक्षसाहेब आणि सभ्यगृहस्थहो, १०।१५ दिवसांपूर्वीं मी जेव्हां नागपुराकडे गेलों तेव्हां मला आपल्या अध्यक्षांनीं येथें येण्याबद्दल निमंत्रण दिलें त्याप्रमाणें मी येथें आल्यावर आपण आज माझा जो सत्कार केला त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. मी ज्या कामाकरितां या प्रांतांत हिंडत होतों तें काम स्वराज्याचें आहे. स्वराज्य म्हणजे काय, आजचा प्रसंग काय आहे वगैरे गोष्टींचा मी आतां थोडक्यांत ऊहापोह करणार आहें. वेळ अत्यंत आणीबाणीची आहे. कांहीं गैरसमज असेल

तर दूर करून घेतला पाहिजे. आजपर्यंत अधिकारी रागावतील अशी भीति वाटत असे. व्यापार बरा कीं आपण बरे अशी आपली आतांपावेतों बुद्धि होती पण ती आतां पालटली आहे ही

आनंदाची गोष्ट

होय. हें गांव व्यापारी आहे. स्वराज्याचें कामहि विशेषतः व्यापारी व शेतकरी यांचें आहे. ही चळवळ नोकऱ्या वाढविण्याकरितां चालू नाहीं. उलट स्वराज्यांत पगार कमी मिळण्याचाच संभव आहे. ( हंशा. ) पुढें कलेक्टरला २५०० रु. पगार कोण देतो ? अशी वस्तुस्थिति आहे. इसाबनीतींत एक गोष्ट आहे. एक सिंह होता आणि चार बैल होते. हे बैल जोंपर्यंत जुटीनें रहात होते तोंपर्यंत त्या सिंहाला त्यांजवर हल्ला करतां येईना, म्हणून त्या सिंहानें एकेक बैल युक्तीनें फोडला व मग त्यांस खाऊन टाकलें. तशीच हल्लींची राजनीति आहे. ब्राह्मण–क्षत्रिय–वैश्य–शूद्र हे चार बैल समजा. त्यांच्यामध्यें फूट पाडावयाची व व्यापाऱ्यांना सांगावयाचें ‘ तुह्मी व्यापारी, तुम्हांला राजकारणाशीं काय करावयाचें आहे ? शेतकऱ्यांना भीति घालावयाची कीं, राजकारणांत पडाल तर जमीन जप्त होईल. इजारदाराला भीति घालावयाची—तुझ्या इनामाला धोका येईल. सावकाराला सांगावयाचें तुझा इनकमटॅक्स वाढेल. मिळून काय ? कोणाला कांहीं तरी भीति दाखवून लोकांमध्यें एकजूट म्हणून होऊं द्यावयाची नाहीं हें यांचें धोरण ! देशांतले चारी वर्ण जर एकजुटीनें राहतील तरच देशाला सुख मिळेल. मी तोंडाची वाफ रिकामी दवडून काय देशाचा व्यापार वाढणार, कीं उद्योगधंदे उत्पन्न होणार का शेतकीची सुधारणा होणार ? हीं कामें नुसत्या बोलण्यानें कधींहि सिद्ध होत नाहींत. मग तुम्ही म्हणाल कीं बोलतों कशाला ? तर तुम्हांला देशाच्या स्थितीचा बोध व्हावा म्हणून. मी येथें जो आलों तो तुम्हांला या सर्व गोष्टी समजावून सांगण्याकरितां आलों आहें; तें समजून घ्या. तुम्हांला हें समजलें म्हणजे माझी खात्री आहे कीं, तुम्ही आपण होऊन या कामांत पडाल. तुम्ही व्यापार करतां तेव्हां तुम्हांला सारा नफातोटा कळतो. तुम्ही एवढा मोठा व्यापार करतां तेव्हां तुम्हांला बुद्धि कमी आहे असें मुळींच नाहीं.

लक्षावधि रुपयांचा तुम्ही व्यापार करतां व त्यांत फायदाहि मिळवतां; हेंच व्यापारी धोरण राज्यकारभारालाहि लागू आहे. तुमची या अधिकाऱ्यांनीं विनाकारण गैरसमजूत करून दिली आहे इतकेंच. तुम्ही

## चार भिंतींनीं मर्यादित

एवढेंच आपलें दुकान समजतां व आह्मीं सर्व देश हें आमचें दुकान मानतों. ( टाळ्या. ) हें दुकान आमचें म्हणजे देशांतल्या सर्व लोकांचें आहे. या दुकानचा व्यवहार आम्हीं पहाणार. नफानुकसान झालें तर आमचें होईल. हल्लीं या दुकानचा व्यवहार कसा काय चालला आहे याचें तुम्ही कधीं परीक्षण केलें आहे का ? तुमच्याजवळ कर्तबगारी आहे, अक्कल आहे, व पैसाहि आहे. तुम्ही वाटेल तें करूं शकाल. पण या नोकरांनीं आपल्या हातीं सत्ता अशीच अविच्छिन्न चालावी म्हणून तुमची अशी गैरसमजूत करून दिली आहे. हिंदुस्थानच्या दुकानचा पैसा कोणाचा ? तुमचा, मग तो कोठें खर्च होतो ? शिक्षणाकडे, लष्कराकडे, किती पैसा जातो हें तुम्ही पहातां का ? दारासीं शिपाई आला म्हणजे त्याला मुकाट्यानें इनकमटॅक्स देतां व स्वस्थ बसतां. तुमच्यासाठीं साहेब सारें करीत असतो. साहेब काय करतो हें कांहीं तुम्ही पाहात नाहीं. या साहेबासारखा जर तुमचा मुनीम तुमच्या दुकानांत वागूं लागला तर तें तुम्हांला पसंत पडेल ? तुह्मी मुनिमाच्या हातीं अशी व्यवस्था कधीं तरी सोंपवाल ? मुनीम जर मालकाची परवा न करतां दुकानांत वागूं लागला तर तें तुम्हांला क्षणभरहि सहन होईल असें मला वाटत नाहीं. अशा शिरजोर मुनिमाला तुम्ही काढून टाकाल, नाहींतर त्याच्याविरुद्ध कोर्टांत फिर्याद कराल.

## मुनीम तो मुनीम

त्यानें मालकाचें ऐकलेंच पाहिजे. मुनीम जर फार शहाणपणा दाखवूं लागला तर तुम्ही त्याला सांगाल कीं, " तूं शहाणा असशील पण माझा नोकर आहेस. माझ्या मालकीखालीं जर तुला रहावयाचें नसेल तर शहाणपण बरोबर घेऊन जा व दुसऱ्याची नोकरी कर. मला असला फार शहाणा नोकर नको, असें तुम्ही सांगाल इतकेंच नव्हे तर हें तुम्ही नेहमीं

नोकराना सांगत असतां. मुनीम जर यजमानाच्या डोक्यावर बसूं लागला तर त्याला झुगारून देणें यजमानाला भाग पडतें. सर्व हिंदुस्थान हें तुमचें मोठें दुकान समजा. ह्याचें वार्षिक उत्पन्न थोडें थोडकें नाहीं. १३० कोट रुपये आहे. कित्येक वेळां खर्च अधिक होतो व कर्जहि काढावें लागतें. ही व्यवस्था तुमच्या हातीं नाहीं. पांचपांच दहादहा हजार रुपये पगार देऊन कमिशनर, गव्हर्नर यांना नोकर ठेवावयाचें आणि शेवटीं केव्हां केव्हां तोटा हा आहेच. बरें इतर बाजूंनीं तरी कांहीं फायदा आहे ? कापूस आह्मी पिकवावयाचा व त्याचे गठ्ठे बांधून त्यापैकीं बहुतेक विलायतेस पाठवावयाचे हा कापडाचा व्यापार कोणी बुडवला ? पूर्वी आमचे कोष्टी वस्त्रें विणीत आणि तीं तुम्हीच व्यापारी लोक विकीत असा. पण आज सारें कापड विलायतेहून येतें .

## असें कां झालें ?

काय तुमचे कोष्टी मेले ? तुमच्या कोष्ट्यांचा व्यापार बुडाला व विलायतेंतील कोष्ट्यांचें पोट भरूं लागलें. तुमचे कोष्टी कां उपाशी मेले ? हें काय तुम्ही केलें ? हें ह्या नोकरांनीं केलें ! कापूस येथून जातो व कापड तिकडून येतें. मधली मलई कोण खातो ? पूर्वीं तुम्ही मुंबईपर्यंत तरी कापूस नेत असा पण आज राली ब्रदर्सचा एजंट येथपर्यंत येऊन थडकला आहे. एजंट येतो आणि शेतावरच कापूस खरेदी करतो. धान्याची तीच गत. हें सारें गेल्या पांचपंचवीस वर्षांत झालें. तुमचा सारा व्यापार आज गुंडाळत आला आहे. तुमच्या हातांतून गेलें किती ह्याचा कांहीं विचार करा. हें पुढें असेंच जर चाललें तर सर्व कांहीं व्यापार साहेब करतील आणि तुमचा मारवाडीवर्गहि बुडेल. पाणी तापत ठेवलें तें आतांच निम्में आटून गेलें आहे. व सर्व पाणी केव्हां आटेल ह्याची वाट पाहात बसलां आहांत. याला काय शहाणपणा ह्मणावयाचें कीं, काय ह्मणावयाचें ? जी व्यापाराची अवस्था तीच शौर्याची. तुमच्या जवळ हत्यार असलें तर सरकार तो गुन्हा ठरवितें. त्याला सबब ही कीं, तुम्ही खून आणि मारामाऱ्या कराल. इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांत हत्यारांचा कायदा नाहीं मग काय तेथें

### रोज खून होतात ?

येथें मोंगलाईत अजून हत्यारांचा कायदा नाहीं. पण या अधिकाऱ्यांनीं कांहीं तरी सबबी सांगाव्या आणि तुह्मांला त्याची भुरळ पाडावी, इतके तुम्ही दुधखुळे झालां आहां. गांवांत वाघ आला तर पोलीस सुपरिंटेंडेंटला कळवावयाचें. आणि साहेबाला वेळ होईल तेव्हां तो येणार. तोंपर्यंत इकडे त्या वाघानें वाटेल तें करावें. वाघ निघून गेला तरी आमच्यावरच राग, ह्मणे तुम्ही वेळेवर कां कळविलें नाहीं ? असा सारा उलटा न्याय झाला आहे. या राज्याचें धोरण असें कीं, होईल तितका वसूल अधिक करावयाचा. व्यापार जितका विलायतेला जाईल तितका जाऊं द्यावयाचा. गांवच्या पूर्वीच्या व्यवस्था होत्या त्या मोडल्या. अमुक झाड तोडावयाचें कीं नाहीं हें जंगलखात्यानें ठरवावयाचें. गांवांत दारूचें दुकान असावें कीं नाहीं हेंसुद्धां त्यांनींच ठरवावयाचें, तुमच्या पोरांनीं काय शिकावें हेंसुद्धां ते ठरवणार. पोरें काय शिकतात याची तुम्ही कधीं चौकशी केली आहे ? चोहोंबाजूंनीं देशाचा ऱ्हास होत चालला आहे. जो तो स्वतांपुरता विचार करितो; देशाचा विचार कोणीच करीत नाहीं, ही स्थिति वाईट आहे. अशा वेळीं देश बुडेल हें ध्यानांत ठेवा. सर्व सूत्रें या मुनिमांनीं आपल्या हातीं ठेविलीं आहेत. तुम्ही सर्व गाडीला जुंपलेल्या बैलांप्रमाणें असून वेसण यांच्या हातीं आहे. ते देतील तें पाणी प्या ! आणि सांगतील तेवढें अन्न खा. हो, आगगाड्या केल्या नाहीं ह्मणतो कोण ? पण आगगाड्या म्हणजे काय मोक्ष आहे ? आगगाडी म्हणजे काय एक लोखंडी रस्ता. त्यानें माल जसा देशांत येतो तसा तो बाहेरहि जातो.

### घर धुवून नेण्याकरितां

जर आगगाडी झाली तर ती काय उपयोगाची ? एकंदर देशाचा नफा तर आगगाड्या चांगल्या, हें लक्षांत ठेवा. पहिली गोष्ट अशी कीं, ज्या कमिशनर गव्हर्नरांना तुम्ही सरकार ह्मणतां तें खरोखर सरकार नव्हे. ते नोकर आहेत. खरें सरकार विलायतेस आहे. बादशहांना येथें येतां येत नाहीं म्हणून त्यांनीं या नोकरांना एक कायदा मंजूर करून येथें नेमलें.

'प्रजेचें अकल्याण करा,' असा बादशहांचा यांना हुकूम नाहीं. विलायतेबरोबर येथील प्रजा कर्तबगार व शहाणी करा अशाकरतां यांना नेमलें आहे. पण त्यांनीं लोकांना शहाणें न करितां त्यांच्यांत फूट मात्र उत्पन्न केली. मारवाडी निराळे, गुजराथी निराळे, ब्राह्मण निराळे

## असले भेद

देशांत उत्पन्न केले. एरव्हीं राज्य चांगलें. दंगाधोपा नाहीं; काय ह्मणतात काठीला सोनें बांधून काशीला जावें! मार्ग निर्भय झाला खरा; पण काठीहि गेली आणि सोनेंहि गेलें. (हंशा.) बादशहा आमचा मग ह्या नोकरांना काढलें तर काय बादशहांचें राज्य बुडेल? जे मुनीम माजले आहेत त्यांचें नुकसान होईल, पण त्यांत बादशहांचें नुकसान नाहीं— प्रजेचेंहि नाहीं. दुकानावर ब्राह्मण नोकर असला काय किंवा मारवाडी नोकर असला काय त्यांत मालकाचें काय नुकसान आहे? जो थोडा पगार घेऊन चांगलें काम करील तो चांगला नोकर. पण या नोकरांनीं परटाची घडी चोपूनचापून ठेवावी तसा राज्यकारभार करून देशांत शांतता ठेविली. सर्व लोक सत्त्वहीन झाले. मी कर देणार मग माझ्या देशांत मी बंदिवान काय म्हणून राहीन? प्रजेच्या हातीं सत्ता गेली तर त्यांत राजद्रोह नाहीं पण त्यांत यांचें पोट मात्र कमी होईल.

## नोकरांचीं पोटें

चालविण्याकरितां काय आमच्या बादशहांनीं राज्य चालविलें आहे? आम्हाला हे म्हणतात कीं, हे नोकऱ्यांसाठीं चळवळ करतात. आणि हे कशाला खटपट करतात? यांच्या नोकऱ्या वंशपरंपरा राहाव्या म्हणून! हे नोकर चांगले आहेत, हुषार आहेत. यांना काढा असेंहि कोणाचें म्हणणें नाहीं; पण हुकूम मात्र आमचा पाहिजे. ज्या देवानें ह्यांना नेमलें त्यालाच हा आमचा अर्ज आहे. स्वराज्य मागतों म्हणजे इंग्रजांना घालवून द्यावयाचें नाहीं, रूळहि उपटून टाकावयाचे नाहींत. ही वेळ आहे. आज बादशहांना सैन्याची जरूर पडल्यामुळें त्यांचें आमच्याकडे लक्ष वेधलें आहे. यावेळीं नेट धरला तर यश येईल. ही वेळ फुकट घालवूं

नका, भांडणें भांडण्याचा हा समय नव्हे. एकजुटीनें प्रयत्न कराल तर परमेश्वर तुमचे मनोरथ पूर्ण केल्याशिवाय राहणार नाहीं. ''

लोकमान्यांचें अशा रीतीनें स्फूर्तिदायक भाषण झाल्यावर श्री. बाबासाहेब खापर्डे हे लोकमान्यांस

## वऱ्हाडचा निरोप

देण्यासाठीं बोलावयास उभे राहिले. वऱ्हाडतर्फे लोकमान्यांना निरोप देतांना बाबासाहेबांचा कंठ प्रेमभावानें दाटून आला व नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा खळखळां वाहूं लागल्या. यावेळीं बाबासाहेबांप्रमाणेंच श्रोत्यांच्याहि चित्तवृत्ति इतक्या बावरून गेल्या होत्या कीं, तिलकभक्तांच्या नवनीतसम कोमल अंतःकरणाची गोष्ट तर राहूंद्याच पण तेथें कोणीहि पथ्थराच्या हृदयाचा माणूस असता तरी त्यांच्या कठोर अंतःकरणांतून प्रेमजलाचे झरेच्या झरे झुळूझुळू वाहूं लागले असते, व त्या काव्यपूर्ण मंजुल ध्वनीनें स्वर्गीय आनंदाचें वातावरण निर्माण केलें असतें ! हा स्वर्गीय आनंदमय व आल्हादक देखावा पाहण्याकरितांच कीं काय, विमलयशाच्या शुभतेजाचा शृंगार लेवून सुधांशुदेव नीलनभामध्यें आरोहण करता झाला.

प्रेमश्री बाबासाहेब गद्गदकंठानें लोकमान्यांस प्रेमाचा निरोप देत असतांना त्या मंगलसभास्थानीं प्रेमाचें साम्राज्य कसें दिव्यतेनें चमकलें असेल याची रसिकांच्या प्रतिभेनेंच कल्पना करावी.

## प्रेमाचा उमाळा

दाबून ठेवून धीरगंभीरस्वरानें बाबासाहेब म्हणाले:—' मी आपल्यातर्फे लोकमान्यांना प्रेमाचा निरोप देण्यासाठीं उभा राहिलों खरा; पण माझ्या अंतःकरणांत ज्या वृत्ति उचंबळून आल्या आहेत त्यामुळें मला फारसें बोलतां येईल असें वाटत नाहीं. लो. टिळकांनीं ( टाळ्या ) वऱ्हाडच्या दौऱ्याला गेल्या सात तारखेस आरंभ केला. दौऱ्यावर निघतांना लोकमान्यांनीं आपल्या नाजूक प्रकृतीकडे पाहिलें नाहीं कीं वृद्धापकाळाकडे नजर दिली नाहीं. मधुमेहासारख्या दुर्धर व्याधीनें त्यांच्या शरिराची काय अवस्था केली आहे हें आपण पहातच आहां. ( लोकमान्यांकडे सप्रेम पाहून ) या शरिराची अशी आज स्थिति आहे काय, कीं लोकमान्यांनीं

हा दौरा अंगिकारावा ? दुष्ट रोगांनीं शुष्क करून टाकलेलें हें शरीर लोकमान्यानीं तुमच्या आमच्या सेवेकरितां आजपर्यंत

चंदनाप्रमाणें झिजविलें

आहे. लोकमान्यांनीं देशाची किती क्लेशमय व कष्टाची सेवा जन्मभर केली हें आपणाला माहीतच आहे. ( टाळ्या. ) आपला मार्ग आज जो इतका सुगम झाला आहे त्याचें कारण लोकमान्यांचे कष्टच होत. देश-सेवेच्या कांटेरी व निष्ठूर मार्गावरून चालतांना ( लोकमान्यांच्या स्थिर मूर्तीचें अवलोकन करून ) या आमच्या प्रियतम प्राणाच्या कोमल चरणा-मध्यें कांटे रुतले व त्यामुळेंच आमचा मार्ग आज निष्कंटक झाला आहे. ( प्रेमाचे उसासे ! ) इतके कष्ट सहन केल्यामुळें हें शरीर सुकून गेलें. या शरिराची लोकमान्यांना फिकीर नसली तरी तें शरीर आम्हां हिंदवासीयांना

पृथ्वीच्या मोलाचें

वाटल्यास नवलें काय ? ( टाळ्या ) लोकमान्य प्रथम मलकापुरास आले तेव्हां मीच त्यांचें अभिनंदन केलें होतें. त्यानंतर वऱ्हाड-मध्यप्रांताचा दौरा संपवून ते आतां परत वऱ्हाडच्या बाहेर जात आहेत—यावेळीं वऱ्हा-डतर्फे लोकमान्यांना जिव्हाळ्याचा निरोप देतानां अत्यंत नम्रपणें अशी प्रार्थना करावयाची आहे कीं, ' लोकमान्य ! आह्मां गरीबांवर दुष्काळ महर्गता, अशा सारख्या दुर्धर आपत्ति कोसळल्या असतांना आह्माला जी अल्पस्वल्प सेवा आपल्या पुण्यवान चरणीं सादर करतां आली ती मोठ्या प्रेमानें व अंतःकरणपूर्वक सादर केली आहे. आपल्या बहुमोल श्रमांच्या मानानें ही सेवा अत्यंत कमी आहे, हें आह्मी जाणतों. आह्मी जी सेवा केली त्याच्या शतपटीनें जरी आह्मी जास्त सेवा केली असती तरी आपल्या

उपकाराची फेड

आमच्या हातून खास झाली नसती. पण हा दोष आमच्या अन्तःकर-णाच्या दारिद्र्याचा नसून तो परिस्थितीचा आहे. लोकमान्य ! आपल्याला जे परिश्रम झाले ते मी प्रत्यक्ष पाहिले आहेत. मी दौऱ्यामध्यें बरो-बरच असल्यामुळें आपणांस झालेल्या कष्टांची मला जाणीव आहे. त्या

कष्टांचें वर्णन करण्याची शक्ति माझ्या दुर्बल शब्दांमध्यें नाहीं. आह्मां गरिबांवर जें आपलें पोटच्या पोरांप्रमाणें निस्सीम प्रेम आहे त्यामुळेंच इतके कष्ट आपण सहन केलेत, पण त्यांबद्दल आपले आभार कसे मानावे हेंच मला समजेनासें झालें आहे. आपण आतां हा दौरा संपवून लौकरच विलायतेला जाणार आहां ते पुढील कष्ट यायेक्षांहि किती तरी जास्त आहेत. प्रसंग तर असा आणीबाणीचा, दिवस असे कठोर, वेळ अशी संकटमय अशा परिस्थितींत आपल्याला निरोप देतांना आमच्या अंतःकरणांत

जी कालवाकालव

होत आहे ती आपणांस कशी सांगूं ? ( अश्रुपात ! ) आह्मांला आपल्या वियोगानें किती जरी दुःख होत असलें तरी आपण ज्या कार्याकारितां विलायतेचा प्रवास अंगिकारितां आहां त्याचा पवित्रपणा मनांत आणून आह्मी आपल्याला प्रेमभरित अंतःकरणानें व मोठ्या आनंदानें निरोप देतों. [ प्रेमाश्रु ] आपल्या प्रवासामध्यें जीं संकटें आहेत त्यांतून आपलें रक्षण कसें होईल ही चिंता आमच्या मनाला टोंचल्याशिवाय रहात नाहीं, पण ही आमच्या दुर्बलतेची गोष्ट! दुसरा आपलें रक्षण करणारा कोण असणार? ज्यानें आपणाला दुर्धर संकटांतून आजपर्यंत सुरक्षित ठेविलें तोच विश्वंभर आपला पाठीराखा आहे. मग आह्मी तरी कां भ्यावें ? ' ज्याचा सखा हरि त्यावरि विश्व कृपा करी ' हें संतवचन, लोकमान्य ! आपल्याहि या प्रवासांत सार्थ होईल याबद्दल आम्हांला तरी कांहीं शंका नाहीं. अथवा

आह्मां पामरांची

तरी काळजी काय कामाची ? आपल्याला तो दयाघन भगवान् सुरक्षित ठेवो; व आपल्या खटपटीनें आम्हांला स्वराज्याचीं मधुर फळें चाखावयास मिळोत अशी त्या जगन्नियन्त्याजवळ आमची प्रार्थना आहे. [ टाळ्या ] आतां आजपर्यंत भोगलेल्या कष्टांचें फळ म्हणून ज्या वेळीं आपण स्वराज्य आह्मांला आणून द्याल त्या वेळीं बापानें केलेल्या कष्टांचें फळ जसें मुलगा आनंदानें खातो, त्याप्रमाणेंच आपल्या कष्टांचें फळ म्हणून आह्मीं आपलीं लेंकरें स्वराज्याचा हक्कानें उपभोग घेऊं. (प्रेमाचे

उमाळे !) आपण यशस्वी होऊन मातृभूमीला परत आलां म्हणजे सर्व जग आपलें मोठ्या प्रेमानें स्वागत करील व

आपत्तींनीं गांजलेले

आह्मी हिंदी लोक आपणांस मोठ्या आनंदानें दुवा देऊं. आपण स्वराज्य घेऊन परत आल्यावर जेव्हां वऱ्हाडांत दौरा काढाल, तेव्हां आह्मीं आपणांला बिलकूल कष्ट होऊं देणार नाहीं. त्या आनंदाच्या वेळीं पंचवीस हजारच काय पण वाटेल तितके रुपये जमा करून आपल्या प्रवासाकरितां असें वाहन शोधून काढूं कीं, आपणाला मुळींच त्रास होणार नाहीं. ( डोळ्यांत अश्रूंच्या मोत्यांचा श्रृंगार घालून ) त्या वेळीं आपणांला आह्मी हेलकावे देणारी मोटार देणार नाहीं, आपणांस फुलांचा मुकूट घालून ज्या रीतीनें आपल्याला धुळीचा संपर्कहि होणार नाहीं व सुखानें निजून प्रवास करतां येईल अशा दिव्य वाहनांत आपणांस बसवून नाजुक फुलाप्रमाणें आपणाला आमच्या प्रांतांत घेऊन जाऊं. (अश्रुसिंचन करीत)

आपला प्रवास

सुखकर होवो अशी पुन्हां त्या जगन्नियंत्याची भक्तिपूर्वक प्रार्थना करून मी वऱ्हाडतर्फे आपणांस मोठ्या आनंदानें निरोप देतों. ”

अशा रीतीचें अंतःकरणाचें पाणी करून सोडणारें अत्यंत प्रेमळ भाषण प्रेमाश्रूंच्या खळखळाटांत संपविल्यावर शेट सतीदास यांनीं मधुर भाषण करून लोकमान्यांस पुष्पहार अर्पण केला. ते ह्मणालेः—धामणगांवकरांच्या अंतःकरणरूपी सुमनांनीं गुंफलेला हा हार मी लोकमान्यांस अर्पण करतों. सर्व मारवाडीसमाज लोकमान्यांच्या पाठीमागें आहे असें समजून त्यांनीं आह्मांस आशिर्वाद द्यावा म्हणजे आमच्यामध्यें धैर्य उत्पन्न होईल. ” नंतर अध्यक्षांनीं लोकमान्यांस १४०१ रुपयांची थैली अर्पण केली. नंतर श्री. भानुदासशास्त्री यांनीं चांदुरतर्फे ५५१ रु., श्री. गंगाधरलाल यांनीं तळेगांवतर्फे ४७१ रु., श्री. वामनराव जोशी यांनीं सोनगांवतर्फे ९१ रु. अर्पण केल्यावर स्त्रीसमाजातर्फेचा हार कु. जान्हवीबाई यांनीं लोकामान्यांस वाहिला. शेवटीं अध्यक्षांनीं ‘ लोकमान्यांचा प्रत्येक शब्द लाखाच्या मोलाचा आहे ’ असें कळकळीनें सांगितल्यावर

श्री. शेट सावजी रतनसा यांनीं ‘ आह्मी लेंकरें आहों, आमची वेडीवांकडी सेवा लोकमान्यांनीं गोड करून घ्यावी ’ अशी विनयपूर्वक प्रार्थना केली व समारंभ आटोपला.

---

## ( प्रकरण १६ वें. )

# सुदिन उगवला.

( वरणगांव. )

लोकमान्य पॅसेंजरनें धामणगांवाहून निघाले ते सकाळीं १० वाजतां (ता. २३।२।१८) वरणगांवास पोंचले. वरणगांवचें आग्रहाचें आमंत्रण फार दिवसांचें होतें व वऱ्हाडच्या दौऱ्याचा कार्यक्रम ठरतेवेळीं वरणगांवकरांनीं धरणेंहि धरलें होतें, पण वरणगांवचा समावेश कार्यक्रमांत होऊं शकला नाहीं. अखेरीस वरणगांवकर निराश झाले असतानांच ता. २२ रोजीं रात्रीं त्यांना कळविण्यांत आलें कीं, ‘ सकाळीं लोकमान्य येतील ! ’ म्हणजे त्यांस अवधि काय तो १२–१४ तासांचा होता. इतक्या अवधींत आणि गांवांत प्लेगचा कहर उसळला असतांना उतरण्याच्या जागेची व्यवस्था करणें, मंडप उभारणें, रस्ते वगैरे शृंगारणें इतक्या सगळ्या गोष्टी जमवून आणतांना वरणगांवकरांची काय धांदल उडाली असेल त्याची बरोबर कल्पना सार्वजनिक कामामध्यें अंगमेहनतीनें पडणाऱ्या लोकांसच येईल. येथें आतां खानदेश लागल्यामुळें भुसावळचे पुढारी रा. गोगटे हे वरणगांवकरांच्या मदतीस आले होते. स्टेशनाजवळच एका विस्तीर्ण शेतामध्यें छोटासा मंडप उभारून व्याख्यानाची

व्यवस्था केली होती व जवळच पाहुण्यांच्या विश्रामाकरितां जाजमाचे तात्पुरते तंबू उभारले होते. सभेला हजार दीड हजार लोकसमुदाय जमला असून सभेस सरकारी बडे अंमलदारहि जातीनें हजर होते. सभेच्या सुरवातीला गायनकुशल रा. रुखब यांनीं 'सुस्वागत अर्पण हो तिलक मुनिवरा' हें पद्य मधुरपणें गाइलें. वरणगांवकरांच्या वतीनें लोकमान्यांचें सप्रेम स्वागत करतांना रा. गोगटे म्हणाले:—" वरणगांवकर ज्या सुदिनाची चातकांप्रमाणें मार्गप्रतीक्षा करीत होते तो सुदिन महद्भाग्यानें आज उगवला आहे. लोकमान्यांच्या पवित्र दर्शाननें सर्वांचे नेत्र तृप्त झालेलेच आहेत, आतां सर्वांनीं सावधान चित्तानें गुरुमुखांतून स्वराज्यमंत्रांचें श्रवण करावें." नंतर टाळ्यांच्या गजरांत

लोकमान्य म्हणाले:—

" भर दोनप्रहरीं डोळ्यांवर सूर्य तापत असतां मी सावलींत उभे राहून दोन शब्द सांगावे असा हा काळ आलेला आहे. आज सर्व देश उन्हांत तापत असल्यामुळें आजचा हा प्रसंग कांहीं विचित्र नाहीं. स्वराज्य ही सावली आहे. अर्थात् देशाला उन्हांतून सावलींत आणणें याचेंच नांव स्वराज्य होय. सगळीं माणसें उन्हांतून सावलींत यावीं, सर्वांनाच सुख व्हावें, लोकांना त्यांच्या इच्छेप्रमाणें व्यवहार करतां यावा या साठींच ही स्वराज्याची चळवळ चालू आहे. तुह्मी खेडेगांवचे लोक आहां तेव्हां तुम्हांला कदाचित् वरचे कायदे माहीत नसतील, पण इतर साऱ्या गोष्टी तुम्हांला कळतात. आज आम्ही सरकारजवळ स्वराज्य मागितलें म्हणजे ते आम्हांस उलट विचारतात कीं, 'खेडेगांवचे लोक स्वराज्य कोठें मागतात?' याकरितां तुह्मांला सरकारजवळ 'स्वराज्य पाहिजे' असा हट्ट धरून बसलें पाहिजे. जो ओरड करीत नाहीं तो संतुष्ट असा या राज्याचा सिद्धान्त आहे. तुह्मांला ज्या गोष्टी जाचत असतील त्यांची ओरड केल्याशिवाय या काळीं दाद लागणें शक्य नाहीं. आज तुमचे सारे कारभार कोण करतो? तुमच्या हातीं कांहीं सत्ता उरली आहे का? गांवांत शिवीगाळ झाली तरी आज कोर्टांत दोनदोन चारचार महिने हेलपाटे घालावे लागतात. पूर्वी असें नव्हतें. कोणी कोणाला शिवी

दिली तर गांवांतील चार प्रतिष्ठित पंच चावडीवर संध्याकाळीं जमत व तेथल्या तेथें काय दंड व्हायचा तो होई व निकाल लागे. आज कोर्टाचे हेलपाटे मारावे, शेंदोनशें रुपये खर्च करावे, साक्षीसमन्सें—वकील सारे प्रकार झाले म्हणजे निकाल काय, तर दोन रुपये दंड! आज गांवांत मोठ्या माणसांचा तरी कांहीं बोज राहिला आहे का? पूर्वी पेशवाईत लढाईच्या वेळीं जो तो आपापला घोडा घेऊन मोठ्या हौसेनें जाई, पण आज घोडे नाहींत, हत्यारें नाहींत, आणि हौसहि नाहीं. आज मोठ्या मुष्किलीनें सरकारला पांच लाख लोक मिळाले आहेत. आजचें राज्य सारें संशयानें चाललें आहे. लोकांच्या हातीं सत्ता नाहीं, अधिकार नाहीं, कारभार नाहीं. सगळें या नोकरांनीं करावयाचें. नोकर शहाणे आहेत, कर्तबगार आहेत, पण त्यांनींच कायदे करावे व त्यांची त्यांनींच अंमलबजावणी करावी हें आह्मांला नको आहे. आज आह्मी स्वराज्य मागतों म्हणजे हे नोकर काढायचे नाहींत फरक होणार तो इतकाच कीं वरचा हुकूम आम्ही सोडणार! हा आमच्या देशाचा दावा आज विलायतेंत चालला आहे. तो चालविण्यास व लोकांची बाजू पार्लमेंटपुढें मांडण्यास तुमचे वकील तिकडे जात आहेत, त्यांस हरएक प्रकारें मदत करा. कोणी विचारलें कीं, 'तुला स्वराज्य पाहिजे का?' तर स्वच्छ सांगा कीं, 'होय मला स्वराज्य पाहिजे.' स्वराज्य म्हणजे काय? तर साहेब जसा आपल्या देशांत रहातो, तसें आह्मांस आमच्या देशांत राहतां आलें कीं स्वराज्य झालें! एकी करा, निश्चय करा व स्वराज्य पाहिजे असें परमेश्वराला साक्षी ठेवून म्हणावयास तयार व्हा." (टाळ्या) नंतर श्री. काशीनाथ रंगो यांनीं हजार रुपयांची थैली लोकमान्यचरणीं अर्पण केली व ते म्हणाले:—"स्वराज्य हें सर्व रोगांवरील रामबाण औषध आहे. आम्ही ही अल्पशी सेवा आपल्या चरणीं सादर केली आहे ती आपण गोड करून घ्यावी. शेवटीं हारतुरे होऊन समारंभ आटोपला, व लोकमान्य विश्रांतीसाठीं धर्मशाळेंत गेले.

---

## प्रकरण १७ वें.

# स्वराज्यदौरा संपला !

( भुसावळ. )

लोकमान्यांची स्वारी वरणगांवाहून सायंकाळीं ४॥ वाजतां निघाली, ती भुसावळ येथें ५। वाजतां पोंचली. स्टेशनवर स्वागतार्थ लोटलेल्या जनसमूहाचा तोबा उडाला होता. थोडीशी मिरवणूक निघून लोकमान्यांस श्री. अभ्यंकर वकील यांच्या घरीं उतरण्यास नेण्यांत आलें. आज भुसाव शहरानें दिपवाळीचा शृंगार अंगाखांद्यावर घातला होता. सायंकाळीं ६ वाजतां विस्तीर्ण पटांगणांतील मनोरम मंडपामध्यें व्याख्यान—समारंभ झाला. व्याख्यानस्थल उत्कृष्ट रीतीनें नानाप्रकारांनीं सजविलें असून श्रोतृसमुदाय ७।८ हजार होता. सभेची व्यवस्था उत्कृष्ट होती. लोकमान्यांचें स्वागत श्रोतृसमूहानें आनंदाच्या प्रचंड गर्जनेनें केल्यावर रा. रा. गोगटे म्हणाले:—" आज आपण लोकमान्यांच्या आगमनानें व दर्शनानें पावन झालों आहों. येथें लोकमान्य २२ वर्षांपूर्वी आले होते, त्यावेळीं ते नामदार टिळक होते. या नामदारीची त्यांना मोठीशी किंमत होती असें नाहीं ! आज तो काळ बदलला आहे. सारा जन्म त्यांनीं लोकांच्या चिंतेंत घालविला म्हणून ते आज लोकमान्य झाले आहेत. नोकरशाहीच्या शापवाणीनें त्यांना कारागृहवास पत्करावा लागला पण त्यानेंच लोकमान्यांच्या कीर्तीचा सुगंध सर्व जगभर दरवळून गेला आहे. आज त्यांच्या तोंडून पवित्र संदेश ऐकण्याचा पर्वकाळ प्राप्त झाला आहे. अशा प्रसंगीं रा. केळकर वकील यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें. " रा. केळकर यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारल्यावर श्री. शेट भगवानदास यांनीं ३००० रुपयांची थैली प्रेमाचा नजराणा म्हणून लोकमान्यांच्या सवेस सादर केली. नंतर जयजयकारांत

लोकमान्य म्हणाले:—

" अध्यक्ष साहेब व सभ्यगृहस्थहो, वऱ्हाड मध्यप्रांताचा स्वराज्य-दौरा संपवून आम्ही आतां परत चाललों आहों. अर्थात् मी या ठिकाणीं स्वराज्यावरच बोलणार आहें. हा विषय इतका मोठा आहे कीं, तो १०–१५ व्याख्यानांतसुद्धां पुरा होणार नाहीं. १५ वर्षांपूर्वी स्वराज्य शब्द उच्चारण्यास भीति वाटे पण आज बहुतेक लोक राजरोसपणें स्वराज्यवादी झाले आहेत. हल्लींची राज्यव्यवस्था सुखाची नाहीं. पहिल्यानें इंग्रजी राज्य झालें तेव्हां असें वाटलें कीं, असा राजा व्हायचा नाहीं. त्यांची व्यवस्था चांगली, त्यांचा बंदोबस्त चांगला आणि भपका तर काय विचारूं नका. पेशवाईतील अंदाधुंदी नाहींशी होऊन आगगाड्या झाल्या, तारायंत्रें झालीं. पण हळूहळू वरील चकचकी मंदावत जाऊन, ती चकचकी बेगडी होती, खरी सोन्यारुप्याची नव्हे अशी खात्री होऊं लागली. लोक दरिद्री होत चालले, लोकांचा मोठेपणा नाहींसा झाला, देशाचा व्यापार वाढतो असें जरी राज्यकर्ते दाखवीत तरी आंतून सर्व व्यापार आटत चालला. दरवर्षाला ३०।४० कोट रुपये देशाबाहेर जातात असें दादाभाईंनीं सिद्ध केलें आहे. तुमचें राज्य म्हणून काय तो करभार घ्या पण ही देशाला अशी ओहोटी कां लावतां ? याला ते असें उत्तर देतात कीं, ' आह्मी येथें आगगाड्या केल्या, तारायंत्रें केलीं, परदेशी भांडवल गुंतवलें, तेव्हां त्याचें व्याज व नोकरांचे पगार हे देशाबाहेर जाणारच ! ' पण आह्मी ह्मणतों कीं, हे परदेशांतील नोकर नेमतां कशाला ? काय आह्मी राज्य चालविण्याला असमर्थ आहों ? हल्लीं कापसाचा व्यापार दिसायला मोठा दिसतो, पण त्याचें येथें जर कापड झालें असतें तर देशांत किती तरी पैसा राहिला असता ! १ रुपयाला पौंडाप्रमाणें कापुस विकलात तर ४ रु. पौंडाप्रमाणें कापड घ्यावें लागतें. हे मधले ३ रु. तुह्मी कोठून देतां ? हे पैसे जमिनीच्या उत्पन्नांतूनच कीं नाहीं ? आमच्याकडील सारे कोष्टी मेले बिचारे ! पूर्वी आह्मीच विलायतेला कापड पुरवीत होतों, मलमल इकडूनच जाई. पण आज तें सारें पारडें फिरून देशाचें अत्यंत नुकसान झालें आहे. तिकडच्या व्यापाऱ्यांना

ज्या सवलती आहेत त्याहि तुम्हांला नाहींत. आज रालीब्रदर इतका आंत घुसला कीं, तो कापूस काय, धान्य काय, शेतावरच खरेदी करतो. म.ळ मुंबई-पर्यंत न्यायचें कमिशनसुद्धां तुमच्या पदरांत पडत नाहीं. पूर्वी येथें कंपनीचें राज्य होतें, पण त्यांचें धोरण पडलें व्यापारी म्हणजे शेअर होल्डरांना जितका जास्त नफा मिळेल तितकें राज्य चांगलें! पण ही व्यापारी राज्यपद्धति पार्लमेंटाला बरी न वाटून त्यांनीं कंपनीच्या हातचा कारभार काढला व तो नोकरांच्या हातीं दिला. बादशहांनीं हे नोकर प्रजेच्या कल्याणाकरितां नेमले. पण या नोकरांनींहि देशाचें हित केलेलें नाहीं. तेव्हां आपण जर बादशहांना या नोकरांच्या चुका दाखवूं तर ते कंपनीप्रमाणें या नोकरांनाहि काढतील. नोकरांचें राज्य जाऊन लोकांचें राज्य व्हावें याचेंच नांव स्वराज्य. देव कायमच ठेवायचा, बदलायचा तो फक्त पुजारी. राज्य एक, मालक एक, प्रजा एक, देश एक, बादशहा एक मग नोकर बदलले तर त्यांत राजद्रोह कसा होणार? आह्मांला कोणाचा द्वेष करायचा नाहीं, आम्हांला साम्राज्य पाहिजे, फक्त हा जो मधल्यामध्यें नोकरच मालक होऊन बसला तो मात्र नको! स्टेट सेक्रेटरी हा मोठा नोकर पण त्याच्या खालचे गव्हर्नर, व्हाइसरॉय, कलेक्टर, कमिशनर, आणि आतां कुळकर्णी जाऊन त्यांच्या जागीं तलाठी अशी ही नोकरांची वरपासून खालपर्यंत मालिका आहे. पूर्वीचे सरंजामदार होते ते गेले, वतनें संपुष्टांत आलीं आणि जहागिरी होत्या त्याहि दिसेनाशा झाल्या. पेशवाईत लष्कर पुरविण्यासाठीं जहागिरी देत असत. पण १५ हजार घोडेस्वार पुरविण्यासाठीं २० लक्षांची जहागीर असली तर इंग्रजांनीं जहागिरदाराला सांगावें, "तुला १५ हजार घोडेस्वार संभाळायला किती खर्च येतो? १५ लाख. म्हणजे फायदा किती? ५ लाख. आतां हे पांचलाख फायद्याचे घे व मुळींच लष्कर बाळगण्याचा हक्क सोड!" जहागिरदारहि फुकटंफाकटीं ५ लाख रुपयांची जहागीर मिळते म्हणून भुलले पण इकडे १५ हजार घोडेस्वार बाळगण्याचा हक्क होता तो गेला हें कांहीं त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. अशा रीतीनें सर्व अधिकार या नोकरांनीं आपल्या हातीं घेतले आहेत.

पोलिस शिपाई जसा कैद्यांना वागवितो तसें हे नोकर आम्हांला वागवितात. नोकरानें नोकराचें ऐकावयाचें, अधिकार नोकराचा, हुकूम नोकराचा असें हें नोकरांचें राज्य झालें आहे. या नोकरांना बादशहांनीं सांगितलें कीं, ' माझ्या राज्यांत काळा-गोरा हा भेद ठेऊं नका. ' पण कर्झनसाहेब जे आले त्यांनीं मुळीं बादशहांची सनदच अशक्य ठरविली! (धिःकार!) मालक उदार पण या कोठावळ्यांचेंच मधल्यामध्यें पोट दुखतें! (टाळ्या.) पण आह्मी बादशहांची प्रजा आहों—या नोकरांची नव्हे! इंग्रजी राज्य म्हणजे काय? नोकरांच्या तांड्यांचें राज्य? हे नोकर वरून मोठा परोपकाराचा डौल दाखवितात, पण आले मात्र पोट भरण्याकरितां! येथें येतात, नोकरी करतात, पगार खातात आणि नोकरी संपली म्हणजे विलायतेला चालते होतात. यांचा पगार, पेन्शनें वगैरे मिळून दरवर्षी विलायतेस ४० कोट रुपये जातात—याचा चक्रवाढव्याजानें हिशेब करा म्हणजे काय होतें? या नोकरांचें एक पाहणें 'कर कसा वसूल होईल व लोक कसे ताब्यांत राहतील!' या नोकरांनीं कांहीं वरिष्ठ नोकऱ्या आह्मांला दिल्या आहेत हें खरें, पण आम्हांला त्यांच्या तंत्रानें काम केलें पाहिजे. यांनीं देशांत शाळा नाहीं काढल्या? होय. पण त्यांत शिकवायचें काय, तें त्यांनीं ठरवायचें! पुस्तकांत धडे कोणते? मेंढा व कावळा!! मेंढा म्हणजे काय? तर ज्याच्या अंगावर लोंकर तो मेंढा='मेंढ्यावरी लोंकर दाट भारी!' (हंशा.) कावळ्याचा रंग कोणता? काळा. जसें काय, कावळा कोणी पाहिलाच नाहीं!! (हंशाच हंशा.) कांहीं कावळ्यापेक्षां जास्त शिकवितात का? कावळा काळा होता, त्याला दोन पाय असतात हें कळलें, पण थोडें शिवाजीचेंहि चरित्र शिकवा. होय, शिवाजीचेंहि चरित्र शिकवितात, नाहीं असें नाहीं. पण काय शिकवितात? शिवाजी चोर होता. (धिःकार!) मिळून काय? शिक्षण असें द्यायचें कीं ज्यामुळें मुलांच्या अंतःकरणांत देशाभिमान उत्पन्न होणार नाहीं! या शिक्षणाची इतकी मजल गेली कीं मुलांनीं राजकीय सभेलाहि जाऊं नये. आणि कोणी मुलगा गेलाच

तर? त्याला परवां जळगांवास शिक्षा दिली कीं, 'मुलानें डोक्यावर जोडा घेऊन शाळेला प्रदक्षिणा घालावी !' ( धिःकार! ) हें प्रत्यक्ष उदाहरण घडलें आहे. हे नोकर आह्मांला अशा रीतीनें वागवितात, (संतापानें) तेव्हां आह्मी माणसें कीं जनावरें? गुरांनासुद्धां असें कोणी वागवायचा नाहीं इतकी यांची लोकांवर कदर आहे! मनूनें एक बायकांचा श्लोक लिहिला आहे, तो ह्मणतो कीं बायकांना लहानपणीं बाप, तरुणपणीं नवरा व ह्मातारपणीं मुलगा असे धनी असतात! तशीच आमचीहि, स्थिती झाली आहे. लहानपणीं मास्तर, तरुणपणीं नोकरीचें जोखड व ह्मातारपणीं पेन्शन!!! 'न हिंदुः प्रभुरात्मनः' अशी लोकांची पराधीन स्थिति झाली आहे. आतां कोणी ह्मणेल, खायला-प्यायला मिळतें कीं नाहीं? होय, मिळतें, पण तेंसुद्धां सगळ्यांना पोटभर कोठें आहे? शिवाय, 'काकोऽपि जीवति चिराय बलिं च भुङ्क्ते। ' कावळा खातो-पितो जगतो, पण त्याला कांहीं मान आहे का? या नोकरशाहीचा लोकांवर एवढा वरवंटा फिरला कीं, मोठमोठीं झाडें सुद्धां मोडलीं! इंग्रजींत एक ह्मण आहे, cut-off the tall tree ' पूर्वी आमच्यांत काय मोठमोठीं माणसें नव्हतीं? नाना फडणीस, अकबरशहा यांचें वंशज आज हिंदुस्थानांत कोणीच राहिले नाहींत? आमच्यांत कर्तृत्त्व आहे, कर्तबगारी आहे, सारें आहे,पण हे नोकर आह्मांला कर्तबगारी दाखवायला सवड ठेवतील तेव्हां कीं नाहीं? शंभर दीडशें रुपयांवरील जागा रिकामी झाली कीं साहेब आणलाच! आमच्याकडे कामें आहेत, पण तीं इकडे धांव आणि तिकडे धांव, असलीं!! लोकांवर जुलूम झाला ह्मणजे कांहीं डोक्याचें पागोटें कोणी काढलें नाहीं—तो बंदोबस्त उत्तम झाला आहे, ( किंचित् हंसून ) पागोटें न जाईल असा बंदोबस्त झाला, पण ( तीक्ष्णतेनें ) डोक्यावर तबक ठेवलें आहे ना? या तबकाच्यावर वाढूं नये ही सारी या नोकरांची व्यवस्था! (टाळ्या.) लोकांत मोठेपणा राहिला नाहीं, मान राहिला नाहीं, हुरूप राहिला नाहीं. अशा कदरेनें सर्व देशाचा वीर्यपात मात्र झाला! आह्मीं आजपर्यंत पुष्कळ ओरड केली, आम्हांला शिक्षा झाल्या—जाचहि झाला. पण आज अशी वेळ आली कीं, आमचें

म्हणणें बादशहांना पटलें! लढाई सुरू झाली तेव्हां या नोकरांजवळ बादशहांनीं सैन्य मागितलें. त्यांना वाटलें कीं, तीसकोटी हिंदुस्थानांतून सहज ४०।५० लाख लोक लढाईला मिळतील! पण लोक मिळाले काय ते ४।६ लाख!! तेव्हां विलायतचे डोळे उघडले कीं, 'नाहींरे नाहीं, या नोकरांनीं हिंदुस्थानचें वाटोळें केलें! (हंशा व टाळ्या.) हें मी कांहींतरी सांगतों असें समजूं नका, असें उघड भर पार्लमेंटांत मॉंटेग्युसाहेब बोलले. मॉंटेग्युसाहेब स्वतः येथें येऊन त्यांनीं सर्व चौकशीहि केली आहे. ही वेळ अशी अनुकूल आली आहे, या वेळीं—नेटानें प्रयत्न कराल तर यश खात्रीनें येईल. हा देशाचा दावा आतां विलायतेंत चालणार आहे. हे नोकर म्हणतील कीं, तुमचें एक लाख रुपये देणें ना? देणें कबूल, पण आज एक रुपया घ्या. पण या युक्त्या आतां चालायच्या नाहींत! दिलेंसें करायचें, द्यायचें तर नाहीं, आणि तोंडाला पानें पुसायचीं, ते दिवस आतां गेले आहेत!! (टाळ्या.) सिडनहॅम साहेबाचें म्हणणें कीं 'या हिंदी लोकांना स्वराज्य देऊं नका! कां रे बाबा? तर म्हणे कीं, 'स्वराज्य द्याल तर देशाचें नुकसान होईल!' कांहीं द्यायचें तर नाहीं, आणि वर ही मखलाशी करायची. पण आतां कोणी या सिडनहॅम साहेबास फसेल असें वाटत नाहीं.—सर्व जगभर आज स्वातंत्र्याची खैरात होत आहे, आफ्रिकेंतील काळ्या सिद्दी लोकांनाहि स्वराज्य मिळणार, मग तें आम्हांला कां नको? सर्व जगाचा एक विचार चालला असतां आम्हीच कसे स्वस्थ बसूं? उद्योग करा म्हणजे यश आलेंच पाहिजे, कारण आमचा पक्ष सत्याचा आहे, धर्माचा आहे. 'यतो धर्मस्ततो जयः' हें वचन लक्षांत ठेवा व कामाला लागा. भात शिजून हंडी तयार आहे, अशावेळीं आळस कराल तर तिला कुत्रा येऊन शिवेल. आतां या कुत्र्याला भात विटाळूं देणार कीं, त्याच्या पाठीमागें आणखी तुपाची वाटी घेऊन धांवणार? हो, नाहीं तर तुपाशिवाय कुत्र्याच्या पोटांत दुखावयाचें! भात कुत्र्यानें खाल्ला काय आणि मी खाल्ला काय, एकच!! तूंहि ब्रह्म आणि मीहि ब्रह्म!!! पण हा कुत्रा कांहीं परब्रह्म नव्हे हें लक्षांत ठेवा. या कुत्र्यानें पैसे गोळा केले आहेत—तो तुमच्याविरुद्ध

प्रयत्न करीत आहे—मग हा परग्रह कसला ? या वेळीं झोंप घ्याल तर पुढच्या पिढ्या व सर्व सुधारलेलें जग छीः थूः करील हें विसरूं नका. हा राष्ट्राचा निरोप तुम्हांला कळविण्यासाठीं मी हिंडलों आहें—आजची ही या दौऱ्यांतील शेवटची सभा होय. तुमचे वकील विलायतेस देशाची बाजू पुढें मांडावयास जात आहेत, त्यांना हरएक प्रकारची मदत करा. पैसे द्या, ‘ मी स्वराज्यवादी आहें ’ असें ठांसून सांगा, पैसे नसतील तर निदान परमेश्वराची प्रार्थना तरी करा कीं, ‘ हे देवा, आम्हांला स्वराज्य दे. ’ भांडणें विसरा, एकीनें वागा व निश्चयानें कार्याला लागा, परमेश्वर प्रयत्न कराणरास यश देतोच देतो. ” (टाळ्यांचा प्रचंड कडकडाट !)

अशा आशयाचें या दौऱ्यांतील शेवटचें पण खणखणीत, अखंड प्रवाही आणि मनाच्या दुर्बलतेला धक्का देऊन त्यास खडबडून जागें करणारें लोकमान्यांचें ‘ अति गोड ’ भाषण संपल्यावर हारतुरे देऊन डॉ. परांजपे म्हणाले:—“ लोकमान्यांनीं हें स्वराज्याचें रोपडें लावलें आहे, त्याचा वृक्ष झालेला त्यांना पहावयास मिळो, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. ” अध्यक्ष म्हणाले:—“ लोकमान्यांस अतोनात श्रम झाले आहेत. पण त्यांचे आभार वाणीनें मानणार काय ? जर लोकमान्यांचे खरोखर आभार मानावयाचे असतील तर ते कृतीनें माना व स्वराज्यकार्यास हर-प्रकारें मदत करा ! २२ वर्षांपुर्वी लोकमान्य आले होते तेव्हां ते नामदार होते, आज ते लोकमान्य आहेत, आणि पुढें येतील तेव्हां ते स्वराज्य घेऊन येतील. ” ( टाळ्या. ) शेवटीं सौ. राधाबाई लिमये यांनीं स्वराज्यसंघास २५ रु. देऊन कार्याचें सौभाग्य वृद्धिंगत केलें व व्याख्यान समारंभ आटोपला.

नंतर भोजनादि उरकल्यावर रात्रीं ११ वाजल्यानंतरच्या मेलनें लोकमान्यादि मंडळी स्वराज्यदौरा आटोपून मुंबईस यावयास निघाली ती सर्व मंडळी ता. २४ रोजीं सकाळीं ९ वाजतां मुंबईस पोंचली व हा महाराष्ट्राच्याच काय, पण अखिल हिंदुस्थानच्या इतिहासांत केवळ अपूर्व असा विजयशाली दौरा मोठ्या थाटानें समाप्त झाला.

———

स्वराज्यसंघाचे

# तहाहयात सभासद

( गांवांचीं नांवें अकारविल्हेनें दिलीं आहेत. )

## अकलूज, जि. सोलापूर.

१ कृष्णाजी बहिरव धडफळे २ दत्तात्रय मोरेश्वर मायदेव वकील.

## अकोट.

१ मोरेश्वर रावजी दिगंबर २ भगवंत अप्पासाहेब देशपांडे ३ महादेव वासुदेव आसरकर ४ लालजी विठोबा पाटील ५ काशिनाथ शंकर आप्पा ६ पुरुषोत्तम शंकर बेंदरकर ७ शे. मगनभाई शेराभाई एन्जीनियर ८ महादेव मारुती आसरकर ९ श्रीधर भाऊराव दाणे १० टोकरसिंह पुंजाभाई छेडा ११ शे. बलदेवसिंह अनुसिंह जमादार १२ नारायण गणेश ठोंबरे १३ त्र्यंबक महादेव धरणीधर १४ गोपाळ बळवंत पटवर्धन १५ रामकृष्ण दामोदर रामेकर १६ वासुदेव नारायण मराठे १७ दामोदर विश्वनाथ शेवडे १८ जयवंत बापूराव शास्त्री १९ व्यंकटेश जयकृष्ण मुंजे २० हनुमानसिंह राजपूत २१ शे. बनशी लालजी आगरवाले २२ धनराज विठोबा २३ यशवंत जयकृष्ण २४ परशुरामसिंह नारायणसिंह जमादार २५ पं. राधाकिसन बिसावा २६ शे. गिरिधारी लालजी २७ श्रीमती मायबाईतर्फे रखमाबाई गोटी २८ पं. रामप्रसाद बंशीधर कंकोरिया २९ नारायणदासजी ३० किसन-मेघराज ३१ हनुमानबक्ष सूर्यमल ३२ गिरिधारी जोहारमल मारवाडी ३३ बालकिसनदास पुरुषोत्तमदास सावकार ३४ गोपाळसिंगजी ३५ मुखराज राधाकिसन ३६ लक्ष्मण बालकिसन अगरवाले.

## अकोला.

१ श्री. सौ. लक्ष्मीबाई फडके २ अनंत सखाराम आठले वकील ३ श्री. सौ. येसूबाई ओक ४ पुरुषोत्तम बलवंत गोळे वकील ५ रा. रामकृष्ण बाळाजी ओक ६ श्री. रखुमाबाई चिपळूणकर ७ श्री. सौ. राधाबाई चिपळूणकर ८ अनंत विष्णु खरे ९ गुलामदस्तगीरखान (बाळापूर) १० गोपीसा बाळसा कलाल ११ जयकुमार देवीदास

% चवरे वकील १२ परशुराम चिंतामण जोगळेकर १३ नारायण काशीनाथ दाते वकील १४ सौ. लक्ष्मीबाई दाते १५ पुरुषोत्तम बाळकृष्ण शितूत (रिसोड.)

अथणी.

१ गुरुनाथ बिंदाचार्य तेरदाळ २ शेषगिरराव तिरमलराव दातार वकील ३ शंकर विष्णु गाडगीळ ४ नारायण गुरुराव जोशी वकील ५ अण्णाजी नारायण देशपांडे वकील ६ शेट हमराज आनंदजी भाटे.

अमळनेर.

१ सखाराम रावजी बंगाली २ विनायक गोविंद भिडे वकील ३ दत्तात्रय वासुदेव अभ्रे वकील ४ महादेव गोविंद भालेराव वकील ५ विष्णु काशीनाथ भागवत वकील ६ श्री. राधाबाई जोग ७ नारायण गोविंद मुठे ८ महादेव एकनाथ मुठे ९ गोपाळ प्रल्हाद मुठे १० काशीनाथ वासुदेव मुठे ११ दामोदर बापुजी पिंपळीकर १२ शे. भागचंद छगनशेट गुजराथी १३ शे. भोगीलाल रतनचंद गुजराथी १४ शे. दायाभाई चुनीलाल १५ शे. सुंदरलाल चुनीलाल. १६ शे. भागचंद रायचंद १७ गंगाराम सखारामशेट शिंपी १८ रामचंद्र भाऊशेट शिंपी १९ तोताराम विठोबा कासार २० शंकर बाळाजी गांधलीकर २१ दगडू लाडूशेट कासार २२ शे. सराफअल्ली महंमदअल्ली २३ रामचंद्र विष्णु म्हसकर २४ रामचंद्र महादेव परांजपे वकील २५ शंकर दामोदर गुते वकील २६ शे. किसनदास घनःश्यामदास. २७ दाजी बल्लाळ पाटील. (पातोंडे.)

अलिबाग.

१ यशवंत गोविंद गुर्जर २ गोपाळ गोविंदशेट गुजर (नांगाव)

आगाशी.

१ अनंत सखाराम गद्रे २ काशीनाथ त्रिंबक जोशी ३ अण्णा गोविंद नाईक ४ दादा गोपाळ नाईक.

इसलामपूर, जिल्हा सातारा.

१ डॉ. श्रीपाद महादेव वैद्य एल. एम एस. २ नारायण गणेश

पाटणकर बी. ए. एल एल बी. वकील ३ सदाशिव विठ्ठल दळवी वकील ४ पांडुरंग रामचंद्र कुलकर्णी ५ रामचंद्र केशव हमणसागर.

## उमरखेड.

१ नागोराव भुजंगराव देशमुख २ राजाराम परभाजी उत्तरराव ३ धर्माजी नरसिंग रायवाद ४ मोतीलाल श्रीकिसन मारवाडी ५ लालाशिवशंकर इजारदार ६ सीताराम बळीराम पांडे कृष्णपूरकर ७ माधव रामराव देशमुख साकळे ८ दिनानाथ माधव बेदरकर ९ नारायण काशीनाथ पाध्ये १० प्रल्हाद गंगाधर वांटेगांवकर ११ रेणुकादास राजेश्वर १२ जयराम गुणाजी खंदारे १३ फकीरराव दत्तराव नाईक. (हार्शी)

## उमरावती.

१ जयराम भवानजी पाटील.

## कर्जत.

१ नारायण गणेश मेढी २ गोविंद गोपाळ मेढी (दहिवली) ३ भालचंद्र गणेश वैद्य (वेणगांव.)

## कलकत्ता.

१ जीवानंदजी मिश्र २ चरणदासजी ३ केदारनाथजी खत्री ४ दुर्गाप्रसादजी गुप्त ५ हरानचंद्र गुप्त ६ शे. माणिकचंद रणछोडदास ७ बेनी माधो सिंह ८ बदरीनाथ जैन ९ बुद्धिचंद्र माथुर १० रणछोडदास कोठारी ११ अश्विनी कुमार पाल १२ जीवनलाल १३ रामप्रसाद चाडक १४ चंपालाल सोडिया १५ लक्ष्मणसिंह १५ बृजलाल बियामीवाला १७ रायपाल आणि कंपनी १८ श्रद्धाराम शर्मा १९ लल्लु चौबे २० सीताराम मुंद्रडा २१ बालकिसनदास बियानी २२ शिववर्धनदास संवर २३ किसनदास जेठमल २४ आसाराम कोठारी २५ चेतनदास बिधनी २६ मदनगोपालजी गाडोदिया.

## कल्याण.

१ कृष्णाजी केशव फडके २ श्री. गं. रखमाबाई भ्र. लक्ष्मण विष्णु

फडके २ वासुदेव गंगाधर बोरगांवकर ४ महादेव रामचंद्र रानडे ५ विष्णु पांडुरंग आचवल ६ आत्माराम महादेव जयवंत ७ नारायण द्वारकानाथ रणदिवे ८ हरि गणेश वैद्य ९ रा. ब. चिंतामण बाळकृष्ण वैद्य १० गोविंद विष्णु गोडबोले ११ विठ्ठलदास करसनदास १२ शे. व्यंकटलाल रामचंद्र १३ शे. रामदयाळ परतू १४ शे. बद्री बाळमुकुंद १५ शे. झुंबरलाल हरि भगत १६ गोकुळ गोविंद तिवारी १७ शे. गणेश श्रीराम १८ शे. चुनीलाल मूळजी १९ शे. जिवला नारायण कुंभार २० शे. जेठा राजा कुंभार २१शे. मुरार गिरधर २२ शे. मुरार दामोदर २३ विष्णु महादेव गोळवेलकर २४ केशव सीताराम परांजपे.

## काटोल.

१ शे. रामचंद्र साळूराम सावकार २ शे. मोतीराम बुलीदान ३ सौ. दुर्गाबाई केळकर ४ सौ. लक्ष्मीबाई भाटे ५ सौ. सरस्वतीबाई मुळमुळे ६ गं. लक्ष्मीबाई कळार ७ गं. पार्वतीबाई टिळक ८ अंबादास लक्ष्मण कोलते ९ मारुति विठोबा डाळपे १० य० महादेव बाके वकील १२ बळवंत जागेश्वर घाटे वकील १२ गणपति दाजीबा मुळमुळे वकील १३ त्र्यंबक रामचंद्र गुर्जर १४ पांडुरंग रामचंद्र भुसारी १५ शंकर गोविंद पांडे १६ लक्ष्मण जगन्नाथ सातपुते १७ लक्ष्मण मोरेश्वर आंबेकर १८ बाबू अनंत आगरेकर १९ कृष्णराव बाबूराव देशमूख २० श्रीकिसन रामचंद्र भुतडा २१ जगन्नाथ रामचंद्र भुतडा २२ बाळाजी रामजी खरपकार २३ हरि बाबूराव परांजपे २४ आत्माराम रामरत्नरूप सावकार २५ बाबा सीताराम घोडे २६ महादेव सीताराम लुळे २७ दामोदर जागोबा मालगुजार २८ अप्पाजी मोरेश्वर जोशी २९ लक्ष्मण सीताराम खोळकुटे ३० सीताराम विश्वनाथ आगरकर ३१ भजाळराव आनंदराव देशमुख ३२ डॉ. वामन लक्ष्मण पांचखेडे ३३ माणीकराव नागोराव देशमुख ३४ डॉ. गोपाळ कृष्ण हरदास ३५ कृष्णराव आत्माराम हरदास ३६ सीताराम किन्थूजी महाजन ३७ सदाशिव जोगेश्वर पांडे ३८ वासुदेव विनायक पांडे ३९ नाथजी धनाजी गुर्जर ४० पिसाराम पुंड ४१ गोपाळ गंगाधर करंदीकर ४२ भगवंत विनायक मुठाळ ४३ गंगाधर वासुदेव अंधारे ४४ बाळाजी बापूजी

कासार ४५ गणपतराव सीताराम काळगेग ४६ विश्वेश्वर अय्या ४७ सौ. सोनुबाई चांडक.

कारंजा.

१ नरहर रामचंद्र घुडे २ यादव रामकृष्ण घुडे.

कुर्डुवाडी.

१ शे. पदमजी रायमल २ शे. भगवानदास दौलतराम बारलोणकिर ३ शे. प्रेमराज मोतीचंद ४ शे. हिराचंद माणिकचंद ५ शहा. गुलाबचंद कामराज ६ शेट. रावजी मोतीचंद.

कोसारें.

१ सौ. आनंदीबाई भिडे २ नीलकंठ सखाराम आष्टेकर ३ लक्ष्मण यादव देवताळे. ( सोईट )

कोळपिंपरी.

१ भिकाजी सदु पाटील २ शंकर खुशाल पाटील ( ढेकू )
३ विठ्ठल सदाशिवराव देशमुख ( शेवाळ पिंपरी. )

कोळेवाडी ता. कराड.

१ शिवरामपंत देशपांडे.

खांडवा.

१ दामोदर नारायण फडणीस २ दोरादासजी चटर्जी ३ नारायण विष्णु देव वकील ४ काळूराम अमरचंद वाडे वकील ५ अनंतलाल वैजनाथ ६ वामन कृष्ण औरंगाबादकर ७ महादेव त्र्यंबक गलगले ८ गोपाळराव आहेरसिंग.

खेड जि० पुणें.

१ दत्तात्रय विष्णु खेडकर २नारायण सदाशिव रहाळकर(चासकमान)
३ कृष्णाजी पुरुषोत्तम दीक्षित ४ कृष्णाजी विनायक साठे (चासकमान)

गणेश वाडी.

१ भालचंद्र बळवंत जोशी.

### गोवे ता. सातारा.

१ महादेव निलकंठ गाडगीळ २ दिनकर हरि चितळे

### चांदा.

१ बळवंत राघव देशमुख वकील २ दाजीसाहेब देवईकर वकील ३ विश्वनाथ शालिग्राम दीक्षित ४ शेट लोमकरण ५ शेट तोटाराजन्ना ६ राजेश्वर बापू नाईक ७ बाळाजी दामोदर नाईक ८ शे० सिद्धकरणी ९ गोपाळराव बेगडे १० गांधी ११ पुराषोत्तम सीताराम पाटील १२ गोविंदराव गुरव १३ लक्ष्मण काशीनाथ सावकार १४ माधोराव सांबशिव चेंडके १५ रामचंद्र बिरे वारनेरी १६ रामचंद्र शिंपी १७ गं. भा. जानकी बाई १८ सौ. भागीरथीबाई देशमुख १९ बाबासाहेब पाटील २० बोरवारे

### चाफळ.

१ गंगाधर यशवंत शहाणे २ विष्णु रामचंद्र देशपांडे.

### चिकोडी.

१ दादाजी गंगाधर राशिवडेकर वकील २ विश्वनाथ रामचंद्र मजली वकील ३ गणेश दाजी शावडे वकील ४ बाळकृष्ण बाबूराव मनोळीकर ५ आबा रामा पाटील ६ हणमंत दत्तात्रय कुळकर्णी ७शे. रतनजी रावजी गुजर ८ सखाराम वामन कुळकर्णी.

### चोपडें.

१ गंगादास देवचंद २ द्वारकादास रामदास ३ नगिनदास नथुसा ४ हिरालाल लालदास ५ फुंदिलाल देवचंद ६ भुकणदास सांखरलाल ७ रणछोडदास माणकचंद ८ रामदास सांखरलाल ९ नारायण हिरालाल १० हिरालाल शामलाल ११ किसनदास माणिकचंद १२ पाटील यादोबा बेडू धनगर १३ शे. मोतीराम शामजी १४ धनलाल शिवलाल १५ मोतीलाल माणकचंद १६ महादेव केशव माळी १७ बाबामिया अतिबशहा १८ गोपाळ विष्णु फडके १९ शे. चुनीलाल तुकाराम २० हिराभाई काशी मराठे.

## जळगांव.

१ माधवराव लक्ष्मण खांबेटे वकील २ भास्करराव सखाराम गाडगीळ ३ गोविंदसिंग ज्ञानसिंग रजपूत ४शे. भगीरथ रामचंद्र (जोमाद)५ गंगाधर गणेश डिंडोळकर ६ मोहनचंद नानाभाई ७ पांडुरंग दिनानाथ ८ यशवंत रामचंद्र ९ गोविंद कृष्ण पाध्ये १० गणपत मानाजी बंभडकर ११ लखमीचंद चुनीलाल १२ श्रीकृष्णरामचंद्र पुंडलीक १३किसनलाल तुळसीदास अफूवाले १४ शामराव बापूजी देशमुख १५ लक्ष्मीदास भवानदास १६ शे. राजमल लक्ष्मीचंद. ( जळगांव )

## जुन्नर.

१ कृष्णाजी अमृत बागाईतकर वकील.

## ठाणे.

१ सखाराम मालुजी हालके ( वाशिंद ) २ शे. मंगलदास देवीदास ३ प्राणजीवनदास मोतीलाल ४ लखमीदास जमनादास ५ वझे शंकर शिवशंकर ६ लक्ष्मीदास त्रिभुवनदास ७ राजाराम सखाराम भागवत ८ राजाराम यशवंत तेंडुलकर ९ पुरुषोत्तम विष्णु वैद्य १० रामचंद्र गोविंद गुप्ते ११ सौ. रखुमाबाई वैशंपायन १२ दुर्गाबाई जोशी १३ भगवंत आप्पाजी पाध्ये १४ विनायक हरि डोंगरे १५ केशव लक्ष्मण मेकल १६ नारायण लक्ष्मण फडके १७ शांताराम धोंडो सामंत १८ सदाशिव त्र्यंबक गुप्ते १९ बाळाजी काशीनाथ करमरकर २० शंकर बाळकृष्ण कारखानीस २ विनायक शंकर भागवत २२ कृष्णाजी विनायक शाळिग्राम.

## थर्डीपौनी

१शे. बालकिसन गोवर्धनदास २नारायणराव (दिग्रज) ३रामचंद्र बाळासाहेब खलाद्कार ४ सौ. मनोरमाबाई मुठाळ (सावंगा ) ५गं. सीताबाई बेलसरे (नरखेड) ६ यादोप्रसाद रामकिसन सावकार ७ नारायण सागोराहुदार (कासाकारी ढवलापूर) ८ महादेव सीताराम जोशी (पांढरसिंग) ९ यादवपर्शुराम नाईक (मुंगळें) १० विनायक वामन देशमुख ( दिग्रस )

## तळेगांव ढमढेरे.

१ शे. आत्माराम हरकचंद गुजर २ शे. बाळचंद शामचंद ३ केवळ

गणेश पिंगळे ४ गणपत दुल्लाजी पिंगळे.

## तेरदाळ.

१ गोविंद अनंत देशपांडे २ विष्णु अनंत देशपांडे.

## धुळें.

१ शे. मोतीलाल काशीराम कोपरलीकर २ नथू जानकीराम ३ गोविंद काशीनाथ चांदोरकर वकील ४ शंकर श्रीकृष्ण देव वकील ५ भास्कर वामन भट ६ नारायण जनार्दन ओक वकील ७ विश्वनाथ गणेश जावडेकर वकील ८ नारायण बळवंत सिन्नरकर ९ रामकृष्ण गोविंद जोशी १० लक्ष्मण माधवराव गद्रे ११ हरि सदाशिव आपटे वकील १२ भास्कर वासुदेव साठे १३ आर. एन्, शिंपी १४ सदाशिव सखाराम सहस्रबुद्धे.

## नागपूर.

१ माधवराव पाध्ये B.A.L.L.B. वकील २ विनायक रामचंद्र गुपचूप ३ नागोजीराव गांडली ४ गंगाधर गणपतराव केकतपुरे (पांढुर्णा) नागपूर ५ सदाशिव बन्सीधर दशोत्तर वकील ६ शे. गोपीकिसन हंसराज मारवाडी. ७ बाबासाहेब देशमुख. ८ डॉ. का. कृ. नाईक (मोहापा.) ९ मुकुंदराव देशमुख १० डी. के. टेकाडे.

## नांदुरा.

१ दगडू रखेनाजी इंगळे २ तुकाराम तोताराम पाटील ३ किसन मोतीलाल भावसार ४ कृष्णाजी रामचंद्र पिंपरीकर.

## नाशीक.

१ व्ही. बी. अकूत वकील २ भास्कर गणेश मुठे ३ विश्वनाथ गंगाधर केतकर वकील.

## पंढरपूर.

१ गोपाळ गोविंद नगरकर २ डॉ. वासुदेव रामचंद्र कानिटकर ३ गुंडो गोविंद भणगे ४ वे शा. काशीनाथ व्यंकटेशपंत पराडकर ५ विनायक शिवाजी जोग वकील ६ विष्णु बाळाजी काणे ७ गणेश शंकर बिडकर स्टेशनर्स ८ मधुसूदन यशवंत पिंगे ९ रामचंद्र केशव कुंभारे

१० मुरलीधर विष्णु साडेकर.

## पनवेल.

१ विठ्ठलराव शंकरराव गुळवे.

## पारोळे.

१ शे. गोवर्धनदास काशीदास २ हरकचंद ताराचंद ३ पीतांबर नाना साहुबंड ४ उदीलाल कस्तुरचंदभाई ५ छोटूलाल छबिलदास गुजराथी ६ गोपाळ दगडूशेट वाणी ७ पांडुरंग बाळकृष्ण फाटक ८ निंबा लोटू पाटील ९ भिला परशुराम पाटील १० नारायण सदाशिव वाणी भडगांव ११ सदाशिव वेडुशेट वाणी. १२ झिपरू श्रावण शेट वाणी.

## पोखरी पुसद.

१ ज्ञानोबा केशव चिदरवार इनामदार २ निवृत्ति केशव पापीनवार ३ राजाराम पुंडलीक चिदरवार ४ नाना हरबाजी येरावार ५ काळुराम बिरबल मारवाडी ६ नामदेव गोविंद चिकटे ७ नरहर रामाजी चिकटे ८ काशीनाथ रामचंद्र बापट वकील ९ राजाराम नरहर पाठक १० गोविंद त्र्यंबक पाठक ११ जिनासा मोतीसा लाड १२ प्रल्हाद माधव उमेदवार १३ रामकृष्ण महादेव कुटुंबे वकील १४ रामभट कृष्णभट जोशी १५ धोंडभट माधवभट जोशी १६ गणपत केशव रेवनवार १७ विष्णु-वामन वैजापूरकर १८ अ० विष्णु सप्रे वकील १९ विष्णु चिंतामण नातू वकील २० शंकर सखाराम सरनाईक २१ देवराव बजाबा बावने २२ यशवंत माधव महाजन २३ रामचंद्रपंत छोटूराम यादव २४ बिरबल काळुराम मारवाडी पुसद २५ नारायण विठ्ठल द्रवीड वकील.

## पालघर.

१ भा. आ. दाडेकर २ गणेश गंगाधर दांडेकर ३ र. गं. दाडेकर ४ रावजी गोपाळ दांडेकर ५ कृ. का. दांडेकर ६ शे. छोटालाल रामदास ७ कृ. भा. पेठे ८ गोपाळ वामन रहाळकर ९ वि. ल. हणुमंते १० देवजी हरि पाटील ११ एम्. बी. चौधरी १२ व्ही. पी. घाणेकर

१३ कृ. त्र. सामंत १४ गणपत मुकुंद राऊत १५ शे. वनमाळी जेठा १६ हरचंद चिं. पंडीत १७ वा. मो. खुटलकर १८ द. गो. बर्वे १९ पु. कृ. चितळे २० अ. ना. खरे २१ दा. त्र्यंबक नारगोळकर २२ आ. ज. करंदीकर २३ व्ही. बी. चौधरी २४ गोपाळ गणेश दांडेकर २५ तारापूरकर. २६ तारापूरकर.

## पुणें.

१ लो. बाळगंगाधर टिळक २ रघुनाथ हरि गोखले ३ आर. के. भिडे ४ डो. विष्णु वामन भागवत ५ बापूशेट चतुर्भुज दाणेवाले ६ अनंत गणेश गद्रे ७ हरि केशव गोळे ८ श्री. सगुणाबाई भ्र. रामचंद्र दामोदर गोखले ९ सदाशिव गणेश फुलंब्रीकर १० जनार्दन सखाराम करंदीकर ११ शंकर सखाराम दाते १२ श्री. यशोदाबाई भ्र. विष्णु-बळवंत फडके १३ सौ. राधाबाई शिंदोरे १४ श्री. राधाबाई तांबेकर १५ कृष्णाजी मोरेश्वर फाटक वकील १६ लक्ष्मण बळवंत भोपटकर १७ शिवराम महादेव परांजपे १८ गोपाळ मोरेश्वर पटवर्धन १९ नारायण धोंडदेव साठे २० शे. ताराचंद रामनाथ २१ शे. हुकुमजंद ईश्वरदास २२ पी. डी. ब्रदर्स २३ कृष्णाजी बल्लाळ साठे २४ कृष्णाजी गोपाळ टोकेकर २५ गणेश सदाशिव मराठे २६ चिंतामण दामोदर घारपुरे २७ शे. किकाभाई प्रभुदास २८ शे. नानचंद मूळचंद २९ शे. विठ्ठलदास. गोवर्धनदास ३० रामभगत पन्नानदास ३१ शंकरराव मुरूडकर ३२ शे. किसनदास विष्णुदास ३३ शे. किसनदास टिकमदास ३४ शे. रामदास गोवर्धनदास ३५ शे. कणीराम नंदराम ३६ कृष्णाजी मनोहर पाडलकर ३७ आप्पाराव वैद्य ३८ गोपाळराव पटवर्धण ३९ कृ. प्र. खाडिलकर ४० वा. ग. जोशी ४१ न. चिं. केळकर ४२ दा. वि. गोखले ४३ कृ. ना. कबडे ४४ ल. ज. आपटे ४५ गो. ग. घारप ४६ वि. बा. जोशी ४७ शे. छबिलदास दुल्लभदास ४८ केशवलाल मणीलाल ४९ शे. बापुजी चतुर्भूज ५० शे. गमनाजी पिताजी ५१ अ. चिं. भट ५२ बळवंत सोमाजी रेणुसे ५३ पां. वा. जोशी ५४ आर. डी. गोखले ५५ ग्यानुजी दगडुजी

५६ विश्वनाथ धोंडदेव खरे ५७ बळवंत नारायण वाघ ५८ के. ब. नाईक ५९ रा. द. पराडकर ६० शंकरराव उरवणे ६१ शे. दादाजी मोतीजी ६२ रामचंद्र गणेश ठकार ६३ मारुतराव अर्जुनराव पोमण ६४ विश्वनाथ बळवंत डावरे ६५ बहिरप्पा शेट उरवणे ६६ गणपत पिराजी पवार ६७ यशवंत रावजी कांबळे ६८ लक्ष्मण गणेश दंताळे ६९ नारायण ग्यानोबा साखरीकर ७० गोविंद भास्कर पंडित ७१ कृष्णाजी गणेश गर्दे ७२ महादेव गणेश होनप ७३ नारायण गणेश भडभडे ७४ विश्वनाथ दामोदर फाटक ७५ विष्णु रामचंद्र रानडे ७६ दामोदर बाळोबा खुर्द ७७ गणेश विनायक माळवदकर ७८ ल. ब. पाठक ७९ गणेश महादेव दामले ८० मनोहर गोविंद अभ्यंकर ८१ नारायण विनायक लिमये ८२ डॉ. सहस्रबुद्धे ८३ नारायण पुरुषोत्तम कर्वे ८४ ल. मा. टापरे ८५ ना. म. परांजपे ८६ रा. के. डोके ८७ वि. ना. ढमढेरे ८८ रा. बा. खराडकर ८९ गेनु दगडु कुंभार ९० डॉ. सरदेसाई ९१ का. ठ. जाधव ९२ गणपतराव देवधर ९३ शे. रायसिंग प्रेमाजी ९४ हरिभाऊ रायकर ९५ शे. शिवदानजी रामजी गोटीवाले ९६ मारुतिराव टिकेकर ९७ कुळकर्णी आणि मंडळी ९८ द. व्यं. वेहरे ९९ अ. वा. फडणीस १०० धो. वा. विद्वांस १०१ बाळचंद शामचंद १०२ आत्माराम हरकचंद १०३ गोपाळ कृष्णशास्त्री केतकर.

## बार्शी.

१ राव. रामचंद्र मोरेश्वर साने वकील २ गोविंद पंढरीनाथ सुलाखे ३ दत्तात्रय विश्वनाथ सुलाखे ४ दिगंबर एकनाथ साखरे ५ दिगंबर बाळकृष्ण डुबे.

## बावोशी.

१ बल्लाळ मुकुंद टिळक २ रंगो रावजी टिळक ३ विनायक लक्ष्मण टिळक. ४ भोजराज माधव देशमूख. ( बावर्सी )

## बिलासपूर.

१ रामचंद्र भगवंत जोगळेकर.

२४ वैकुंठराव अंबालाल २५ आत्माराम कृष्ण जोग २६ कृपाशंकर दयाशंकर कोलीयर प्रोप्रायटर (झरीया) मुंबई. २७चिं. दा. सामंत २८ के. टी. डोंगरे २९ बा. पां० भालेराव ३० गो. मो. पोतदार ३१ ए. एस. पाडळकर ३२ ह. कृ. गोखले ३३ ना. ग. गोडबोले.

## मूर्तिजापूर.

१ नारायण गोविंद जमादार २ कृष्णाजी जगन्नाथ पोतदार ३ हरियोग किसनसिंग ४ रामचंद्र पर्शराम तिवारी ५ त्रिंबक बन्सीलाल डुबे ६ केशवराव गुणवंतराव देशमुख ७ रामप्रसाद मनसाराम ८ व्यंकटेश बनाजी तिरके ९ तुकाराम मियमजी तिरके १० नारायण गोविंद सहस्रबुद्धे ११ शंकर रामकृष्ण नाईक १२ महादेव गणेश नाईक.

## मेहेकर (वऱ्हाड)

१ यादव माधव काळे २ वामन राजाराम सावजी ३ व्यंकटेश केशव सोमण ४ शे. जगन्नाथ मणीराम मारवाडी ५ शे. सीतारामसा कृष्णसा सावजी ६ शे. विष्णुसा बाळकृष्णसा सावजी ७ गिरिधर सखाराम दीक्षित ८ रघुनाथ मार्तंड राजहतकर ९ राजेश्वर व्यंकटेश देशमुख १० बंडुसा शिवरामसा सावजी.

## यवतमाळ.

१ भीमराव हणमंत जतकर २ सिद्धनाथ कृष्ण काणे ३ माधव श्रीहरि अणे वकील ४ केशव रामचंद्र बापट सावकार ५ शे. रामकुवर रामनारायण ६ शे. रामगोपाळ हरदेव.

## यावल.

१ नारायण मार्तंड देशपांडे २ बलदेवसिंह बहादुरसिंग (साकची.) (वरोरा.) ३ नारायण पांडुरंग भागवत वकील ४ हणमंत वामन घारे वकील ५ सदाशिव यादव काकडे वकील ६ शे. चुनीलाल हरकचंद मारवाडी ७ बळिराम माधव पाटील ८ जनार्दन गणेश पाटील ९ श्री. व्यंकटेश मालगुजार १० पुरुषोत्तम नारायण पंडे ११ अडकोबा लक्ष्मण पाटील १२ शे. जमनादास नरसी १३ सौ. सुभद्राबाई पाटील १४ सौ.

अन्नपूर्णाबाई पाटील (कोसाटे.)

## रत्नागिरी.

१ विठ्ठल विष्णु राजवाडे (संगमेश्वर.) २ कृष्णाजी बाबाजी दांडेकर अंजर्ले ३ पद्माकर विनायक निजसुरे ४ रंगनाथ मोरेश्वर महाजन ५ लक्ष्मण विठ्ठल कोलटकर ६ गणपत महादु केळुसकर ७ हशामउद्दीन वा॥ शेखहुसेन चोगले ८ गणेश दामोदर विद्वांस ९ सौ. लक्ष्मीबाई पेंडसे मुर्डी १० नारायण गोपाळ पेंडसे ११ पांडुरंग गोपाळ बाळ (लाडघर) १२ नीलकंठ रावजी महाजन (मांदिवली) १३ गणेश गोपाळ सोमण (चिपळूण) १४ नरसो विश्वनाथ सोमण १५ वासुदेव चिंतामण सोमण १६ गोविंद बल्लाळ जोशी वकील १७ पांडुरंग महादेव साठे वकील १८ त्रिंबक रामचंद्र चितळे १९ गोपाळ बाळाजी चितळे (गुहागर) २० त्र्यंबक कृष्ण पाटणकर २१ बळवंत विष्णु परचुरे २२कृष्णाजी गोपाळ गाडगीळ.

## लिंब ता. सातारा

१ काशिनाथ गणेश वेलणकर.

## लोणावळें.

१ श्री. मुनियाभाई परदेशी.

## वरसई.

१ मोरेश्वर काशिनाथ दाबक २ हरि नारायण कर्वे ३ मुकुंद गणेश कर्वे ४ केशव कृष्णाजी रहाळकर ५ नारायण रामचंद्र साठे.

## वर्धा.

१ श्री. सौ. काशीबाई देशमुख २ श्री. सौ. उमाबाई भगत ३ पुरुषोत्तमराव परांजपे ४ गोपाळराव लुले ५ तुकारामपंत केदार ६ गोविंदराव पोतदार ७ लक्ष्मणराव अत्रे ८ परशुरामपंत घारपुरे ९ शंकरराव करमरकर १० दादासाहेब करमरकर ११ गुलाबराव फकीरजी १२ विठ्ठलराव गोपाळराव देशमुख १३ देवराव बळवंतराव देशमुख १४ विनायकराव बापट १५ तुळशीराम शिवरामप्रसाद १६ मोहनलाल हरीलाल १७ शे. विठ्ठलराव बक्तावरमल १८ भिवराज हजारीमल १९ कन्हयालाल रामगोपाळ २० गणू दौलत ऑनररी मॅजि-

स्ट्रेट २१ गोविंदराव पांडे २२ गोविंदराव गोफणे २३ देवराव पाटील २४ मनोहरपंत देशपांडे २५ माधोप्रसाद दुबे २६ माधवराव निमगांवकर १७ मोतीराव गणपतराव १८ विष्णु बाळकृष्ण कल्याणी.

## वऱ्हाड ( खामगांव )

१ प्रेमसुख दासजी राठी २ विश्वनाथ नागोसा सावजी ३ विसनचंद ग्यानुचंद ४ बनजी कानजी भाटे ५ दत्तात्रय रंगनाथ पेंडसे ६ त्र्यं. ल. ओक ७ वि. स. अणेकर ८ वि. वि. कवें ९ म. ब. जोशी १० मो. भोजूलाल ११ तुकाराम भो. दळी ११ सु. स. कारंब १३ भिकुलाल ठाकूरदास १४ गो. मो. पांचपोर १५ अ. खि. भाटे १६ दुनियासिंग उमरावसिंग १७ रामबसलाल छामलदास १८ बनासिलाल निंबाजी १९ बापुजी बाळाजी २० पुर्णाजी तानाजी पाटील २१ हरिदास निश्रीरामजी माता २२ न्यायालचंद श्यामलाल २३ द्वारकादास छबिलदास २४ रामगोपाळ खुपचंद २५ मदनलाल मोतीलाल शावजी २६ घनःश्याम बाळकिसनदास २७ जानकीमल श्रीकिसनदास २८ लिमजीलाल बक्षीराम २९ हिरालाल रामलाल ३० हरिप्रसाद लक्ष्मीचंद ३१ त्रि. ब. टिपरे ३२ व. वि. बारी ३३ रायमल हंसराज ३४ शांतिदास रुखबदास ३५ एकोबा विठोबा पाटील ३६ भगवान पाटील.

## वसई.

१ केशव मोरेश्वर शेंडे २ वैजनाथ वासुदेव नाईक ३ धोंडो गोविंद अभ्यंकर ४ सदाशिव विनायक बवें ५ शे. मनमोहनदास लल्लूभाई प्रताप ६ नारायण गणेश दिवेकर.

## वाशीम.

१ विनायक विष्णु गोखले २ कृष्णराव हनुमंत जतकर ३ यशवंत वामन दिघे ४ जनार्दन भालचंद्र साने ५ रामचंद्र शेषराव हवालदार ६ मुदुराव शेषराव हवालदार ७ काशिनाथ लक्ष्मण ऋषि ८ बालकिसनदास राधाकिसनदास लखोटे ९ गोविंद भगवंत गलांगोळे १० धरणीधर त्र्यंबक देशमुख ११ रामचंद्र हिरालाल उरळीकर १२

चंद्रभान रामशेट १३ जेठमल शिवराम रिसोडकर १४ केवल-सिंह केकत उमेरकर.

## वांई

१ भालचंद्र गंगाधर नित्सुरे २ कृष्णाजी गंगाधर अभ्यंकर वकील ३ काशिनाथ वामन लेले दीक्षित ४ परशुराम गणेश मेहेंदळे ५ सिद्धेश्वर काशिनाथ वैद्य ६ काशिनाथ विनायक पंडित ७ विष्णु एकनाथ कान्हेरे ८ माधव गणेश नानजकर

## विजापूर.

शंकर वामन नाईक कामत.

## विटें.

१ बळवंत लक्ष्मण चावरे वकील २ रामचंद्र व्यंकटेश वाडीकर वकील ३ दत्तो कृष्ण पेंडसे.

## शिरपूर.

१ लक्ष्मण हरि शावजी वकील.

## सातारा.

१ रघुनाथ पांडुरंग करंदीकर हां. वकील २ रामचंद्र गणेश सोमण वकील ३ नारायण बळवंत वाळवेकर ४ श्रीधर विष्णु जोशी (माची) ५ वामन गणेश घांणेकर वकील ६ आठल्ये वकील ७ श्री. सौ. रूक्मिणीबाई ८ नारायण कृष्ण आगाशे वकील ९ लक्ष्मण मोरेश्वर आपटे १० शे. दत्तराम गोविंदभाई गुजर ११ गोपाळ केशव कानेटकर. १२ विश्वनाथ विनायक भागवत.

## सोलापूर.

१ पन्नणणापा शंकरआपा दरगो पाटील २ शे. हिराचंद अमीचंद ३ सखाराम देवचंद ४ शहा शिवलाल गुलाबचंद ५ दत्तात्रय पांडुरंग जोशी ६ रामचंद्र गणेश खडकीकर वकील ७ जगन्नाथ मोरेश्वर सामंत वकील ८ श्री. सरसुबाई धोबडे.

REFBK-0001520

लोकमान्यांच्या जयंतिस्मरणार्थ

सुरू झालेली

# श्रीराष्ट्रप्रेममाला

पहिल्या वर्षाचे १२ अंक निघाले

व्ही. पी. सह १८ रु,

दुसऱ्या वर्षाचा पहिला अंक

## महात्मा टिळक

ता. २९ जुलै रोजीं प्रसिद्ध होईल.

वार्षिक वर्गणी व्ही. पी. सह १८५

अनंत हरी गद्रे जोगेश्वरी–नाका पुणें.

१५२०

॥ श्री ॥

[illegible]

ता. २८ माहे [illegible] १९०७

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]